साप्ताहिक

# माणूस

२५ मे ८५ / दोन रुपये

## वर्ग-जाती युद्धाच्या या ठिणग्या आहेत का?





गुजरात वार्तापत्र

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : बावन्नावा

¤

२५ मे १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेघा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

# सप्रेम नमस्कार १

¤ सदर्भ : माणूस (४ मे ८५) पृष्ठ ६–७ अभय गोखलेंचा लेख.

बाँबेचे मुंबई असे नामातर केले नाही, किंवा वसतदादानी मुबई केंद्रशासित होण्याची व्यक्त केलेली भीती व समाजकंटक इं. कॉं. वाल्याना पाडा हे केलेले आवाहन शिवसेना–विजयाची वरवरची कारणे होत.

शिवसेनेला पुरस्करण्याचे प्रमुख कारण भ्रष्ट पोलीस आणि नष्ट अ–मराठी समाजकटक उदा. बव्व्रू, वरदराजन ते थेट हाजी मस्तानपर्यंत. कै. नाईकांचे कारकिर्दीत शिवसेनेने तस्करीविरोधी मोहीम बऱ्याच यशस्वीपणे राबविली होती. तेव्हा मुबईत जगणाऱ्या चाकरमान्या व नोकरी करणाऱ्या मराठी माणसाना घटांशी वागण्यासाठी ट वे होते. पोलिसाची व्हिडिओ टेप आणि बिल्डर्सची गुडगिरी सरकारी पोलीस थोपवू शकत नाहीत, तेव्हा अ-मराठी मुजोर निर्लज्ज गुन्हेगारापेक्षा शिवसैनिक किती तरी बरे असा सूज्ञ व स्वार्थं समंजस विचार शिवसेनेच्या मतपेटीतील विजयामागे आहे. सत्ता मतपेटीतून येते ती फक्त मूठभर लोकप्रतिनिधीना (?) परतु मतपेटीतून काटयाला काटा व दहशतीला प्रतिदहशत निर्माण करण्याचा लोकशाही मध्यममार्ग मुंबैकरानी पाच वर्षांसाठी निवडला आहे. दादाच्या एक-दोन कृतीनी वा उक्तीनी कांग्रेस(इ.)हरत असली, तर ती चार–दोन कृती–उक्तीनी विधान सभेत निवडून यायला हवी होती. दादांच्या पार्टीला विधानसभेत जो शाहिस्तेखानी पजाचा विजय मिळाला, तो तसा मतदारानी पजाची बोटे कापून शिकवलेला धडा होता. आता तर मुबईत पंजा छाटून एक नयी तालीम देण्यात आली आहे मुबईवर अजूनही मराठी माणसाची voiceless व silent majority आहे, त्याचे हे उदाहरण आहे. तसेच मुबईमध्ये अ-मराठी बीज वाढत आहे, ही तक्रार फालतू आहे. कारण मराठी माणूस इंग्रजी भाषेप्रमाणे Eclectic आहे सातवाहन ते शिवाजी व मुघल–मुसलमानापर्यंतचा इतिहास हेच दाखवितो. नाही तर मराठा चित्तपावनांना पतप्रधानकी दिली नसती. गुणाचे कौतुक हा मराठी पिंड वा बाणा अमळ हाताबाहेर गेलेला स्व–भाव आहे. मराठी भाषा (बॉर्न इन कर्नाटका) मराठी विठ्ठल (मेड इन कर्नाटका) मराठी संस्कृती (नॉर्थ प्लस साऊथ) अशी अवस्था असता, ह्या अग्निजन्य खडकावर उगविलेल्या ब्रह्म वृद्धीच्या कमळातील परागकण अ–मराठी भुगे टिपतात ही तक्रार फिजूल आहे. महाराष्ट्राला जे नाविन्याचे म्हणून प्रसगी बाहेरवाल्याचे कौतुक आहे, त्यातून परके इथे मराठीचिये नगरी बस्तान बसवतात; परतु इमल्यातील आसने बिलोरी परके असले तरी प्रस्तर–कातळ–व पाया मराठी आहे, तेव्हा मराठी भाषिकावर अन्याय ही आईने हट्टी दत्तक मुलाविरुद्ध किंवा अरबाने हौशीने बोलाविलेल्या उंटाविरुद्ध केलेल्या तक्रारीसारखी उसनी तक्रार आहे. इंग्रजी भाषेप्रमाणे मराठी सस्कृतीने उपरे सारे औरगजेब ते पारशी–बहाई संस्कारापर्यंत. बरेवाईट पचविले आहे. अर्थात काही वेळा वावडे खाल्ले की ढेकरा येतात तशा या तक्रारी आहेत. महाराष्ट्र अमेरिकेप्रमाणे – त्यातही बोस्टनप्रमाणे open समाज व प्रदेश आहे. तेव्हा महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात परप्रांतीय वाढत असताना एकट्या मुबईचे कौतुक कशासाठी ?

५ मे ८५ — गोपाळदत्त कुलकर्णी

मिरज

¤ माणूसच्या १३ एप्रिल ८५ च्या अंकात मेजर मु. दि. आपटे याचा ' राष्ट्रीय प्रज्ञा-शोध परीक्षा ' हा लेख वाचला. त्यानी ह्या

परीक्षेतील नियम विद्यार्थ्यांना कसे गैरसोयीचे आहेत ते दाखविले. उदा. १) प्रवेश फी रु. २०/– २) चागल्या उत्पन्न गटातील मुलांना निम्मेच स्कॉलरशिप.

यावरून असे दिसते की, गरीब विद्यार्थी हुषार असूनही त्याला फी भरणे शक्य होणार नाही. म्हणजे चागल्या उत्पन्न गटातील विद्यार्थीच ह्या परीक्षेस बसू शकतील व पास होतील. व त्यांना निम्मीच स्कॉलरशिप द्यावी लागेल. यात सरकारची बचत होईल, परतु ज्यांना खरोखर गरज आहे असे गरीब विद्यार्थी पुढे येऊ शकणार नाहीत.

हा लेख खरोखर चागला आहे. परंतु त्यानी अजून थोडी माहिती दिली असती तर ती पालकाच्या व विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडली असती ती म्हणजे १) ह्या परीक्षेसाठी फॉर्म कुठे भरायचे? २) परीक्षेचे अजून काय नियम आहेत? ३) किती मार्क्स मिळाल्यावर प्रवेश मिळू शकतो? वगैरे माहिती हवी होती

२० एप्रिलच्या अकातील श्री. सुभाष काळे याचा 'मुबई महापालिका निवडणूक' हा लेख सत्य परिस्थिती वर्णन करणारा आहे. त्यानी कुठलाही आडपडदा न ठेवता सडेतोडपणे लिहिले आहे. श्री. बाळ ठाकरे याची मुलाखत मराठी माणसाला सुखावणारी आहे.

लीला पाटील याचा 'ऐलमा पैलमा शिक्षण देवा' ह्यातील मोजमाप हा लेख खूपच सुदर आहे. मुलामध्ये जे गुण आहेत त्याना प्रोत्साहन देऊन ते वाढविले पाहिजेत. त्यानी शेवटी दिलेली Fable फारच बोलकी आहे ज्या गोष्टीची मुलाना आवड नाही, त्यावर जास्त भर दिला तर असलेले गुणही तो घालवून बसेल.

'नेत्रदान' हा अरविंद कुलकर्णी यांचा माहितीप्रद लेख वाचून नेत्रदानाबद्दल बरीच नवीन माहिती मिळाली. एक मुद्दा अजून स्पष्ट व्हायला हवा होता की, जर एखाद्याने संमतीपत्रक भरून दिले असेल, पण त्याच्या मृत्यूनतर जर नातलग विरोध करत असतील तर काय तरतूद आहे?

७ मे ८५ — मनोज भावसार, कलपाक्कम

¤ आजच्या 'टाइम्स ऑफ इडिया'मध्ये पाकच्या अणुबाँबची शक्यता (सामर्थ्य) हा P K S. NAMBOODIRI (नम्बुदिरि) याचा महत्त्वपूर्ण लेख वाचून मला एक आठवण झाली. आपल्या १९८२ किंवा १९८३ या वर्षात एक 'इस्लामी अणुबाँब' अशी लेखमाला आली होती, लेखक आता आठवत नाही.

आपल्या लेखमालेतही डॉ खान या पाकिस्तानमधील शास्त्रज्ञाने परदेशात स्वीडन नेदरलॅण्ड्स् वगैरे देशात जाऊन तेथील (उघडरीत्या नव्हे) अणुबाँब विषयी काही गोष्टीचा अभ्यास केला. १९७६ व १९७९ या दोन वर्षात पाकिस्तानने हॉलडमधून काही अण्वस्त्रसामुग्री आणली. या गोष्टी भुत्तोच्या राजवटीत झाल्या.

आपल्या लेखमालेचा साराश आपण पुन्हा एकदा जनतेपुढे आणावा. ती लेखमाला फारच मार्गदर्शक होती.

११ मे ८५ — के. जी. कुलकर्णी, मुबई

¤ आपल्या ११ मे अंकातील 'हिंदू सेवा सघाचे कृषी केंद्र' हा मुलाखतवजा लेख (विनया खडपेकर) फारच छान उतरला आहे. त्यातील अतिम परिच्छेद 'एखाद्या गुन्ह्याचे धागेदोरे ... प्रकाशात येणे ही काळाची तीव्र गरज आहे' बरीच उणीव मागे ठेवून जातो.

आपले साप्ताहिक बरेच वेगवेगळे प्रयोग करते तरी वरील मुद्द्यावर भर देऊन जर आपण या विनयाबाईंना अथवा त्याच तोलामोलाच्या सवेदनाशील पत्रकाराला एखाद्या दुसऱ्या पकल्पावरील केंद्रावर पुढील ३–४ महिने राहावयास पाठवून जर दिवाळी मासिकासाठी त्या केंद्रप्रमुख व्यक्तीवर दीर्घ लेख छापलात तर 'कार्व्हर' सारखेच सुदर चित्रण आम्हास वाचावयास मिळेल.

'मुबापुरी ते गोहाटी' या लेखात आसामसबधी नवीन 'आतील' बातमी. खळखळ वाचावयास मिळेल असे वाटले होते; पण लिखाण वरवरचे झाले आहे.

१३ मे ८५ — प्रभाकर वातार, ठाणे

¤ साप्ताहिक 'माणूस' चा दिनाक ११ मे चा अक वाचला. ह्या अकातील दूरदर्शनला 'प्रायोजित' कार्यक्रमाचा धक्का!' या ललिता बर्वे ह्यानी लिहिलेल्या लेखासदर्भात मॉझे मत पाठवीत आहे.

सध्या दूरदर्शनवर दाखविल्या जाणाऱ्या ७ प्रायोजित कार्यक्रमांची नावे मुखपृष्ठावर छापलेली आहेत; परंतु लेखामध्ये मात्र फक्त दोनच (ये जो है जिंदगी व हम लोग) कार्यक्रमासदर्भात माहिती आहे. ह्यापैकी 'हम लोग' वर फारच विस्तृत टिपण केलेले आहे. हा कार्यक्रम अधिक जुना म्हणून त्यावर ६ ते ७ कॉलम (जवळजवळ पाठपोट २ पाने!) खर्च करण्याचे काय कारण? हे अनावश्यक वाटते.

ज्या व्यक्ती 'हम लोग' पहात नाहीत, त्याना ह्याचा काय उपयोग! नुसते कटाळवाणे वाचन!

ह्या ऐवजी मुखपृष्ठावर ज्या विविध कार्यक्रमाची नावे दिलेली आहेत, त्या सदर्भात पुढीलप्रमाणे माहिती दिली असती, तर अधिक बरे झाले असते, असे वाटते.

(अ) कार्यक्रम कोणातर्फे सादर केला जातो? (ब) कधीपासून सुरू झाला? (क) आठवड्यातून किती दिवस व कोणत्या दिवशी किती वाजता,... (ड) कार्यक्रमातील कलाकारांची नावे (इ) कार्यक्रमाचे स्वरूप इत्यादी.

वरीलप्रमाणे 'खानदान', 'इधर उधर', 'पेइंग गेस्ट', 'अपराधी कौन', 'ये जो है जिंदगी' आणि 'हम लोग' ह्या कार्यक्रमाची माहिती हवी होती.

सर्व कार्यक्रमाचे एकदर स्वरूप वाचून, तुलनात्मक विचार करता येणे शक्य झाले असते. त्याचप्रमाणे जे लोक एखाद–दुसरा कार्यक्रम पाहातात. त्याना इतर कार्यक्रमांविषयी गोडी निर्माण झाली असती आणि त्यानी इतर कार्यक्रम पाहाण्यास सुरुवात केली असती.

'हम लोग' हा सर्वाधिक लोकप्रिय कार्यक्रम आहे. ह्याचा अर्थ हा की जवळजवळ ८० टक्के पर्यंत लोकातर्फे हा कार्यक्रम पाहिला जातो (पुण्यानीलच एका साप्ताहिकात आलेली आकडेवारी!) असे असताना, ह्या कार्यक्रमावरच एवढी माठी जागा खर्च करणे चुकीचे वाटते.

सदर लेखामध्ये उरलेल्या ५ कार्यक्रमाची फक्त नावे ('ये जो है जिंदगी' आणि 'हम लोग' सोडून) आहेत. इतर

काहीही उल्लेख नाहीत. ज्याना ' हम लोग ' शिवाय इतर ' प्रायोजित ' कार्यक्रम पाहण्याची इच्छा असते, त्याना अशा कार्यक्रमाविषयी थोडक्यात माहिती, प्रतिक्रिया हवी असते; परतु ह्या बाबीचा काहीही विचार ह्या लेखात नाही. त्यामुळे ' हम लोग ' कार्यक्रम जे बघतात, त्याच्या दृष्टीने हा लेख कंटाळवाणा ठरला.

त्याचप्रमाणे ' रविवारी ' सकाळी सादर केल्या जाणाऱ्या ' हिंदी ' आणि ' इंग्रजी ' प्रायोजित कार्यक्रमाविषयी कोणताही उल्लेख नाही. ' प्रायोजित ' कार्यक्रमाचा धक्का ! असे नाव लेखाला असल्यामुळे त्याचाही विचार होणे आवश्यक होते.

त्यामुळे मुखपृष्ठ पाहून ज्यांनी आतील लेख वाचला असेल, त्याची घोर निराशा झालेली असेल हे नक्की !

१६ मे ८५ मि. नं. आपटे
पुणे

## वृत्तपत्रे व राजकारणी

□ ' वृत्तपत्र आणि राजकारणी याचे संबंध नको तितके घनिष्ट आणि नको तितके कटु नसावेत ' असे आपण ' गुजरात समाचार ' (माणूस–४ मे ८५) या अग्रलेखात म्हणले आहे या दोन्ही घटकामधील सबंध वैयक्तिक कारणासाठी जसे कटु नसावेत तसेच ते वैयक्तिक कारणासाठी अधिक घनिष्टही नसावेत हा मुद्दा आजच्या सदर्भात महत्त्वपूर्ण वाटतोच आणि विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या बाबतीत तो चांगल्या रीतीने लागू पडतो. शरद पवार आणि महाराष्ट्रातील वृत्तपत्रे याच्यातील सबध एकदा यादृष्टीने तपासून पहायला हवेत.

शरद पवारानी नुसते इं.कॉं.मध्ये जायचे असा सहज खडा टाकून पाहिला आणि झाडून सगळ्या मराठी वृत्तपत्राची जी काय धावपळ उडाली ती पाहिल्यावर खरोखर यांची दया करावीशी वाटते. गेल्या काही दिवसात पवारांच्या बाबतीत मराठी वृत्तपत्रांनी जी भूमिका घेतली ती स्वतःचे हसु करून घेणारी आहे.

' पवार इ.कॉं.मध्ये जाणार काय ?' अशा मथळ्याखालील बातमीशिवाय या घटनेला खरोखर कोणते महत्त्व आहे? पण महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीपेक्षा पवाराच्या राजकीय भवितव्याबद्दल चिंता असणारानी अग्रलेख–लेख याचा असा काही वर्षाव केला की पवारच काय पण इतरांनाही पक्षातराचा मोह व्हावा !

अगदी ढोबळ सुसगतीची अपेक्षा ठेवणारा वाचकही असे म्हणेल की, कोलाटीउडी खाण्याच्या शरद पवार याच्या तयारीवर दोनच तऱ्हेने अग्रलेख आणि लेख लिहिता आले असते एक म्हणजे, ' महाराष्ट्रातील विरोधी पक्ष वाढावा–टिकावा यासाठी शरद पवार प्रयत्न करतील असे आम्हाला वाटले होते पण तेही शेवटी निव्वळ सत्ताकांक्षी आहेत हे त्याच्या अलिकडील वागण्यावरून दिसते. ' किंवा दुसरी भूमिका म्हणजे, ' पक्षातर योग्य–अयोग्य हा भाग गौण आहे. शरद पवार हे आमचे मित्र आहेत व ते एक चागले राजकारणी आहेत. राजकारणात त्याच्यासारखी माणसे सत्तेवरच असणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते ' तिसरा आणि सर्वात योग्य मार्ग ठरला असता तो म्हणजे निश्चित चित्र स्पष्ट न झाल्याने तूर्त मौन पाळणे.

पण तिन्ही मार्ग सोडून हे भावावलेले वृत्तपत्रकार एवढे भरभरून लिहू लागले की, पवारही मनातल्या मनात हसत असतील. ' माझी राजकीय गणितं, राजकारणाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन हे काही माहिती नसताना कशासाठी हे लोक आपल्या लेखण्या झिजवत आहेत ?' असा त्यानाही नक्कीच प्रश्न पडला असेल. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारे ते ब्रह्मवाक्य आणि वृत्तपत्रकार म्हणजे नैतिकतेचे पुतळे असे समजणाऱ्या वाचकानाही या विषयावरील अग्रलेख डोळसपणे वाचले तर खरोखर धक्का बसेल.

या विषयावरील निरनिराळ्या लेख–अग्रलेखाचे नमुने पाहण्यासारखे आहेत. शरद पवारावर अधुनमधून लाखोली वाहिल्याशिवाय ज्याना पूर्वी चैन पडत नसे त्यानी वसंतव्याख्यानमालेतील पवाराच्या भाषणानंतर केवढा मोठा घूमजाव केला ! 'पवाराच्या मनात या क्षणी जे काही विचार आहेत त्या दृष्टीने त्यानी जे काही निश्चित केले आहे, ती काळ्या दगडावरची रेघ आहे यासारखी नाटकी भाषा वापरण्याची गरज नाही. तरीही ते मनाने एका वेगळ्या दिशेने निघाले आहेत असे म्हणणे त्याच्यावर अन्याय करण्यासारखे आहे असे त्याचे मित्रच काय पण पवारही म्हणू शकणार नाहीत. ' अग्रलेखाची ही भाषा पवाराच्या भूमिकेसारखीच गोलमाल असली तरी ' घूमजाव ' स्पष्ट करणारी आहे शरद पवार एका दिशेने चालले आहेत, ते मनापासून विचार करत आहेत या गोष्टी अचानक एकदम मान्य करून टाकल्या आणि त्याही एका दिवसात, ही कोलाटीउडीची घाई कशाला ? आधी पवाराना कोलाटी घेऊ दे ना !

दुसऱ्या एका अग्रगण्य पत्राने याहूनही पुढची मजल गाठली आहे. हे पत्र लिहिते, ' गुजरात, आसाम, पंजाब पेटले आहेत आणि प्रादेशिक स्तरावरील विरोधी पक्षांपेक्षा राष्ट्रीय कॉंग्रेसच हे प्रश्न सोडवू शकेल असे युक्तिवाद शरद पवारांनी करायला नको होते ( कारण आजपर्यंत आम्ही या प्रश्नाना कॉंग्रेसच कसे जबाबदार आहे हे पटवून देत होतो– मग एकाच वेळी तुमची भूमिका उचलून धरायची आणि कॉंग्रेस संस्कृतीवर टीका करायची हे कसे जमणार ?) पवारानी असे सागायला हवे होते की, ' इंदिरा गाधीच्या कार्यपद्धतीबद्दल आमचे मतभेद होते पण राजीव गाधी आले आणि त्यांनी पक्षातील काही अनिष्ट प्रवृत्ती नष्ट केल्या असे सागितले असते म्हणजे काहीच वैचारिक गोंधळ राहिला नसता. तेव्हा पवारानी आता पतप्रधानाचे नेतृत्व मान्य करावे आणि ही अनिश्चितता सपवून टाकावी ' एवढे सागून हे सपादक महाशय लिहितात, ' आता ही रोखठोक भूमिका योग्य मानायची का हा लोकापुढील प्रश्न आहे. ' अनेक व्यक्तीवर, प्रवृत्तीवर शरसधान करण्यात पुढे असणारे हे संपादक पवारांच्या भूमिकेची योग्यायोग्यता ठरविण्याचे काम मात्र लोकानाच सांगतात, ' एकदाची अनिश्चितता संपवा ' असे आर्जव करतात हे नि.पक्षपाती पत्रकारितेचे लक्षण नक्कीच नाही. अर्थात ह्या पत्राला ह्या एकाच अग्रलेखावर थाबावेसे वाटले नाही. महाराष्ट्रातील विरोधी पक्ष शरद पवारांशिवाय कसे निष्प्रभ आहेत हेही दुसऱ्याच दिवशी या पत्राने सागून टाकले आहे.

भारतीय जनता पक्ष व जनता पक्ष हे दोन्ही शहरी व मध्यमवर्गीय पक्ष आहेत परस्परांना एकमेकांबद्दल कमालीचा आत्मविश्वास आहे. तेव्हा जनता व भाजप यांना एकत्र ठेवण्यात पवारांनी आपली किती शक्ती खर्च करावी या आबासाहेब कुलकर्णींच्या विधानात बरेचसे तथ्य आहे.' किती ते गोंडस आणि सोज्वळ व्यक्तिमत्त्व ! बिचारे विरोधी पक्षांची मोट बांधून–बांधून थकले आणि नाईलाजाने सत्तेच्या अधीन होऊ लागले. यात त्यांची तरी काय चूक ? याही लेखाच्या शेवटी पुन्हा एकदा विनंती–' बदललेल्या राजकीय परिस्थितीत घोळ घालीत न बसता पक्षाचे विलिनीकरण त्वरित करणे श्रेयस्कर ' ( का यांना एवढी घाई झाली आहे ? )

आणखी एका संपादकाच्या लेखाची सुरुवातच मोठी मनोरंजक आहे. आपल्या दृष्टिक्षेपात ते लिहितात, ' शरद पवारांची गेल्या अनेक दिवसात भेट झाली नाही त्यामुळे त्यांच्या मनात काय चालले आहे हे समजू शकत नाही. ' ( पवारांच्या 'मनाचा' कितीजण विचार करताहेत ! ) माणसाने स्वतःवर किती खूष असावं याला काही मर्यादा ! राजकीय डावपेच आणि पक्षांतरासारखे निर्णय पत्रकारांशी बोलून मग ठरवले जातात की काय ? उगीच वाचकाची ( स्वतःचीही ) दिशाभूल करण्यात काय अर्थ आहे ? पक्षांतरासाठी शरद पवार मनापासून विचार करत आहेत व ते ' स्वगृही ' निघाले आहेत ही भाषा आता यावेळी व्यर्थ आहे. याचे कारण काँग्रेस संस्कृती आणि विरोधीपक्षांचे तत्वज्ञान या दोघांपैकी कोणाकडे जायचे असा प्रश्न नाहीये. त्यामुळे त्यांच्या मनात काय चालले आहे ? असला भोळसट प्रश्न विचारून पवारांच्या भूमिकेला तात्त्विक समर्थन मुळीच मिळणार नाही. ' विचार ' असला तर तो एवढाच की, सौदा कुठपर्यंत तोडायचा–' हिशेब ' कसा करायचा ! त्यांची भूमिका कळण्याआधीच तिच्यावर दृष्टिक्षेप टाकण्यापेक्षा पक्षांतराचे समर्थन कसे करायचे, हळूहळू वातावरणनिर्मिती कशी करायची हे काम पवार आणि त्यांच्या सचिवांवर सोपवणे बरे नाही का ?

अनेकजणांनी हीच चूक केली आहे. तर काहीजणांनी 'पवार मुळीच इंकाँमध्ये जाणार नाहीत ' असे निःसंदिग्ध शब्दात सांगून टाकले आहे. पवारांच्या वतीने आपणहून हा निर्वाळा देणे धाडसाचेच आहे. असा निर्वाळा देणाऱ्यांना एकतर पवारांच्या राजकीय भवितव्याबद्दल चिंता नसावी किंवा त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीवर, नैतिकतेवर अगाध विश्वास असावा !

खरं तर असं आहे की, या संपादक मंडळींच्या मनात काय चालले आहे याचाच थांगपत्ता लागत नाही. यशवंतराव चव्हाण मारतात ती कोलांटीउडी, शरद पवार करतात ते ' विलिनीकरण ', अंतुले करतात तो भ्रष्टाचार, इतर करतात ते लोकहित ! ही समीकरणं कशी तयार केली जातात हेच कळत नाही. विरोधी पक्षांची मोट बांधून सत्ता मिळवायचा प्रयत्न केला की, शरद पवार सत्तापिपासू, पण आपला पक्षच्यापक्ष घेऊन सत्ताप्रवाहात उडी घेतली की, पवार एकदम परिपक्व विचार करणारे राजकारणी. अशा पद्धतीने लिखाण करून आपण आपले आपल्या पत्राचे आणि वाचकाचेही अवमूल्यन करत आहोत याचे भान कोणाला राहिलेले दिसत नाही.

आता जे जाणवते ते असे की, वृत्तपत्र आणि राजकारणी यांचे परस्परसंबंध गुजरातप्रमाणेच महाराष्ट्रातही तेवढे निरोगी राहिलेले नाहीत. पत्रकारिता इतकी व्यक्तिकेंद्रित झालेली असणं सुदृढ लोकशाहीत बसत नाही. विचार, प्रवृत्ती हे लेखणीच्या टीकेचे किंवा कौतुकाचे विषय असावेत, व्यक्ती नव्हे. भ्रष्टाचाराच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीवर टीकाप्रहार करणं आणि एखाद्या व्यक्तीला तात्त्विक समर्थन देणं हे वरवर वाटतं तितकं साधं नसतं. अशावेळी विचारांची बांधिलकी सुटलेली असते आणि वैयक्तिक संबंध प्रभावी ठरत असतात. वृत्तपत्रस्वातंत्र्याचा संकोच बऱ्याच वेळा या मार्गानेच होत असतो.

वृत्तपत्रे एखाद्या राजकारण्याच्या इतकी कच्छपी लागल्याने ती तत्त्वासाठी लिहितात-भांडतात की, व्यक्तीसाठी असा प्रश्न पडतो. म्हणूनच वृत्तपत्रे आणि राजकारणी यांचे संबंध नको तितके कटु आणि नको तितके घनिष्ट नसावेत हेच सूत्र जास्त योग्य आहे. आणि तेच खरे लोकशाही रुजल्याचे लक्षण आहे.

१८ मे ८५ **निरंजन आगाशे**
**पुणे**

---


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.**

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
**पंचवीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.**

# ।। युवा मित्र–मैत्रिणींना आवाहन ।।

प्रिय युवा मित्र–मैत्रिणीनो,

यंदाच वर्ष हे आंतरराष्ट्रीय युवा वर्ष. इतर वर्षांप्रमाणे केवळ व्याख्याने, चर्चा अशा एकागी स्वरूपाच्या उपक्रमानीच हे वर्ष संपू नये. या आमच्या विचाराशी तुम्हीही सहमत व्हाल. म्हणूनच युवामन, आकांक्षा समजून घ्याव्यात, त्याचे समाजविषयक विचार जाणून घ्यावेत या भूमिकेतून 'सत्यशोध ट्रस्ट'ने एक लेखनस्पर्धा आयोजित केली आहे. यातूनच युवा पिढीशी संवाद साधावा, तिचे प्रातिनिधिक चित्र उभे रहावे आणि आणि आपणा सर्वांनाच प्रत्यक्ष कार्याच्या त्यातून काही दिशा शोधता याव्यात यासाठीच हा प्रयत्न. यातील निवडक लेख पुस्तकरूपाने प्रकाशित करणार आहोत.

यामुळेच या स्पर्धेसाठी पाठविल्या जाणाऱ्या लिखाणाबाबत वेगळी अपेक्षा आहे लेखन करताना कृत्रिम, अलंकारिक भाषा व कल्पनाशक्ती आवर्जून टाळावी. या उलट स्वत.च्या व इतरांच्या अनुभवांची स्पष्ट व डोळस मांडणी केलेल्या, स्वतंत्र विचार मांडलेल्या, कल्पनेपेक्षा वस्तुस्थितीवर भर दिलेल्या लिखाणाचे स्वागत होईल.

मोकळेपणाने लिहिता यावे म्हणून शब्दमर्यादा नाही, परंतु स्पर्धकांनी फापटपसारा मात्र जरूर टाळावा.

आपले लिखाण पाठवताना नाव, पत्ता, शिक्षण, व्यवसाय व वय इ. तपशील आवर्जून द्यावेत.

आपण पुढीलपैकी कोणत्याही एका अगर अनेक विषयांवर लिहू शकता.

(१) शिक्षणाने मला काय दिले ?
(२) ग्रामीण विकासात ग्रामीण युवकांचा सहभाग
(३) व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक बांधिलकी
(४) लैंगिक शिक्षणाची गरज
(५) मी जातीयवादी आहे/नाही–का ?
(६) व्हिडिओ, चित्रपट, जाहिरात आणि आजची पिढी

स्पर्धेसाठी लेखन पाठविण्याची अंतिम मुदत : ३१ मार्च १९८५. प्रवेशमूल्य नाही.

आपल्या लिखाणाची वाट पाहणारा
आपला
**बी. जे. अविनाश**
(कार्यवाह, 'सत्यशोध')

पत्ता :
सत्यशोध,
मु. पो. कोरेगाव जि. सातारा (महाराष्ट्र) पीन ४१५५०१

ह्या ना त्या निमित्ताने

# ठेच लागल्यावर

फिरोझ रानडे

'इतके साहित्यपूर्ण भाषण मंत्रीमहोदयांकडून आजकाल क्वचितच ऐकायला मिळतं.' स्वातंत्र्यसैनिक बव्यांनी चर्चेचे उद्घाटन केले आणि एखाद्या वाळक्या गवताच्या गजीला काडी लावल्यावर जसा आगीचा डोंब उसळतो तसा चर्चेचा डोब उसळला.

आणि तसा वाळक्या गवताच्या गर्जीसम डोंब उसळण साहजिकच होतं.

मुंबईत दूरदर्शनच्या नंबर दोनच्या वाहिनीचे उद्घाटन महाराष्ट्रदिनाच्या रुपेरी जयंतीचा मुहूर्त साधून केले गेले होते. खर म्हणजे ही नंबर दोनची वाहिनी काही तीन महिन्यांनी सुरू होणार होती; पण आपल्याकडे मुहुर्ताचे महत्त्व फार आहे.

अजुनीसुद्धा नाही का राजस्थान वगैरे भागात अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधून शेकडो नव्हे तर हजारो मुला-मुलींची लग्न करून टाकत? काही काही मुल-मुली तर अगदी पाळण्यातल्या असतात. आता पाळण्यातल्या मुला-मुलींची लग्न ती काय, त्याचे परिणाम काय होणार? पण ह्याचा विचार राजस्थानचे अडाणी लोक करत नाहीत किंवा मुंबईचे सुशिक्षित लोकही करत नाहीत.

आता दूरदर्शनची दुसरी वाहिनी तीन महिने आधी सुरू करणे सोपे आहे; पण ती चालवायला यंत्र-सामुग्री आहे का? मनुष्यबळ आहे का? चांगले कार्यक्रम आहेत का? ह्याचा विचार नको का व्हायला? पण इतका विचार करतं कोण? राजस्थानचे लोक अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त गाठतात तर मुंबईचे १ मेचा—महाराष्ट्रदिनाचा!

'ती साहित्यपूर्णता वगैरे राहू द्या हो, ह्या नव्या वाहिनीला नंबर दोनची वाहिनी म्हणणंच अशुभ आहे.' रागीट कामत रागारागानेच म्हणाला.

'त्यात अशुभ असण्यासारखे काय आहे?' सौ. कर्व्यांनी अगदी न रहावून विचारले..

'पहिल्या वाहिनीचा जर नंबर एक तर दुसऱ्याचा नंबर दोन असणारच!'

'तत्त्वतः तुमचे म्हणणे योग्य आहे हो; पण व्यवहारात नंबर दोनच्या गोष्टी फार वाईट मानल्या जातात.'

'त्या कशा काय?' परत सौ. कर्वे.

'अहो बाजारात दोन तऱ्हेचे पैसे आहेत. पहिल्या नंबरचा म्हणजे 'पांढरा' पैसा व नंबर दोनचा पैसा म्हणजे 'काळा' पैसा! काही हिंदी सिनेमा वगैरे बघता की नाही? त्या हिशोबाने नंबर दोनची वाहिनी 'काळी' वाहिनी ठरणार!'

कामतचा मुद्दा बरोबर होता, तरी कोणालाही म्हणजे अगदी कामतच्या बायकोलाही मराठी साहित्याच्या भाषेत बोलायचे म्हणजे कोणालाही भावला नाही. त्यामुळे सगळ्यांनी त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

'मंत्री महोदयांनी प्रथम १०५ हुतात्म्यांना वंदन केले त्यावेळी तर माझे डोळे अगदी भरून आले!' स्वातंत्र्यसैनिक बव्यांचे डोळे भाषण ऐकताना भरून आले होतेच; पण आता ते सांगताना पण भरून आले.

मग १ मे महाराष्ट्रदिन ह्या सगळ्यांचे कौतुकगान सुरू झाले.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राकरता दिलेला लढा, लोकांनी केलेला असीम त्याग, अत्रे यांची मुलुखमैदान तोफ, एस् एम् व डांगे यांचे नेतृत्व, देशमुख आणि नरवणे ह्यांनी केलेला त्याग! ह्या सगळ्यांची परत एकदा उजळणी व वाखाणणी करून झाली.

'खरंच आपलीच वाखाणणी व उजळणी करण्यात मराठी लोकांचा हात कोणीही धरणार नाही!' श्यामने बॉंब टाकला.

'म्हणजे वाखाणणी करण्यासारखे काही झाले नाही? एवढे १०५ हुतात्मे, त्याचबरोबर शेकडो लोकांचा बंदिवास! ह्यात कौतुक करण्यासारखे काही नाही!' बॉंब नेमका राधावर पडला होता म्हणून तिची ही जहर प्रतिक्रिया.

'ते सगळे खरे आहे ग, पण त्याच कौतुक किती दिवस, किती वर्षे करणार?'

'किती वर्षे म्हणजे? जोपर्यंत कॅलेंडरमध्ये १ मे हा दिवस येतो आहे तोपर्यंत!' आता स्वा. सै. बव्यांना अगदी रहावले नाही. नाहीतरी त्यांना श्यामची मत साधारणतः पटत नसतात.

मग बव्यांनी सबंध संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा एखाद्या मराठी दैनिकाचा संपादक ज्या प्रमाणे आढावा घेईल त्या प्रमाणे आढावा घेतला. त्याचबरोबर त्या असंख्य त्यागी बांधवांबरोबर आपणही किती व कसा त्याग केला ह्याचे रसभरीत वर्णन केले.

'आम्ही मराठी भाषिकांचा प्रांत मागितला, त्याकरता लढा दिला, काही लोकांनी प्राण गमावले, काही लोकांनी सत्तेच्या जागा सोडल्या. ह्याचे कारण आम्हाला संयुक्त महाराष्ट्रात समाजवाद येईल असे वाटले होते!'

'भाषिक प्रांत रचना आली तर त्याबरोबर समाजवाद येईल असे कसे वाटले? ह्याचा संबंध काय?' आता श्यामही माघार घेणार नव्हता. 'हे बघा बर्वे गुरुजी भाषिक प्रांत रचना झाली ती सर्वसामान्य माणसाला राज्याचा कारभार समजावा, त्याची कामे सुरळीत व्हावीत त्याचबरोबर त्या त्या भाषेचा उत्कर्ष व्हावा ह्याकरता केली गेली. एका भाषेमुळे कोणतेही राजकीय तत्त्वज्ञान कसे येईल? समाजवाद वा साम्यवाद कसा येईल?'

'का नाही येणार? एक भाषा असली म्हणजे भावनात्मक एकी होईल व एकदा एकी झाली म्हणजे मग समाजवाद यायला काय उशीर?' बर्वे श्यामला उत्तर देत म्हणाले.

'मग इंग्लंडमध्ये एक भाषा आहे, फ्रान्समध्ये फ्रेंच आहे, जर्मनीत जर्मन आहे तेथे नाही आला कधी साम्यवाद?' कामतला श्यामचे म्हणणे समजले होते म्हणून त्यांनीच बव्यांना प्रतीप्रश्न केला. त्यामुळे श्यामला जोर आला.

'ह्या चळवळीच्या एका पुढाऱ्याने तर कमालच केली. फार मोठा कम्युनिस्ट पुढारी आणि आता रौप्य महोत्सवी वर्षात काय सांगतो तर म्हणे, स्वतंत्र मुंबई ठेवायला आम्ही मान्यता दिली होती. का तर म्हणे मग मुंबईवर आमचे राज्य आले असते!'

'काय संयुक्त महाराष्ट्राचा लढा देणाऱ्याशी ही प्रतारणा!'

'तोंड बघा!' राधा पण त्या कम्युनिस्ट नेत्यावर फार चिडली होती.

'अहो ह्या मुंबईत अगदी इंदिराजींचा वरदहस्त असताना सुद्धा ह्यांची मुलगी लोक

सभेवर निवडून आली नाही त्यांच्या मुंबईवर राज्य करण्याच्या वल्गना !'

'आणि समजा मुंबई स्वतंत्र ठेवली असती व तेथे कम्युनिस्ट राजवट आली असती तरी काय मोठा फरक पडणार होता? बंगालमध्ये आहेच की ह्यांच्या चुलत बंधूंचं राज्य, तेथे काय मोठे असे दिवे लागले आहेत ?'

आता स्वातंत्र्य-सैनिक बर्व्यांना ह्यावर काही बोलणे शक्य नव्हते. तेव्हा ते मोठा निश्वास टाकून म्हणाले, 'तुम्ही काही म्हणा, आमच्यासारख्या निस्वार्थी कार्यकर्त्यांची घोर निराशा झाली.'

'आता त्याला कोण काय करणार ? तुम्ही १ मेलाच नाही तर दर १५ ऑगस्ट, दर २६ जानेवारीला असाच निश्वास टाकत असता व म्हणत असता आमची घोर निराशा झाली म्हणून...'

'मग तुम्ही निःस्वार्थी पुढारी लोक गेली २५ वर्षे काय करत होतात ? तुमच्या डोळ्यादेखतच काय झालं ते झालं. त्याला योग्य व चांगलं वळण लावण्याचे सामर्थ्य तुमच्यातल्या कित्येक पुढाऱ्यात होते. त्यांनी काही केले नाही असे नाही पण त्याचा परिणाम काय झाला ?'

'सगळी जबाबदारी राज्यकर्त्या पक्षावर टाकायची व आपण मोकळे व्हायचे ! निःश्वास टाकायचे आणि वर म्हणायचे की आमची निराशा झाली म्हणून. असे कसे चालेल ?'

परत स्वातंत्र्य-सैनिक बर्व्यांना चूप बसण्याची वेळ आली. आता कर्वे त्यांच्या मदतीला धावले.

'असं कसं म्हणता ? रौप्यमहोत्सव, सुवर्णमहोत्सव ह्यांना महत्त्व आहेच. नव्या आशा, नव्या आकांक्षा ह्या वेळी बोलून दाखवायच्या नाहीत तर केव्हा ? आता आपण २६ व्या वर्षात पदार्पण करत आहोत त्याबद्दल नवीन संकल्प, नव्या योजना, नवी धोरणे आखायला नकोत का ?' कर्वे मुख्यमंत्र्यांची व गव्हर्नर साहेबांची भाषणे दूरदर्शनवर बघत व ऐकत असत. त्यांचा त्यांच्यावर परिणाम झालेला स्पष्ट दिसत होता.

'अहो अशा आशा आणि आकांक्षा करण्यात काही अर्थ नाही हे ३५-३६ वर्षं होऊन गेली तरी आमच्या लक्षात येत नाही म्हणजे काय म्हणावे ?

'बरं, अशा नव्या आशा आणि आकांक्षा नवीन सरकार येतं त्यावेळी वाटणे योग्य आहे. कारण ते काही नवीन करतील अशी अपेक्षा ठेवणं ठीक आहे पण तेच सरकार, तोच पक्ष, जवळजवळ तीच माणसं सत्तेवर असताना उगाच दर १५ ऑगस्टला, २६ जानेवारीला, एक मेला अपेक्षा करणं खुळेपणाच नाही का ?'

आपल्या बोलण्याचा विषय काय होता व तुम्ही कोठे पोहोचलात ?' स्वा. सै. बर्वे परत मोठा निःश्वास टाकून व मोठ्या विषण्णतेने म्हणाले. आधीच संयुक्त महाराष्ट्राबद्दल त्यांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे ते विषण्ण झाले होते, त्यात ह्या विषण्णतेची भर पडली. मी म्हणत होतो, माहिती व प्रसारणमंत्री किती साहित्यपूर्ण बोलले म्हणून आणि तुम्ही आपले काही तरीच काढलेत !'

आता श्यामला पण आपली स्पष्टपणे बोलण्यातली चूक व त्यामुळे बर्वे दुखावले गेले आहेत ह्याची जाणिव झाली. म्हणून तो म्हणाला,

'का नाही होणार ? त्यांचे वडील नुसते राजकीय पुढारी नव्हते, नुसते मंत्री नव्हते तर फार मोठे साहित्यिक व कलेची जाण असणारे होते.'

'मला वाटतं मराठी राजकारणाची ही एक खूबी आहे. आपल्या राजकीय पुढाऱ्यांत कित्येक खंदे लेखक आहेत. काकासाहेब गाडगिळ, नारायणराव गोरे, यशवंतराव चव्हाण अगदी सहज डोळ्यासमोर येणारी ही नावे आहेत.

'मंत्र्यांनी दूरदर्शनवर मराठी कार्यक्रम होतील, त्यामुळे लोकांत करमणुकीबरोबर ज्ञान पण वाढेल. आणि मुख्य म्हणजे ह्या वाहिनीमुळे मराठी भाषिकात एक तऱ्हेची भावनिक एकात्मता येईल वगैरे सांगितले ते योग्यच होते. त्यामुळे काही तरी चांगले होईल अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.' आता बर्व्यांना उत्साह आला होता.

'इतके धडे घेऊन सुद्धा ह्यांचे आशा करणे व अपेक्षा ठेवणं काही संपत नाही.' श्याम म्हणाला पण मनाशी कारण आता त्याला बर्व्यांना दुखवावयाचे नव्हते.

'जे स्वातंत्र्य मिळाल्यावर झाले नाही, जे संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर झाले नाही, ते आता दोन तासाची दुसरी दूरदर्शन वाहिनी सुरू झाल्यावर होणार अशा ह्यांच्या अपेक्षा !'

'पण बर्वे गुरुजी, मंत्र्याची ती ठेच लागल्यावर 'आई, ग' म्हणतो तो मराठी' ही व्याख्या आपल्याला काही पटली नाही बुवा !' कामत म्हणाला.

'वा ! तो मुद्दा तर त्यांच्या भाषणाचा सगळ्यात चांगला अगदी हृदयाला जाऊन भिडणारा ! ठेच लागल्यावर ज्याच्या तोंडून 'आई ग' असे शब्द येतात तो मराठी ! वा काय योग्य व्याख्या. माझ्या डोळ्याला तर पाणीच आलं बघा !'

'म्हणजे ह्यांच्या डोळ्याला पाणी आलं तरी किती वेळा ?' श्याम मनातल्या मनात म्हणाला.

'तुम्ही काही म्हणा, आपल्याला काही ते पटले नाही. भावनात्मक असेल, साहित्य पूर्ण असेल पण... ' कामत आपलंच म्हणणं दामटत म्हणाला.

'मग काय व्याख्या असायला पाहिजे हो मराठी माणसाची ?' आता बर्वे थोडे चिडले होते.

'खरं म्हणजे त्यांनी असं म्हणाला पाहिजे होते की,' श्यामला आता मनातल्या मनात बोलणे अगदी अशक्य झाले म्हणून तो मोठ्याने म्हणाला, 'ठेच लागल्यावरसुद्धा जो शहाणा होत नाही तो मराठी माणूस !'

स्वातंत्र्य सैनिक बर्वेच नव्हे तर सगळेच श्यामकडे बघत राहिले. □



**मुक्काम बडोदा**

# सयाजीराव गायकवाड, गांधीजी, ठक्करबाप्पा... आणि आता आंबेडकरनिष्ठ विद्रोही प्रवाह

अविनाश भगवंत धर्माधिकारी

जखम झाल्यावर वहाणाऱ्या रक्तासारखी आंदोलनं असतात. कातडी फोडून बाहेर धावणारी, उत्स्फूर्त आणि लालभडक. त्यांच्यावर वेळीच नीट मलमपट्टी झाली तर वहात रक्त थाबतं, जखम कोरडी पडते. नतर बरी होते आणि त्वचा पूर्ववत चमकू लागते. फार तर एखादी छोटीशी खूण शिल्लक रहाते. मलमपट्टी करण्यापाशी काम संपत नाही. शक्यतो परत अशी जखम होऊ नये अशी काळजी घ्यायची असते. समाजपुरुषाच्या शरीराला होणाऱ्या जखमाचं अस असतं. शरीर आहे, धडपडणार, त्याला चार–दोन जखमा इकडे तिकडे होणार. हे आपण समजू शकतो. पण जेव्हा वहाती जखम थाबत नाही, एका ठिकाणी मलमपट्टी केली तर दुसरीकडून कातडी फाटते तेव्हा समजाव की रोग गंभीर आहे. याला नुसती बाहेरून मलमपट्टी करून चालणार नाही. मुळातून आतूनच सुधारणा, पुनर्रचना आवश्यक आहे. शरीराला व्हिटॅमिनस्च कमी पडलीत. त्यामुळे हिमोफिलिया झाल्यासारख्या या रक्ताळलेल्या जखमा वहातायत. अशा वेळी सुद्धा जे वैद्य बाहेरूनच मलमपट्टी करत रहातात ते रोग्याला फसवत असतात.

गुजरातमधलं राखीव जागा विरोधी आंदोलन. भारत वर्षाला झालेली एक जखम. ही जखम पहिल्यादाच झाली नाहिये. १९८१ मध्ये एकदा खूप खरचटून खोक पडून गेलीय. तेव्हा मलमपट्टी झाली चार–दोन टाके घातले गेले. आता रक्त परत घोघो वहातय. हे कशाच निदर्शक ? रोग गभीर असल्याच, आतून काही मूलभूत उपाय योजना आवश्यक असल्याचं, हिमोफिलियाचं की आणखी काही ? अन् अशा वेळी सुद्धा सोळकी हटाव किंवा बचाव, दंगलीना विरोधी पक्ष जबाबदार, राखीव जागांची टक्केवारी वाढवण्यास एक वर्षाची स्थगिती, साधवाणी आयोग प्रकाशित करायच आश्वासन अशी मलमपट्टी करणारे फसवे वैद्य खूप आहेत जखम फक्त गुजरातमध्ये नाही. देशभर आहे. फसवे वैद्यही काही केवळ गुजरातमध्येच नाहीत. देशभर त्यांचीच चलती आहे. आज काय ईशान्य भारत धगधगत असतो मग काय गुजरात पेटून उठतो उद्या पंजाब शतशत जखमानी छिन्नविछिन्न व्हायला आलेला असतो किंवा श्रीनगरच्या रीगल चौकात 'भारतीय कुत्र्यानो परत जा'चा हिडीस जल्लोष चालू असतो, तर तिकडे तमिळ निर्वासितांवर दक्षिण किनाऱ्यावर खचाखच घाव पडलेले असतात. शत्रूशी नव्हे, स्वत शीच भांडताना झालेल्या जखमामधून आणखी किती काळ रक्त वहात रहाणार आहे? मूलभूत उपाय योजना कधी होणार ? और तो और, या गुजरातमधल्या जखमेत संपूर्ण शरीराच्या चिरफाळ्या उडवायची सुप्त शक्ती आहे.

आज असा सगळा विचार करत ही डायरी हातात धरून बसलोय तेव्हा अहमदाबाद परत भडकून उठल्याची बातमी पेपरात झळकते आहे. गुजरात शात होतोय होतोय वाटत होतं तोवर परत हा नवा अध्याय.

## एक मे एकोणीसशे पंच्याऐंशी
## महाराष्ट्र दिन : गुजरात दिन सुद्धा.

पहाटे प्रवास सुरू केला. पहाटे प्रवास सुरू करायचा म्हणजे रात्रभर जागरण, eleventh hour ला धावपळ हे सर्व आलच. सामान, कात्रण, पुस्तके, महत्त्वाचे पत्ते याच्यासाठी नीट धावपळ झाली. थोडं वाचन आणि पुढच्या अभ्यासाला आवश्यक अशा कच्च्या नोटस् काढल्या. सतीशकडून काही पत्ते घ्यायला 'सकाळ'मध्ये गेलो तेव्हा टेलिप्रिंटरवर गुजरातच्याच बातम्या खडखडत होत्या. शातता पाळण्याचं आवाहन, आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा, पोलिसावर आरोप आणि पोलिसांतर्फे आरोपाचा इन्कार. या सर्वातच द्वारकेच्या शकराचार्यांनी केलेलं आवाहन 'आपण सर्वजण ईश्वराची लेकरं आहोत. त्या ईश्वराला विषमता नामजूर आहे आणि राखीव जागाही नामंजूर आहेत. ईश्वराच्या नावानं आपण बंधुभाव जागा करू या' अस काही तरी ..

रात्री बारा वाजता भोगा झाला तेव्हा आठवल की, महाराष्ट्र राज्याच रौप्यमहोत्सवी वर्ष सुरू झालं. म्हणजे गुजरात दिनसुद्धा उजाडू लागलाच की. महाराष्ट्रात -रौप्यमहोत्सवी वर्षाचा उत्साह आहे. निदान सरकारी परिपत्रकातील अधिनियम क्र. चौतीस अ सात इ...नुसार उत्साह साजरा होत आहे. शनिवारवाडा, ट्यूबलाईट्स भटकणारे तरुण यानी झळकत होता. तर गुजरातचा रग कसा काळवडून गेला आहे महागनरपालिकेच्या इमारतीवर दिव्याच्या माळा शोभत होत्या तर गुजरातमधल्या आंदोलनामुळे महापालिका निवड-

णुकाच झाल्या नव्हत्या. मराठी पोरं परीक्षा पूर्ण करून नाचत, गात, भटकत होती तर गुजरातमधे परीक्षा रद्द, विद्यार्थ्यांमधे जातीय तट पडू लागले. मुंबईत शिवसेनेच्या विजयानं मराठी माणूस खुललेला असावा. गुजरातमधे सोळंकी हटाव–बचावच्या रस्सीखेचमध्ये जनसामान्याची ओढाताण चालू. महाराष्ट्र–गुजरात दळणवळण विस्कळीत. त्यामुळे गाड्या आल्या तर आल्या, नाही तर नाही. सुदैवानं बडोद्याची एस टी. आज निघाली. त्यातून पहाटे प्रवास सुरू केला. बरोबर समीर होता. प्रेक्षणीय स्थळं पहाणं, तीर्थयात्रा करणं किंवा पिकनिकला धमाल करण यापेक्षा जिथे महत्त्वाचा देशप्रश्न उफाळून येत असतो तिथे जाण्याचा वेडेपणा करणाऱ्या युवकाची दुर्मिळच, पण एक जात आहे. त्यातला समीर एक. तो उत्तम गातो. त्यामुळे गुजरातमधल्या जनजीवनाचं संगीत बेसूर होऊन गेलय हे समजावून घेताना मनात येणाऱ्या उपमा 'शास्त्रीय' दृष्टचा बरोबर आहेत का हे मी त्यालाच विचारत होतो.

## पोएटिक जस्टिस

राखीव जागाविषयी असंतोष गुजरातमध्ये आधीपासूनच होता. त्यातूनच १९८१ सालचं आंदोलन उद्भवलं होतं. मुख्यतः पदव्युत्तर क्षेत्रातल्या राखीव जागा रद्द केल्या जाव्यात, या मागणीसाठी ते आंदोलन झालं होतं. त्यावेळीही श्री. माधवसिंग सोळंकीच मुख्यमंत्री होते. त्यांनी परिस्थिती अत्यंत कुशलतेनं हाताळली होती, असं म्हटल जायचं. पण यावेळी मात्र परिस्थितीवर पकड ठेवण्यात सोळंकीना दारुण अपयश आल्याचं दिसत होतं. विधानसभा निवडणुकांपूर्वी काही काळ राखीव जागांच प्रमाण एकतीस टक्क्यावरून वाढवून एकदम एकूणपन्नास टक्क्यावर नेण्यात आलं. ताबडतोब निषेधाचे काही सूर उमटले.मध्यप्रदेशमध्येही राखीव जागा वाढवण्यात आल्या; पण तिथले निषेधाचे सूर मात्र लवकर विरले. गुजराथमध्ये हे दबा धरून योग्य संधीची वाट पहात थांबले. निवडणुका झाल्या. कांग्रेसनं १८२ पैकी १४९ जागा जिंकून अफाट यश मिळवलं. मार्चच्या पहिल्या आठवड्याअखेर सोळंकी सरकारचा शपथविधी झाला. मुख्यमंत्रीपदाची पहिली कारकिर्द पूर्ण पाच वर्षं गाजवून परत संधी मिळालेले सोळंकी पहिलेच मुख्यमंत्री ठरले. सारं कसं शांत होतं. लोकशाहीवर भाष्य करताना बाबा आमटेंनी एका चिंतन काव्यात म्हटलय—

> 'ही गर्दी म्हणजे बहुमत
> हे तरी खरे आहे का ?
> सडकेवरची बेफाम क्रांती
> आणि मतपेटचातून बाहेर पडणारा मूक निर्णय
> यात ही दरी व तो कडा
> एवढी तफावत असू शकते
> हे नुकतेच वर्तमान पत्रातून वाचले आहे'

या ओळी नेमक्या केव्हा लिहिल्या आहेत कुणास ठाऊक. पण गुजरातच्या परिस्थितीला बरोबर लागू पडतात. मतपेटीतून एक मूक निर्णय नुकताच बाहेर पडला. तोवर सडकेवरून राखीव जागाविरोधी आंदोलन बेफामपणे धावू लागलं. १८ मार्चचा 'गुजरात बंद' १००% यशस्वी झाला. राखीव जागा वाढविण्याचा निर्णय एक वर्षभरासाठी स्थगित करण्यात आला तरी आंदोलन थमलं नाही. आता राखीव जागा मुदलातच रद्द करण्याचे ध्वनी मुखर होऊ लागले.

निवडणुकामध्ये मागासवर्गीयांची एकगठ्ठा मतं मिळावीत यावर डोळा ठेवून ऐन निवडणुकाच्या उंबरठ्यावर राखीव जागांची टक्केवारी वाढवण्यात आली असं म्हटल जात. ती एकूणपन्नासपर्यंत वाढवली, कारण राखीव जागा पन्नास टक्क्याहून जास्त असू नयेत असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. राखीव जागामागच्या या राजकारणाचा खरच एकगठ्ठा मत मिळण्याशी किती संबंध आहे या विषयी शंका घेता येईल कारण आपल्यासाठी जागा वाढवण्यात आल्या म्हणजे हे सरकार आपल्या हिताचं आहे असा विचार करून जाणीवपूर्वक मागासवर्गीयांनी आपली मतं, कांग्रेसच्या पारड्यात टाकावी एवढी जागृती अजून दिसत नाही राखीव जागाचा अर्थच न कळलेला खूप मोठा मागासवर्गीय समाज आहे. मग त्याचे फायदे शेवटच्या स्तरापर्यंत पोचलेले असण तर दूर राहो. आतासुद्धा १५%च राखीव जागा भरल्या जातात. मग त्या ४९% झाल्या यात आपला काही फायदा आहे म्हणून कांग्रेस सरकारच परत सत्तेवर आणाव एवढी राजकीय जागृती कशी असणार ? कांग्रेसला मागासवर्गीयांची मतं 'अन्य' मार्गानी मिळतात.

हे खरं की लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकात कांग्रेसनं जास्त यश मिळवलं. लोकसभेच्या वेळी १४० विधानसभा मतदार संघात कांग्रेसला आघाडी होती तर प्रत्यक्ष विधानसभा निवडणुकीत कांग्रेसनं १४९ सीटस् जिंकल्या. इतर सर्व प्रांतांमध्ये या मुद्यावर सिटांमध्ये घट आहे. अपवाद फक्त गुजरातचा, पण हे घडायला राखीव जागांचा राजकीय निर्णय कारणीभूत आहे असं कसं मानाव ? कारण त्या हिशोबानं मध्यप्रदेशातही सीटस् वाढायला हव्या होत्या, तसं झालेलं नाही. मध्यप्रदेशात कांग्रेसच्या मतात आणि विधानसभेतील जागात लोकसभेपेक्षा घट आहे. पण निवडणुकानंतर आंदोलनाच्या जबाबात राखीव जागाची वाढ वर्षभरासाठी स्थगित करण्यामुळे सरकारवर राजकीय स्टंटबाजीचा आरोप करायला जागा शिल्लक राहिली आहे.

स्टंटबाजीही परवडली असती; पण इथे पाठोपाठ अकार्यक्षमता अधिक उद्दामपणाच 'मध्ययुगीन' प्रशासन आलं राखीव जागाविरोधी आंदोलनातून पोलिसी अत्याचाराची प्रकरणं उद्भवली. नागरिकांना अदाधुंद बडवणं, घरातून घुसून मारून काढणे, मोडतोड करणे, पत्रकारांना मारणं आणि या सर्वांवर कळस म्हणजे वृत्तपत्राची कचेरी जाळून खाक करणं. एकेक ऐकावं ते नवलच होतं. विसाव्या शतकाच्या नवव्या दशकात, एका स्वतंत्र लोकशाही देशाच्या स्वातंत्र्याच्या अडतीसाव्या वर्षात हे असं काही घडावं हे कल्पनेच्याही पलिकडचं होतं. तो देश भारत असावा, हे मात्र कल्पनेच्या अलिकडचच होतं. भारतातही तो प्रांत गुजरात असावा हा महात्मा गांधीजींना मिळत असलेला 'काव्यमय न्याय' –.Poetic justice असावा या पोलिसी अत्याचारांची साधी न्यायालयीन चौकशी करायला मुख्यमंत्री नकार देत होते. उलट ते म्हणत होते, 'वृत्तपत्रानी विपर्यस्त बातम्या देऊन पोलिसाची बदनामी केली आणि लोकानीच पोलिसाना खिजवलं, भडकावलं म्हणून पोलिसानी हे कृत्य केलं.' म्हणजे पोलिसांचं काही चुकलच नाही जणू. वृत्तपत्र आणि लोकांचंच चुकलं. म्हणजे हे कसं झालं : काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राच्या विधानसभेत एका आमदारानं कायदा व सुव्यवस्था विषयी तक्रार करताना

सांगितलं की, चर्चगेट भागात गुंड टोळक्याचा इतका उपद्रव वाढलाय की सध्याकाळी ६ नतर एकट्या स्त्रीला तिथून जाण अशक्य होतं. तेव्हा मुख्यमत्री म्हणाले–हो, याच्या बातम्या आमच्याकडेही आल्यात. आमची अशी सूचना आहे की सध्याकाळी सहानंतर एकट्या स्त्रीने चर्चगेट भागातून जाऊ नये. तसच साहजिक आहे. दोघाची जात, पोटजात एकच ना : काँग्रेस मुख्यमत्री ! कात्रजचा बोगदा नादुरुस्त होता तेव्हा त्यावर एक नामी उपाय खात्यान शोधला होता. बोगद्याच्या दोन्ही टोकाना पाटी लावण्यात आली 'बोगदा नादुरुस्त आहे आपापली वहान काळजीपूर्वक चालवा' PWD खात्याचं काम संपलं. तस गुजरात सरकारने आकाशात उच पाटी लटकावली.

## स्फोट होण्यापूर्वी

*'लोक व वृत्तपत्रे याच्या चुकीमुळे पोलीस पिसाळलेत. लोकानी* आपापली कायदा व सुव्यवस्था ठेवावी' मग अशावेळी आपापली कायदा व सुव्यवस्था पाहून घेणारी जमात आपल्याकडे आहे रूढ परिभाषेत त्याला 'समाजकटक' म्हणतात. त्याच्यापैकी काही हिंदू असतात काही मुसलमान. पहाता पहाता हिंदु–मुस्लिम दंगलीचा वणवा पेटत जातो. मूळ राखीव जागाविरोधी आदोलन मागे पडत. स्थगित केल जातं. आता पोलिसच बिथरलेत म्हटल्यावर दगली आवरणार कोण ? लष्कराला पाचारण करण ओघानच आलं. या सर्वातच मिसळलेला राजकारणाचा मातकट, तेलकट उग्र वास लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पक्चर झालेल्या पक्षाना हवा भरून घ्यायला पुन्हा एक संधी. विधानसभा निवडणुकीत तिकिट न देऊन सोळकीनी ज्याचा परस्पर काटा काढला अशा पक्षांतर्गत असंतुष्ट बंडखोरांना काहूर उठवायचं एक निमित्त सर्व दंगली आणि पोलिसी बेशिस्त या पाठोशी प्रबोध रावळ आहेत असं लोक बोलतात. ८०–८५ या काळात ते गुजरातचे गृहमत्री होती. ते दाखवू इच्छितात की गुजरातमधे शांतता व सुव्यवस्था केवळ ते गृहमत्री असले तरच नादू शकते. आताच्या विधानसभा निवडणुकीत त्याना तिकिट नाकारण्यात आलं होतं. अशा सगळ्यामुळे सोळकी हटाव, बचाव; अस बडबडगीत, पार्श्वसगीत म्हणून चालू होतं मूक राखीव जागांच्या निषेधार्थ सुरू झालेल्या एका अहिंसक आदोलनात किती गभीर सामाजिक आशय भरलेला होता. त्यातून असे फाटे फुटत गेले. आहे थोडी डोकेदुखी म्हणून दुर्लक्ष कराव अन् शेवटच्या स्टेजमधला ब्रेन ट्यूमर निघावा तस गुजरातचं झालं. शाळा कॉलेजेस बद. परीक्षा स्थगित बँका, कारखाने अगदी तुरळक तुरळक, औषध म्हणून चालू. आता राज्यभरच्या सरकारी कर्मचाऱ्यांचाही मैदानात उतरायचा विचार चालू आहे. ते झाल की गुजरातची चाक फिरणं थांबेल.

गुजरातमधला 'मातीचा' भुईनळा असा पेटून आगीच्या उंच ऊच ज्वाळा फेकतोय. मातीचा भुईनळा, कारण तो पेटायला वेळ लागतो. पण एकदा पेटला की तऱ्हातऱ्हांच्या रंगीबेरगी ठिणग्या उटवतो. गुजरात पेटवणारी राखीव जागाविरोधाची फुलबाजी निवडणुकीपूर्वीच तडतडत होती. नवं सरकार आल्यावर भुईनळ पेटला. पहाता पहाता त्यातून राजकीय सत्ता, सघर्ष, पोलिसी अत्याचार, वृत्तपत्र जळित प्रकरण, हिंदु–मुस्लिम दगली, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा सप अशा धारा उसळल्या मातीचा भुईनळा अनेकदा विझला, विझला वाटतो तोवर परत पेटून उठतो असं तर इथे गेल्या दीड महिन्यात दोनतीनदा झालय आणिक कितीदा होईल कुणास ठाऊक ? अखेर मातीचा भुईनळा विझल्यावरही तो हातात घेऊन दूर फेकायचा धोका पत्कारायचा नसतो त्यात फटाका फुटून भुईनळ्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात एखादी खापरी तुमच्या डोक्याला लागून जखम व्हायची. आजच्या दिवसाच्या मावळतीच्या वेळी गुजरात असा विझू लागलेला पण स्फोट होण्याच्या शक्यतेपायी दचकून अस्वस्थ झालेला. भारतातला सर्वात सुपीक, आर्थिक दृष्ट्या पहिल्या क्रमांकाचा प्रात उद्योगप्रिय, शाततािप्रय, अहिंसक, मृदुभाषी लोकांचा प्रात. गाधीजीचा गुजरात ? रोप्यमहोत्सवी वर्षाच्या पहिल्या दिवशी कर्फ्यूखाली सावध निद्रेत.

पेपरांमधून असा गुजरात आधीच दिसत होता सापुताऱ्यापासून प्रत्यक्ष जमीन दिसू लागली. सापुतारा म्हणजे गुजरातचं महाबळेश्वर. थंड हवेचं ठिकाण उन्हाळा तर चालू झालाय पण सापुतरा सुनसुनं आहे अस टुरिस्ट काऊटरवरचा 'भाई' सांगतो. पुढे बिलीमोरा–नवसारी–सुरत–भडोच मार्गावरून एस. टी. जात राहिली तेव्हा ती या सर्व शहरामधल्या कर्फ्यूचं दर्शन घडवत होती एस टी. तल्या सिटावरही चर्चा, कुजबूज, याच विषयावर बडोद्यात पोचलो तेव्हा रात्रीचे ११ वाजले होते.

हवा थंड, शात होती. रात्री एस.टी स्थानकावर रस्त्यावर असतो तेवढा लोकाचा तुरळक वावर होता. चालत 'वटोदरा' रेल्वे स्थानकावर आलो स्थानकाच मोठं पोर्च, स्वच्छ प्रकाश, मोठे रस्ते, रिक्शाची जा–ये, समोरच्या रस्त्याला रागेत पजाबी 'ढाबे'–सर्व काही नॉर्मल होतं पुण्यासारख होतं. जेवून घरी येण्यासाठी रिक्शात बसलो, 'फतेपुरा' रिक्शावाल्यानं विचारलं 'वहाँ कर्फ्यू तो नही ?' तेव्हा पुन्हा आठवलं की बडोदा तग आहे वगैरे. मी त्याला म्हटलं 'हमें पता नही. आपही को मालूम होगा.' पण ऑल इंडिया रेडियोवरच्या 'विनोद कश्यपसे समाचार सुनिये'ने मात्र सांगितलं असणार 'अहमदाबाद और बडोदा में आज स्थिती शात लेकिन तनावपूर्ण बनी रही। कल रातके बाद आज किसी अप्रिय घटनाकी कोई खबर नही' आकाशवाणीच्या विश्वासार्हतेविषयी उगीच शका व्यक्त न करता इथे मान्य करायला हवं की, निदान बडोद्याचं हे वर्णन बरोबर आहे समीरच्या नातेवाईकाच्या घरी फतेपुऱ्यात पोचलो तेव्हा त्यानीही या वर्णनालाच दुजोरा दिला. वाटेत चौकाचौकात उभ्या असलेल्या पोलिसांच्या कपन्या आणि रस्त्यारस्त्यावर गप्पा मारत उभी असलेली तरुणाची टोळकी यानी वातावरणाची कल्पना आणून दिलीच होती. त्यात अधिक तपशील समीरच्या नातेवाईकानी भरला एक सामान्य मध्यमवर्गीय कुटुब आसपासच्या घडामोडी कशा पहातं, त्यानी ते हादरून आणि वैतागून कस गेलेलं असत ते पहायला मिळाल हिंसा, खून, लुटालूट, जाळपोळ याचं दर्शन त्याला अस्वस्थ करतं. स्वामीनारायण मदिर आणि मशीद

**गुजरात–विझू लागलेला पण स्फोट होईल म्हणून दचकून अस्वस्थ झालेला....**

शेजारी शेजारी असल्यामुळे दंगलीच्या काळात काय भयंकर प्रकार तिथे घडतात याच्या गोष्टी, दर्शनाला गेलेलं एक नवपरिणित जोडपं जमावानं कसं कापून काढलं याची शहारे आणणारी कहाणी, या घरातल्या प्रदीपनं एका रिक्शेवाल्याचा जमावानं तुडवून, बुकलून केलेला खून डोळ्यानी पाहिलेला–असं खूप काही.

हिंदु–मुस्लीम दंगलीच्या या काहीच वार्ता पुण्यापर्यंत आल्या नव्हत्या. जातीय दंगलीचा वृत्तांत देण्याच्या बाबतीत वृत्तपत्रांनी एक अलिखित नियमावली स्वीकारली आहे. तीनुसार ज्यामुळे जातीय भावना भडकतील अशा बातम्या द्यायच्या नाहीत असा संकेत आहे. तो योग्य आहे. पण अशावेळी अनेकदा विश्वासार्ह बातम्या न पोचता अफवा पोचतात, त्यावेळी खऱ्याखोटयाचा शहानिशा करायचा काही मार्ग उपलब्ध नसतो, वातावरण तापतं अन् अखेर एवढ्या तेवढ्या कारणावरून भडका उडतो त्याऐवजी तपशीलवार, वस्तुनिष्ठ बातम्या येणंच कदाचित अधिक उपयुक्त ठरेल दोन जमातींचा उल्लेख न करता बातमी द्यायची, एका जमातीतले पाचजण जखमी झाले म्हणायचं आणि त्यांची नावं द्यायची म्हणजे केवळ राजाची मर्जी सांभाळण्यासाठी 'पोपट मेला आहे' असं न सांगता 'महाराज त्यानं खाणं सोडलय, पंख पसरलेत, उताणा पडलाय आणि चोच वासलीय' असं सांगण्यासारखंच आहे असं रिपोर्टिंग अफवांना सुपीक जमीन निर्माण करून ठेवतं.

विशेषतः 'ब्ल्यू स्टार'नंतर पंजाबमध्ये हे जास्त जाणवलं होतं. त्यावेळी वृत्तपत्रावर कठोर सेन्सॉरशिप जारी होती. त्यामुळे काय घडतंय याच्या बातम्या मिळायचा मार्ग म्हणजे अफवा. त्या इतक्या प्रचंड प्रमाणावर आणि अतर्क्य स्वरूपाच्या होत्या की, खऱ्या बातम्यापेक्षा या अफवानीच दोन जमातींची डोकी बिथरली होती. यातच जनसंपर्काच्या सरकारी माध्यमाची विश्वासार्हतेची पातळी शून्यवत झाली होती. हे तथ्य मिसळलं तर परिस्थितीच्या विस्फोटकतेचा अंदाज करता येईल. अशापेक्षा सेन्सॉरशिप नसावी, वस्तुनिष्ठ, भावना न भडकवणारं रिपोर्टिंग असावं हे समाजस्वास्थ्याला जास्त पोषक ठरेल.

आज तरी बडोदा बरचसं शांत. इथे मुख्य घटना गेले काही दिवस चालू असलेली हिंदु–मुस्लिम दंगल. तीही मुख्यतः बडोद्याच्या पूर्व भागात. म्हणजे जुन्या बडोद्यात. पश्चिम बडोदा म्हणजे औद्योगिक विभाग आहे तिथे दंगलीचं लोण जात नाही. औद्योगिकरण, आधुनिकीकरण याचं जातीय दंगलीशी फारसं सख्य नसावं. ते परवडतच नसणार. अरुंद रस्ते, छोटया गल्ल्या, एकमेकाला चिकटलेली कौलारू घरं अशी जमीन जातीय दंगलीचं पीक यायला चांगली असते. मोठे कारखाने, प्रगत तंत्रज्ञान, रुंद रस्ते, सिमेंटची अत्याधुनिक बांधणी, उत्पादनाचा वेग या सर्वात जातीयतेची धार कमी होते. अर्थात हे मर्यादित अर्थानंच खरं आहे गेल्या वर्षी मुंबईत झालेल्या दंगलीनं इतर सर्व दंगलीचं 'पाग' सव्याज फेडलं होतं की!

गच्चीवरून मधलं हिंदु बहुल क्षेत्र आणि भोवती गोलाकार पसरलेलं मुस्लिम बहुल क्षेत्र असा फतेपुरा दाखवताना मावशीनं सांगितलं, 'पण इथे आम्ही सुरक्षित आहोत. कारण त्या भागाला लागून असलेल्या घरामध्ये मराठा समाज रहातो. ती माणसही लाठ्याकाठ्या, तलवारी, सोडावॉटरच्या बाटल्या बाळगून असतात. तेही गुंड आहेत. त्याचेही दारूचे, जुगाराचे छुपे अड्डे आहेत. पोलिसांना त्याचे हप्ते जातात एरवी तसं आमचं त्याच्याबद्दल चांगलं मत नाही. ते छेडछाड करतात. पण अशी परिस्थिती उद्भवली की बरं वाटतं ते तिथं आहेत म्हणून आम्ही सुरक्षित आहोत' पोलीस प्रशासन आणि कायदा यापेक्षा चार घरं टाकून पलिकडे रहाणाऱ्या गुंडामुळे आम्हाला सुरक्षित वाटावं याला म्हणतात 'मध्ययुगीन' वातावरण अजब तुझे सरकार!

## दोन मे एकोणीसशे पंचाऐंशी
## मुक्काम बडोदा

अजब तुझे सरकारच्या कितीतरी रम्य, सुरस आणि चमत्कारिक गुजराती नाईट्सची इथे माहिती मिळते. सुजाण बुद्धिवादी माणसं जसे राज्यकर्ते–गुन्हेगारी जग याच्या 'अक्षा'ची माहिती देतात तसा कोणताही रस्त्यावरच्या चहाचा गाडा चालवणारा बाबा आपल्या सत्ताधीशाचं चारित्र्य चवीनं चघळत असतो. या कथेत कॉमेडी आणि ट्रॅजेडी असते सेक्स आणि व्हॉयलन्स असतो. हीरो आणि व्हिलन असतात. हिंदी चित्रपटातल्यापेक्षाही इथल्या कथा जास्त बटबटीत, भडक असतात लोक शपथ घेऊन या कथा सांगतात. त्यातला आबटशौकीन भाग वगळून– ( मात्र believe it or not, तो खरा असतो. एकेका सस्थानिकाची चारित्र्य जरा आठवा ना. आत्ताचे 'लोकशाही' सस्थानिकही यात मागे नाहीत.) सामाजिक राजकीय घडामोडींकडे पाहिले तरी अजब न्याय दृष्टोत्पत्तीस पडतात.

आत्ताचं हे राखीव जागाविरोधी आंदोलन सौराष्ट्रातल्या मोरवी–(घरणफुटीकरता प्रसिद्ध असलेलं तेच) मधून सुरू झालं. इथल्या इंजिनियरिंग कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांनी राखीव जागाच्या विरोधात संप केला. पुढे शैक्षणिक जगतानं हा संप उचलून धरला. योग्य वेळ पाहून राजकारणी नेत्यांनी यात प्रवेश केल्यावर आधी शैक्षणिक असलेलं हे आंदोलन राजकीय बनलं. त्याचा लबक 'मुख्यमंत्री हटाव' आणि 'राष्ट्रपती राजवट लागू करा' इथपर्यंत चढला. ही सगळी प्रक्रिया १९७४ मध्ये गुजरातमध्ये झालेल्या 'नवनिर्माण आंदोलना'ला इतकी समांतर आहे की त्यातूनच आतासुद्धा नवनिर्माण समित्या स्थापन करायची कल्पना पुढे आली. या नवनिर्माण आंदोलनाविषयी मनात खूप आदर घेऊन इथे आलो होतो. कामाचा दुसराच दिवस; पण 'नवनिर्माण' शब्दाची थट्टा, एक फार्स म्हणजे ते आंदोलन, असं चित्र आज दहा वर्षानंतर दिसतंय.

गंमत म्हणजे हे आंदोलनही सुरू झालं मोरवीच्या इंजिनियरिंग कॉलेजपासून. मेसची फी वाढल्याच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाचं वारं गुजरातभर पसरलं. युवकाची एक भ्रष्टाचारविरोधी चळवळ उभी राहिली विद्यार्थ्यांनी या चळवळीचं सूत्रं आपणहून पु. ग. माळवणकरासारख्या सुज्ञ, स्वच्छ नेत्याच्या हाती सोपवली मनीषी जानी, प्रकाश रावळ, मुकेश पटेल आणि उमाकांत माकड हे विद्यार्थी त्यावेळी जनतेच्या गळ्यातले ताईत बनले होते. कोणतीतरी नवी, परिवर्तनशील स्वच्छ प्रकाश देणारी युवक चळवळ गुजरातमधून उदयाला येते आहे असं तिचं रंगरूप होतं. स्वातंत्र्योत्तर

काळात ज्या प्रकारच्या लोक आंदोलनाचं स्वप्न गांधीजींनी पाहिलं होतं, ते सत्यात अवतरतय, असं त्या दिवसामध्ये वाटलं होतं. स्वातंत्र्य मिळाल्यावर लोकशाही राज्यपद्धती स्वीकारण्यात भारतासारख्या देशापुढे फार मोठा धोका होता. मोठ्या प्रमाणावर साक्षरता, सुशिक्षितता किमान आर्थिक स्तर आणि जागृत लोकमत हे लोकशाहीच्या यशाला आवश्यक घटक. १९४७ साली यातलं काहीच आपल्याकडे नव्हतं- तरी ब्रिटिश राज्यानं सोडलेला वारसा आणि स्वातंत्र्याच्या सेनानींनी स्वेच्छेनं केलेली निवड यातून भारत 'जगातलं सर्वांत मोठं लोकशाही राष्ट्र' बनलं. यातला धोका उघड होता. तो ओळखूनही तो पत्करायला हवा, असं सांगताना गांधीजी मोठ्या आशेनं म्हणाले होते की, आत्ताच्या नेत्यांनी जर लोकशाही योग्य तऱ्हेनं रुजवली, जोपासली नाही, तर आजपासून पचवीस वर्षांनंतर जी नवी पिढी समाजजीवनात उतरेल, ती लोकशाहीचे लढे उभे करील. लोकशाही स्वीकारण्यातला धोका काही अर्थांनी खरा ठरला. आपल्याकडे दिवसेंदिवस विशेषतः पंडितजींनंतर लोकशाही हा फार्स बनत गेला, बाहेरचा सांगाडा राहिला, आत्मा हरवला, पण महात्माजींची आशाही खरी ठरली. नव्या पिढीनं याविरुद्ध लोकांचा लढा संघटित केला. लढा उभा करणारे हे सगळे तरुण, सुशिक्षित स्वच्छ होते. त्यांना मावळणकरांचं नेतृत्व हा योग्य आधार होता. त्याचवेळी जगभरही विद्यार्थी-चळवळी गाजत होत्या; पण त्यात नवनिर्माण आंदोलन सर्वांत मूलगामी ठरेल. 'नवनिर्माण' हा शब्द पोरांनी जयप्रकाशजींच्या भाषणातून उचलला. नवनिर्माण आंदोलनानं गुजरातमध्ये सत्ताबदल घडवून आणला, 'जनता आघाडी'चा प्रयोग शक्य बनवला आणि जकप्रकाशजींना राष्ट्रीय युवक चळवळीच्या नेतृत्वस्थानी आणून उभे केले. पुढे ही मशाल बिहारमध्ये पोचली छात्र युवा संघर्ष वाहिनीचं आंदोलन, देशभर असंतोषाचा उद्रेक, आणीबाणी, निवडणुका, जनतापक्षाचा ऐतिहासिक विजय हा सर्व इतिहास आहे त्याचं बीज, उगमस्थान असलेली ७४ मधली नवनिर्माण चळवळ.

## कसलं नवनिर्माण ?

तर आता दहा वर्षांनंतर ? त्यावेळचे बहुतेक विद्यार्थी नेते आता आपापल्या उद्योगात तरी मशगुल आहेत किंवा त्याहून अजब म्हणजे कॉंग्रेसमध्ये आहेत. उदाहरणार्थ मनीषी जानी. उमाकांत माकड हे युवक कॉंग्रेसचे नेते (उमाकांत माकडला २० एप्रिल रोजी संतप्त जमावाने धरून बेदम मारले आता माकडने सोळंकींना खाली उतरवायची प्रतिज्ञा घेतली आहे असं 'गुजरात समाचार' मध्ये आलं होतं) आणि त्यावेळी भ्रष्टाचाराकरता ज्यांना मुख्यमंत्रीपदावरून खाली उतरावं लागलं ते श्री चिमणभाई पटेल, त्यांच्याच विरोधात स्थापन झालेल्या जनता पक्षाचे नेते आहेत, विरोधी आघाडीचे सूत्रधार आहेत, सोळंकी सरकारवर अकार्यक्षमता, भ्रष्टाचार इ... आरोप करतायत ! हे अजब सरकार. त्यातला उपहास ध्यानात आणून देण्यासाठीच पहिली भेट बहुधा दादूमियांची झाली असावी नवनिर्माण आंदोलनाच्या असलेल्या एका उदात्त प्रतिमेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या व्हायला सुरुवात झाली.

'अहो कसलं नवनिर्माण ! मुख्यमंत्र्याला खाली खेचायचं एक निमित्त फक्त चिमणभाई पटेलनं मोठं महत्त्वाकांक्षी नर्मदा प्रॉजेक्ट हाती घेतलं होते. पडेल ती किंमत देऊन ते पुरं करायचा चंग बांधला होता. त्याला केंद्राची मान्यता, आजूबाजूच्या राज्यांचं सहकार्य सगळं काही मिळवलं होतं. तेव्हा त्यांच्या पार्टीतल्याच हितशत्रूंना भीती वाटली की हे प्रॉजेक्ट मार्गी लागलं तर हा आपल्या डोक्यावर कायमचा बसणार. रतुभाई अदाणी त्यावेळी कॉंग्रेसमध्ये होते त्यांचं वाक्य आहे, 'अरे हा तर अमर होईल !' कारण नर्मदा प्रॉजेक्ट पुरं झाल्यास गुजरात हा दुधामधाचा प्रदेश बनला असता. त्याचं श्रेय चिमणभाईला. ते जायला नको म्हणून याच लोकांनी पोरांना हाताशी धरून आंदोलन पेटवलं. भ्रष्टाचाराच्या बातम्या पुरवल्या 'तसा गुजरातचा कोणता मुख्यमंत्री भ्रष्ट नव्हता ?' माझ्या मनात प्रश्न- 'बाबूभाई पटेल ?' तेवढ्यात तेच म्हणाले, अपवाद फक्त बाबूभाई जसभाई पटेल यांचा अन् हे सगळं मी आजच सांगतोय असं नाही. ऐन ७४ मध्ये आंदोलनाच्या काळातसुद्धा मी हे असंच लिहिलं होतं.'

'या कसं काय, कधी आलात ?' असं अगदी हृद्य घरगुती स्वागत केल्यावर डॉ. नेने अर्थात दादूमियांनी कसल्याही औपचारिकतेशिवाय मुख्य विषयाला स्पर्श केला. 'तुम्ही मुख्य गुजराती मनोवृत्ती ध्यानात घ्या ती समजली तर इथल्या घडामोडी तुमच्या बरोबर लक्षात येतील. आम्ही लोक रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत बनिये आहोत. तुमच्या महाराष्ट्रीयन संकल्पना काही काळ बाजूला ठेवा. गुजरात हा भारताचा सर्वांत समृद्ध प्रांत. त्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी संघर्ष चालणारच की. आपल्या कारकिर्दीत तो स्वतःची चांदी करून घेऊ शकतो त्याला काही प्रमाणात डिस्काऊंट द्यायलाही लोक तयार असतात. पण लोकांनाही लगेच next change हवा असतो ते म्हणतात यानं पुरेसं कमावलं आता थोडं आमचही पहा की. इथं पचवीस वर्षांत चौदा सरकारं झाली. पाच वर्षांची टर्म पूर्ण करू शकलेले फक्त हितेंद्र देसाई आणि माधवसिंग फुलसिंग सोळंकी बस्स. आता मुख्यमंत्री बदलायचा म्हणजे आंदोलन लागतंच की नाही ? त्याला यावेळी निमित्त आहे राखीव जागा विरोधाचं

'इथे मसुराश्रमाचे वामनमूर्तीजी मला भेटायला आले होते. त्यांनी सुचवलं राखीव जागांच्या टक्केवारीवर भांडत बसण्यापेक्षा इथल्या उद्योगपतींनी खाजगी इंजिनियरिंग, मेडिकल कॉलेजेस काढावीत महाराष्ट्रात ही प्रक्रिया सुरू झालीच आहे शिवाय इथे तशी भांडवलाची उणीव नाही. पण मी त्यांना सांगितलं की, राखीव जागांचा प्रश्न हे फक्त कव्हर आहे महाराष्ट्रातली मनोवृत्ती मुख्यतः नोकरदार-त्यातही मुख्यतः मध्यमवर्गीय आहे. इथे व्यापारी मेंटॅलिटी आहे गुजरातीं चातुर्वर्ण्यात नुसते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वगैरे नततात. ब्राह्मण-बनिया, क्षत्रिय-बनिया, वैश्य-बनिया असतात.

'त्यामुळे 'next change' याशिवाय या आंदोलनाला तसा सैद्धांतिक पाया काही नाही राखीव जागाविरोधी आंदोलन ही मिथ आहे म्हणजे या इश्युला काही अर्थच नाही असं मात्र नाही.

**त्यावेळचे विद्यार्थी नेते आपापल्या उद्योगात तरी आहेत किंवा कॉंग्रेसमध्ये आहेत**

लोकाच्या भावना या विषयावर जागृत आहेत. मी इतकच सांगतोय की त्या भावनांचा बनिया-राजकारणासाठी बरोबर वापर करून घेतला आहे.'

डॉ नेने गुजराती स्वभावरचनेची बाह्य रूपरेषा देत होते. म्हणून मी विचारलं, 'मराठी स्वभावरचनेच्या मिश्रणातून काही वेगळं कॅरॅक्टर निर्माण झालय का?' 'छे, मराठी माणूस इथं आला की गुजराती कॅरॅक्टरचा बनून जातो.' हे सांगताना एक मनोरंजक गोष्ट त्यांनी सांगितली.

मराठ्यांच पहिलं ठाणं बडोद्याच्या जवळ डभई इथे होतं. बडोद्यात एक मुस्लिम सत्ताधीश होता. त्याची नजर इथला एक सरदार दला पटेलच्या दोन सुंदर मुलीवर पडली. तेव्हा धोका ओळखून दला पटेल डभईला मराठ्यांकडे मदत मागायला गेला. त्यावेळी थोरल्या बाजीरावानं नुकताच दाभाड्याचा पराभव करून गायकवाडांना इथला सुभेदार म्हणून नियुक्त केलं होत. गायकवाड मदतीला आले. त्यांनी त्या मुस्लिम सरदाराचा पराभव केला. त्यानंतर कृतज्ञतेच प्रतीक म्हणून दला पटेलनं आपल्या दोन्ही मुली गायकवाडापुढे सादर करून सांगितलं-तुम्हाला पसंत असेल ती निवडा अहो, तो मराठी सरदार, त्याला हा गुजराती स्वभाव परिचित नव्हता, तो संतापला, म्हटला, मी काय यासाठी आलो का, माझं काम झाल आता मी परत जातो. तेव्हा दला पटेलनं माफी मागितली. पण विनंती केली की, निदान तुम्ही रहा तरी इथे, तुम्ही गेलात तर तो सरदार परत येऊन मला खाईल. ही विनंती मान्य करून गायकवाडांनी आपला तळ डभईहून बडोद्याला हलवला.

## राखीव जागांबाबत

मराठी राज्याच्या खुणा मात्र बडोदा अभिमानानं मिरवतं. विशेषत: 'सयाजी महाराज' हा इथल्या लोकांचा जिव्हाळ्याचा विषय. लोक म्हणतात मराठे सरदार इथे येऊन इथले बनले, आमच्यातलेच झाले. सयाजी महाराजानी तर आमच्याकरताच जीवन व्यतीत केलं. सयाजीराव वास्तविक गायकवाडाचा दत्तकपुत्र. ज्यांना दत्तक घ्यायच म्हणून मुलाखतीसाठी बोलावलं होत त्यांना विचारलं जायचं 'इथं कशाला आलास?' या पोरानं छाती काढून उत्तर दिलं 'राजा व्हायला.' ताबडतोब दत्तकपुत्र म्हणून त्याला निवडण्यात आलं. या प्रौढ, नवी संवेदना घेतलेल्या अभिजात राजानं आधुनिक बडोदा घडवलं. योगी अरविंद, डॉक्टर आंबेडकर यांच्यासारखे हिरे टिपले, जोपासले. गुजरातमधली दलित मुक्ती चळवळ सुरू करायचही श्रेय सयाजीराव गायकवाडांनाच दिलं जातं.

'पण महाराष्ट्रातल्याप्रमाणं इथं दलित चळवळ बहरली नाही. त्याच सर्वात महत्त्वाचं कारण इथल्या नेतृत्वाची 'खरेदी-प्रवणता.' डॉ नेने सांगत होते, 'अहो आमच्या इथे आंबेडकर पैदा होऊच शकत नाही आणि शिवाय गांधी फॅक्टर इथे जास्त प्रभावी होताच. आता कुठे त्यावर मात करून आंबेडकरांशी नातं सांगणारी दलित चळवळ इथे उभी राहू लागली. पण त्यातही विक्रेय मालच जास्त.'

अशा किती तरी गप्पा चालू राहिल्या. त्यांनी फटाफट महत्त्वाची नावं, पत्ते दिले, उभ्या उभ्याच त्यांचे फोन नंबरही धडाधड सांगितले. दलित विचारवंत श्री लेहुआ यांना फोनही त्यांनीच लावून दिला. फोनवरून लेहुआनी मला विचारलं, 'कोणत्या नंबरवरून बोलताय?' म्हणून मी डॉक्टरांना फोन नंबर विचारला तर ते विचारात पडले आणि मग म्हटले 'अग, काय आहे ग आपला नंबर?' कॅनव्हासवर काही मुख्य ठळक फटकारे उमटवून कुशल चित्रकारानं रूपरेषा स्पष्ट करावी तशी डॉक्टरांची भेट झाली. पुढचे रंग समजावून घेऊन भरायला मोकळा झालो. डॉक्टरांनी सांगितलच होतं, 'राखीव जागाविषयक सर्व सैद्धांतिक बाजू लेहुआ तुम्हाला उत्कृष्टपणे समजावून देतील, गुजरातमधल्या दलित बुद्धिवाद्यांमध्ये 'विकाऊ' नसलेला असा हा प्रामाणिक माणूस आहे तरीही माधवसिंगचा दोस्त आहे सोळंकींना रोस्टर पद्धती त्यांनीच समजावून सांगितली'

'लगेच या' असा निरोप दिल्यावर श्री. लेहुआ दारात वाट पहात थांबले होते. समोरच्या टीपॉयवर राज्यघटनेची प्रत होती, शेजारी मागासवर्गीयांसाठी विशेष घटनात्मक सवलतींवर शासनानं प्रकाशित केलेली पुस्तिकापण होती. त्याचं कागदावर काही टिपणं काढणं चालू होतं. श्री लेहुआ, B A. LL.B. व्यवसायानं अॅडव्होकेट. त्याचं शिक्षण मुंबईच्या गव्हर्मेंट लॉ कॉलेजमध्ये झालं. तेव्हा बाबासाहेब स्वतःच त्याचे प्राचार्य होते. समतेचे विचार लेहुआनी थेट डॉक्टरांकडूनच उचलले. मागासवर्गीयासाठी सरकारनं आखलेल्या विविध योजना, संस्था यांच त्यांनी चालकत्व भूषवलं. घटनात्मक तरतुदींचे यथायोग्य पालन होत आहे अथवा नाही, याविषयी राष्ट्रपतींना नियमित अहवाल पाठवण्याच कामही त्यांच्याकडे होतं. त्यामुळे त्यांना देशभर सतत फिरावं लागलं अर्थातच देशभरच्या दलित चळवळीचा तोंडावळा त्यांना परिचित आहे. प्रत्यक्ष फिल्डवर काम करण्याच्या योजनांतही ते बिहार, ओरिसा, महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश अशा अनेक प्रांतामध्ये राहिलेत पण त्यांनीच सांगितलेल्या या सर्व क्वालिफिकेशन्सपेक्षा मला जाणवली, महत्त्वाची वाटली ती चेहऱ्यावर उमटलेली वेदना. वेदनेच प्रमाणपत्र हे सर्वात सखोल चिन्ह या वेदनेत नुसता भडक विद्रोह वाटला नाही. कदाचित हॉलमध्ये महात्माजी आणि डॉक्टर यांच्या तसबीरी समोरासमोर लावलेल्या होत्या म्हणून असेल किंवा फोनच्यावर गायत्रीमंत्राची तबकडी चमकत होती म्हणून असेल; नंतरच्या सर्व बोलण्यात, वास्तविक त्यांनी भडक, अतिरेकी मुद्दे मांडूनसुद्धा, कुठेही आक्रस्ताळेपणा जाणवला नाही म्हणून असेल. किंवा कदाचित त्यांच्या सौ. नी 'बेटे' म्हणून चौकशी केल्यामुळे असेल. पण त्यांच्याशी झालेला संवाद 'जायते तत्त्वबोध' असा वाटला.

प्रथम त्यांनी राखीव जागामागची सैद्धांतिक घटनात्मक भूमिका स्पष्ट केली घटनेच्या तिसऱ्या भागत मूलभूत हक्कांचा तपशील आहे. त्यातील कलम १४, १५, १६ ही मागासवर्गीयांना (सर्वांनाच) सामाजिक, शैक्षणिक समतेचा हक्क देतात. भाग चारमध्ये सरकारसाठी आखून दिलेली दिशादर्शक तत्त्वे येतात. त्यातील कलम ४६ नुसार शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांसाठी विशेष सवलतींच्या योजना आखण्याचा सल्ला सरकारला देण्यात आला आहे कलम ३३५ नुसार राजकीय क्षेत्रातली राखीव जागांची व्यवस्था बनते. त्यानुसार प्रशासनाच्या सर्व स्तरावर- थेट लोकसभेपर्यंत- मागासवर्गीयांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून राखीव जागांची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. निवडणुकामधल्या राखीव मतदारसंघांचा घटनात्मक आधार हा आहे. लेहुआंच्या मते ही पाच कलमं मिळून मागासवर्गीयांचं घटनात्मक 'पंचशील' तयार होतं.



**भगतसिंगच्या पुतळ्यापाशी एका मोर्चाची सुरुवात – बडोदा**

त्यापैकी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातली राखीव जागांची व्यवस्था हा एक भाग. राजकीय क्षेत्रातली राखीव जागांची व्यवस्था हा दुसरा भाग. या दुसऱ्या भागाला दहा वर्षांची कालमर्यादा होती. संसदेला दर दहा वर्षांनी या मुदतीचे नतनीकरण करण्याचा हक्क आहे. तो वापरून आता राखीव मतदारसंघांची तरतूद १९९० पर्यंत वाढवण्यात आली आहे.

राजकीय क्षेत्रातल्या या राखीव जागाच्या व्यवस्थेचा धागा गांधी–आंबेडकर यांच्यात १९३२ मध्ये झालेल्या पुणे कराराशी जाऊन भिडतो. दलितांना हाताशी धरून भारतीय राष्ट्रवाद आणि राष्ट्र विघटित करायचा डाव १९३२ च्या 'जातीय निवाडया'त मांडला होता. हा निवाडा लेबर सरकारचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्डनं जाहीर केला. त्यानुसार हरिजनांसाठी (मुसलमान, शीख इ. साठी सुद्धा) स्वतंत्र मतदारसघांची तरतूद करण्यात आली. यातला धोका महात्माजींनी ओळखून येरवड्याच्या जेलमध्ये उपोषण आरंभलं. बाबासाहेबांनाही आपल्या राष्ट्रीय इतिहास परंपरेचं भान होतं, हे गोलमेज परिषदेत त्यांनी मांडलेल्या भूमिकांमध्ये दिसते. काँग्रेसशी व्यवहार करताना बाबासाहेबांनी दलितांच्या हिताचं प्रतिनिधित्व केलं तर ब्रिटिशांशी व्यवहार करताना सतत राष्ट्रीय हिताचंच प्रतिनिधित्व केलं. ब्रिटिशांच्या डावाला परस्पर शह देण्यासाठी गांधी आणि आंबेडकर यांच्यातच असा करार ठरला की, लोकप्रतिनिधींपैकी ठराविक जागांवर दलित उमेदवारच उभे केले जावेत, हरिजन सेवक संघ स्थापन केला जावा आणि संपूर्ण काँग्रेसने अस्पृश्योद्धाराचा कार्यक्रम हाती घ्यावा. ही राजकीय क्षेत्रातल्या राखीव जागांची सुरुवात. बाबासाहेबांनी घटना तयार करताना तिला कालमर्यादा घालून कायदेशीर स्वरूप दिले.

लेहुआ कटाक्षानं आठवण करून देतात की, राखीव जागांची कालमर्यादा केवळ राजकीय क्षेत्रापुरतीच आखली आहे. हे विसरून मुद्दाम राखीव जागाविरोधक गहजब करतात की, सर्वच क्षेत्रांसाठी ही दहा वर्षांची कालमर्यादा होती. प्रत्यक्षात सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांमधील राखीव जागांसाठी अशी ठरीव कालमर्यादा नाही.

यापुढे 'मागासवर्गीय' हा शब्द पारिभाषिक अर्थानं वापरताना त्यात तीन गट येतात हे लक्षात ठेवायला हवं. Scheduled Caste, Scheduled Tribes आणि Socially & educationally Back–ward Classes ( SC, ST, SE BC किंवा OBC=Other BC ) म्हणजेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अन्य मागासवर्गीय यांनाच सर्वसाधारणपणे हरिजन, गिरीजन, अन्य मागासवर्गीय असे शब्द वापरले जातात. गिरीजन म्हणजेच आदिवासी किंवा वनवासी. शब्दांचा घोळ होऊन तथ्ये समजावून घेण्यात फरक पड नये यासाठी हे ध्यानात ठेवायला हवे.

गुजरातमध्ये हरिजन व गिरिजनांसाठी लोकसंख्येच्या ढोबळ प्रमाणात म्हणज अनुक्रमे ७ आणि १४ टक्के अशी राखीव जागांची व्यवस्था होती. अन्य मागासवर्गीयांसाठी अशी तरतूद नव्हती. ती करावी यासाठी १९७२ मध्ये बक्षी आयोग ( गुजरातीत बक्षी पंच) नियुक्त करण्यात आला. १९७६ मध्ये या आयोगाने अहवाल सादर

केला. त्यात गुजरातमधील ८४ जातीचे वर्गीकरण 'अन्य मागासवर्गीयां' मध्ये केले होते. १९७८ मध्ये जनता आघाडीचे मुख्यमंत्री बाबुभाई पटेल याच्या सरकारने तो स्वीकारून अन्य मागासवर्गीयासाठी जादा १० टक्के (लोकसंख्येच्या प्रमाणात नव्हे) राखीव जागाची तरतूद केली. म्हणजे एकूण राखीव जागा ३१ टक्के झाल्या.

## राणे आयोग


बक्षी आयोगाच कार्यक्षेत्र गुजरातपुरतं मर्यादित होतं मंडल आयोगाच्या कार्यकक्षेत सपूर्ण देश येत होता. पण १९८० त परत सत्ताबदल झाल्यामुळे मडल आयोग बाजूला पडला गुजरातमध्ये पुन्हा सत्तेवर आलेल्या काँग्रेस सरकारने राणे आयोग नेमला. अर्थातच कार्यकक्षा फक्त गुजरात बक्षीप्रमाणे राणेही गुजरात हायकोर्टचे निवृत्त न्यायाधिश होते. ते चेअरमन होते. दुसरे सदस्य होते प्रा. ईश्वरभाई देसाई–दक्षिण गुजरात विद्यापीठातले समाजशास्त्र शाखेचे विभागप्रमुख आणि अभ्यासू मार्क्सवादी विचारवंत. तिसरे, प्रा. जितेंद्र ढोलकिया–गुजरात विद्यापीठात अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख. चौथा सदस्य सरकारनियुक्त सनदी नोकर होता. राणे आयोगाला ज्या अटी terms of reference आखून देण्यात आल्या होत्या, त्यातली सर्वात महत्त्वाची म्हणजे–बक्षी पच मध्ये समाविष्ट न झालेल्या अन्य मागासवर्गीयांसाठी राखीव जागांची तरतूद करण्याविषयी योजना सुचवणे राणे आयोगाने ३१ ऑक्टोबर ८३ रोजी अहवाल सादर कला. १० जाने. ८५ पर्यंत सरकारने तो प्रसिद्ध केला नव्हता. १० जानेवारीला तो प्रसिद्ध न करताच, त्या आयोगाच्या अहवालाच्या आधारे अन्य मागासवर्गीयांसाठी राखीव जागाची तरतूद १० वरून, २८ टक्क्यावर नेण्याची घोषणा करण्यात आली.

म्हणजे पुढे गुजरातमध्ये उठलेल्या वादळाच वैचारिक मूळ राणे आयोगात आहे. त्यामुळे ह्या आयोग काय आहे हे नीट समजावून घ्यायला हवं. केवळ दिलेल्या अटीपुरत्या कार्यकक्षा मर्यादित न ठेवता राणे आयोगान जातीयतेच्या प्रश्नाचा वेगळ्या भूमिकेतून विचार करायचं ठरवलं म्हणून 'मागासवर्गीया' ची व्याख्या करताना शैक्षणिक व सामाजिक निकषांपेक्षा आर्थिक निकषाचं प्राधान्य मानल जावं हे तत्त्व राणे आयोगानं स्वीकारल. वीस व्यवसाय आर्थिकदृष्ट्या मागासलेले ठरवून त्यांच्यासाठी राखीव जागाची सवलत असावी अशी योजना सुचवली. त्या व्यवसायातून प्राप्त होणारे वार्षिक उत्पन्न दहा हजाराहून कमी हवे हा आर्थिक निकषही 'मागासवर्गीय' ठरवताना मानला गेला होता ही राणे आयोगाची, भाष्य न करता असलेली, तोडओळख. सैद्धातिक वाद-प्रतिवाद आणि रस्त्यावरच आदोलन यातूनच उभं राहिलं

श्री. लेहुआ म्हणतात–मुळात राणे आयोगानं ठरवून दिलेल्या अटींबाहेर जाऊन काम केलं. पण आर्थिक निकषाला प्राधान्य देण्याच्या मुद्यामुळं राखीव जागा विरोधकाच्या हातात एक कोलीत दिलं. कारण या निकषानुसार ब्राह्मणही 'मागासवर्गीय' ठरू शकतो. म्हणजेच राणे आयोगात घटनाबाह्यता ही आहे कारण घटनेत 'मागासवर्गीय' ठरवताना समूह अथवा गट हे युनिट मानण्यात आले आहे तर राणे आयोगानं 'व्यक्ती' हे युनिट मानले. भारतीय समाजव्यवस्थेत 'समूह' म्हणजे जात ओळखण सोपं आहे; पण मागासवर्गीयतेची व्याख्या करायला 'व्यक्ती' ओळखणं अशक्य आहे, त्यामुळे राणे आयोगाची व्यावहारिक अमलबजावणी अशक्य आहे असं श्री. लेहुआंचं मत. ते म्हणतात की, आर्थिकदृष्ट्या विकसित झाला तरी दलित जातीतली व्यक्ती सामाजिकदृष्ट्या दलितच रहाते. उदाहरणार्थ, जगजीवनराम किंवा KR नारायणन् यांच्यासारख्या व्यक्तीनासुद्धा अजूनही 'राखीव' मतदारसघातून निवडणूक लढवावी लागते. म्हणजे सामाजिकदृष्ट्या ते दलितच आहे. सामाजिक समता स्थापन करणं हा घटनेचा हेतू असल्यामुळे राखीव जागा सामाजिक निकषावरच असाव्यात हे त्याचं मत.

आत्ताच्या आंदोलनाच बीज कुठे आहे ? श्री. लेहुआ इंदिराजी आणि राजीवजी याच्याकडे बोट दाखवतात. इंदिराजी असताना म्हणे जम्मूतल्या कोणत्या तरी भाषणात 'राखीव जागा योजनेच्या पुनर्विचाराच्या' आवश्यकतेविषयी बोलल्या होत्या. (हे इंदिराजींचं जम्मूतलं भाषण ही भानगड आहे तरी काय ? काश्मिरमध्ये याच भाषणाचा संदर्भ देत इंदिराजीविरोधक त्याच्यावर त्या 'हिंदुवादी' झाल्याचा आरोप करायचे) नंतर राजीवजीनीही त्याच सूत्राचा पुनरुच्चार केला. काँग्रेसच्या निवडणूक जाहिरनाम्यात आणि सातव्या पचवार्षिक योजनेतही राखीव जागांचा पुनर्विचार करण्याचं कलम आधी होतं. ते नंतर गाळण्यात आल; पण समझनेवालेको इशारा काफी होता है संबंधित घटकानी हे जोखलं की, सदर इश्युवर दबाव आणल्यास दबायला सरकारची तात्त्विक तयारी आहे. मग आंदोलन उभं राहिलं. त्यामुळेच राखीव जागा ४९ टक्के करण्याचा निर्णयही सोळकींनी चटकन् स्थगित केला. वास्तविक यानंतर तरी विरोधी आदोलन थांबायला हवं होतं. शिवाय श्री. लेहुआंनी Statistics देऊन सांगितलं की, राखीव जागाची तरतूद ३१ टक्के ची असली तरी १५ टक्केहून जास्त जागा कधीच भरल्या गेलेल्या नाहीत. १९८१ मध्ये मोकळ्या रहाणाऱ्या जागांना 'पुढे चालू' देण्याची पद्धत रद्द करण्यात आली होती. त्यामुळे भरल्या न गेलेल्या जागा सर्वसाधारण कोट्यात जमा होतात आणि उच्चवर्णियाना मिळतात. त्यांनी तक्रार करायचं काहीच कारण नाही. पण श्री. लेहुआ यांचा आरोप आहे की, तरीसुद्धा आदोलन चालू आहे कारण तेवढ्या १५ टक्के जागासुद्धा दलिताना मिळू देण्यास उच्चवर्णियांचा विरोध आहे, त्याना राखीव जागाच रद्द करायच्यात. दलितांना जेवढं मिळतंय तेवढही उच्चवर्णियाना पाहवत नाही ब्राह्मण, बनिया, पटेल या गुजरातमधल्या मुख्य उच्च जाती. गुजरातवर आर्थिक प्रभुत्व याच जातींचं आहे ते तसंच रहावं यासाठी राखीव जागा विरोधी आंदोलन चालू आहे. उद्योगव्यवसाय त्याच्याच ताब्यात असल्यामुळे 'गुजरात बंद' चा कौल मिळताच गुजरात बद होतो. शिक्षणसंस्थांतरही उच्चवर्णियाचच प्रभुत्व आहे त्यामुळे राखीव जागाविरोधातप रीक्षा स्थगित होतात इतकच काय पण गुजरातच वृत्तपत्र जगही ब्राह्मण बनिया-पटेल 'जातीच्याच हातात आहे त्यामुळे पेपरातही राखीव जागाविरोधी आदोलनाला अनुकूल बातम्या येतात. दलितांचा आवाज उमटायला माध्यम नाही.

अशा परिस्थितीत राखीव जागांच्या व्यवस्थेमुळे मागासवर्गीयांना आर्थिकदृष्ट्या वर येण्यासाठी संधी उपलब्ध होऊ लागल्या. खाजगी क्षेत्र सवर्णांच्याच ताब्यात असल्यामुळे तिथे नोकऱ्या मिळणं अवघडच होतं. म्हणजे राहिलं सरकारी क्षेत्र. विविध कचेऱ्या, मेडिकल इंजिनिअरिंग कॉलेजस्, तांत्रिक शिक्षण देणाऱ्या सरकारी संस्था,



¤
राखीव जागा पुतळ्याला फाशी
¤

हॉस्पिटल्स वगैरे. सावकाशपणे इथे मागासवर्गीयांना स्थान मिळू लागल्यावर दोन बाबी झाल्या– एक : सवर्णांची आर्थिक मगरमिठी सैल होऊ लागली आणि दोन : अनेक ठिकाणी सवर्णांना मागासवर्गीयांचे पाय धरायची गरज निर्माण होऊ लागली.

उदाहरणार्थ, १९८१ चं राखीव जागा विरोधी आंदोलन पहा. ते डॉक्टर लोकांनी सुरू केलं. पदव्युत्तर पातळीला राखीव जागा असू नयेत अशी त्यांची मागणी. का ? तर मागासवर्गीय डॉक्टर्स सरकारी हॉस्पिटलसमध्ये नोकऱ्या मिळवतात, त्यामुळे उच्चवर्णीय डॉक्टरांचं मानधन जातं, अनेक ग्राहकही जातात आणि पदव्युत्तर शिक्षण घेऊन जर मागासवर्गीय डॉक्टर कॉलेजात प्राध्यापक झाला तर आपली मुलं पास करून घ्यायला त्याच्यापुढे वाकावं लागेल. पण हे सगळं असंच्या असं कसं मांडणार ? म्हणून मग गुणवत्तेचा निकष मानण्याची– मेरिटोक्रसीची– आर्ग्युमेंटस् पुढे आली. ते म्हणतात, दलित विद्यार्थ्याला गुणवत्ता मिळवायला ज्या सर्व सोयी उपलब्ध हव्यात त्या निर्माण करा; पण गुणवत्तेवर तडजोड नसावी आता मला सांगा की, आपल्या समाजात अजूनही इतकी विषमता आहे की, कितीही सोयी निर्माण केल्या तरी दलित विद्यार्थी मेरिटवर उच्चवर्णियाशी अजूनही फार टिकू शकत नाही. राखीव जागांची म्हणून आवश्यकता अजून संपलेली नाही.

शिवाय या व्यवस्थेमुळे आर्थिकदृष्ट्या आम्ही उच्चवर्णियांच्या थोडेफार तरी जवळपास आलो तरी समतेचा प्रवाह अधिक गतिमान बनेल. आर्थिक स्तर समान झाल्यास परस्परातले रोटीबेटी व्यवहार सुकर होतील. आताही काही प्रमाणात हे दृश्य दिसतंच. दलित इंजिनियर किंवा डॉक्टरचा विवाह सवर्ण मुलीशी होऊ शकतो. आताच्या आंदोलनामुळे मात्र या सर्व प्रवाहात अडथळा निर्माण होतो. दलितांमध्ये अविश्वास आणि भीती निर्माण होऊ लागली आहे.

मघाशी श्री लेहुआ म्हणाले होते, 'आर्थिकदृष्ट्या सबळ झाला तरी दलित सामाजिकदृष्ट्या दलितच रहातो.' आताचा मुद्दा त्याला छेद देणारा, विरोधी वाटत होता. त्यावर चर्चेचा काथ्याकूट करायचं काहीच कारण नाही. मुख्य आशय ध्यानात घ्यायचा प्रयत्न करायला हवा. गुजरातमध्ये चालू असलेल्या सामाजिक प्रक्रियेतून परस्परांबद्दल अविश्वास आणि भीती निर्माण होत असेल तर ? मी विचारलं 'वर्गयुद्ध–जातीयुद्ध या कल्पनांविषयी तुम्हाला काय वाटतं ?' आतापर्यंतच्या मुलाखतीचा, विचारविनिमयाचा सूर पहाता या कल्पना कल्पनेतच राहिलेल्या बऱ्या, अशा स्वरूपाचं उत्तर येईल अशी अपेक्षा होती. पण बंदुक मोकळी आहे असं समजून सहज गंमत करायला ट्रिमर दाबावी आणि फाडकन् आवाज करत गोळी सणाणत सुटावी तसं उत्तर आलं 'वर्गयुद्ध ? आम्हाला हवं आहे. होणारच आहे. कारण–मार्क्सच्या पद्धतीनं म्हणायचं झालं तर we have nothing to loose but backwardness.' त्यामुळे मी म्हणतो की वर्गयुद्धासाठी 'Dalits of India Unite !'

¤

मुलाखत संपली तेव्हा टळटळीत दुपार होती. उन्हाची तलखी जाणवत होती आणि आता इथे तापू लागलेल्या वातावरणाची नांदीही मंद मंद जाणवत होती. 'केवळ-सत्तेचं राजकारण' नंतर आलेल्या या अर्थान्वेषणानं थेट वर्गयुद्धावर नेऊन सोडलं होतं, तर मग यामध्ये कुठे तरी सत्तेत असलेल्यांचा म्हणूनही काही अर्थबोध असणार. ते सर्व श्री. सनत मेहतांना विचारू या का ? एक सावधगिरीची सूचना आधीच मिळाली होती की, सनत मेहता राजकारणाविषयी काहीही बोलणार नाही. सनत मेहता हा गुजरातमधल्या कॉंग्रेसी राजकारणाच्या त्रिकोणाचा तिसरा कोन. माधवसिंग सोळंकी आणि प्रबोध रावळ हे आलेले दोन कोन हे दोन कोन सध्या एकमेकांविरुद्ध छुप्या अघोषित युद्धात गुंतलेले असताना तिसरा कोन अर्थपूर्ण मौनात असणं सहाजिक होतं. इतकंच काय पण सनत मेहता गुजरातमध्ये रहाणंच टाळत होते–इति काही स्थानिक पत्रकार. आधी काही दिवस ते मुंबईत चालले होते, त्याआधी दिल्लीत आणि आता परत मुंबईत चालले होते. ते सध्याच्या आंदोलनामागील

राजकारणात गुंतू इच्छित नाहीत. असं असून त्यांच्याशी गप्पा मारता आल्या हे नशीबच. गप्पा जशा झाल्या ते पहाता खरोखरच नशीब. राजकारणावर त्यानी मौन पाळणं समजू शकत होतो, म्हणून त्या विषयावर आम्ही तुम्हाला प्रेस करतही नाही असं सांगत वैचारिक बाजूवरच चर्चा सुरू केली. सनत मेहता या व्यक्तिमत्त्वाविषयी जी माहिती होती तिन ही दिशा सुचवली.

## सनत मेहता

श्री सनत मेहता मूळ लोहियांच्या पथातले समाजवादी. इंदिराजीनी सत्तेवर आल्यावर प्रारंभी, अँटीएस्टॅब्लिशमेंट हवेवर स्वार होत ज्या अनेक तरुण तुर्कांना पक्षात खेचलं, त्यातले सनत मेहता एक. रुपयाचं अवमूल्यन, बँकांचं राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणं आणि जुन्या बुजुर्गांना उचलून पक्षातून फेकून देणं, या सर्वांमुळे अनेक तरुण तुर्क 'इंदिराजीचे हात बळकट करायला' काँग्रेसमध्ये शिरले चंद्रशेखर, मोहन धारिया, लक्ष्मीकांत इ.... 'तुर्क' त्यातलेच. यथावकाश भ्रमनिरास होऊन अनेकजण इतर पक्षाकडे वळले. पण सनत मेहता नव्हे. उलट गुजरातचे अर्थमंत्री म्हणून त्यानी उत्कृष्ट काम केलं. पाच वर्षात उद्योगव्यवसायाच्या वाढीला गती दिली, भांडवल गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन मुंबईतल्या अनेक उद्योगपतींना गुजरातमध्ये उद्योगधंदे काढायला प्रवृत्त केलं बडोदा–अहमदाबाद औद्योगिक पट्टा यातून आणखीनच बहरला. त्यानंतर १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना तिकिट मिळालं नाही हसतमुखपणे सनत मेहता घरीच बसले आणि आमच्याशी गप्पा मारू लागले–

आताचं राखीव जागाविरोधी आंदोलन हे मुख्यत: इथल्या महत्त्वाकांक्षी मध्यमवर्गीयानी चालवलेलं आंदोलन आहे. या मध्यमवर्गाची इतर प्रांतापेक्षा निराळी अशी खास वैशिष्ट्यं आहेत. आर्थिक दृष्ट्या हा वर्ग सरकारवर अवलंबून नाही स्वत:चे व्यापारव्यवसाय आणि कारखाने हा या वर्गाच्या आर्थिक अस्तित्वाचा पाया त्यामुळे इथला मध्यमवर्ग शासनाची फारशी फिकीर करत नाही. राजकीय नेत्यांची लुडबूड त्याला आपल्या व्यवहारात नको असते. त्यामुळे अगदीच भिंतीत चेपल तरच तो रस्त्यावर येतो. (याचा काही राजकीय अर्थ काढायचा का?) पण जेव्हा रस्त्यावर येतो तेव्हा उद्रेकाचा स्फोटक आविष्कार घडतो कारण सरकार या वर्गाचं काहीही वाकडं करू शकत नाही.

गेले सुमारे एक दशकभर तरी गुजरात इतका वारंवार उसळून उठला आहे की, सहजच शंका येते की, गुजराती लोक जर शांतताप्रिय, मृदुभाषी म्हणून ओळखले जातात, तर मग ही आंदोलनं, त्यात पुन्हा पुन्हा भडकणारी हिंसा, हे कसं काय? गुजराती स्वभावरचनेशी याचा मेळ कसा घालायचा? का नवा स्वभाव घडतोय असं मानायचं? अशा प्रश्नांच्या उत्तरापैकी एक उत्तर–आर्थिक विश्लेषण–सनत मेहतांच्या बोलण्यात आपोआपच आलं. डॉ. नेनेंनीही एक मस्त वाक्य आपल्या स्टायलिश अदासहित ऐकवलं होतंच 'बंदुकीची गोळी उडते तेव्हा नुसती बंदूक कोणी चालवली हे विचारायचं नसतं, त्या काडतुसाचा पैसा कोणी पुरवला हे महत्त्वाचं असतं' तो पैसा या मध्यमवर्गीयाकडे आहे, त्याचा अखंड प्रवाह चालू रहाण्यासाठी सरकारवर अवलंबून रहावं लागत नाही. शिवाय ऐन कोपऱ्यात सापडल्यावर उलट तुटून पडायची खास मध्यमवर्गीय मनोवृत्ती. याची बेरीज करून आताच्या परिस्थितीशी तिचं त्रैराशिक मांडलं तर या हिंसाचाराचं, उद्रेकाचं बरंचसं अचूक उत्तर मिळतं. सनत मेहतांच्या मते या उद्रेकाचं बाह्य रूप चक्क पोलीस विरुद्ध लोक अशा युद्धाचं आहे

हे सहाजिक आहे. 'पोलीस' हे शासनाचं दृश्य रूप आहे. त्यामुळे जेव्हा निषेधाचा आवाज उठवायचा असतो तेव्हा बिनचेहऱ्याच्या प्रशासनावरचा राग पोलिसांवर निघतो. प्रचलित परिस्थितीतला 'पोलीसी अत्याचार' हा धागा आत्ता हाती लागत होता. तेवढ्यात सनत मेहतांनी सांगितलं– 'राखीव जागांच्या प्रश्नावर राष्ट्रीय मतैक्य– national consensus – निर्माण व्हायला हवं!' राणे आयोग हा असं मतैक्य निर्माण करायचा एक प्रयत्न होता. लेहुआनी 'राणे आयोग' या खतावणीत काही नोंदी केल्याच होत्या. पण त्या 'डेबिट' ला होत्या. सनत मेहतांनी राणे आयोगाला 'क्रेडिट' देऊ केलं

मंडल आयोगाच्या निमित्ताने मागासवर्गीयांच्या विकासाविषयी पुनर्विचार सुरू झाला होता. पण मंडल आयोगानं जन्माधिष्ठित जातींचाच विचार केला होता तो आयोग किंवा आमच्या इथला बक्षी आयोग याचा अनुभव असा येऊ पहात होता की, जातींच्या भिंती पाडल्या जाण्याऐवजी नव्या नव्या भिंती उभ्या राहतात. स्वत:ला 'मागासवर्गीय' म्हणवून घ्यायची होड सुरू होते. या अनुभवामुळे राणे आयोगानं वेगळा मार्ग चोखाळून पहायचं ठरवलं. या आयोगाचं वैचारिक सूत्रचालकत्व ईश्वरभाई देसाईंकडे होतं. ईश्वरभाई मार्क्सवादी होते समाजात आर्थिक हितसंबंधांवर आधारित 'वर्ग' असतात. या मार्क्सवादी संकल्पनेशी भारतीय परिस्थितीचा मेळ घालायचा त्यांनी प्रयत्न केला 'वर्ग' ही कल्पना जशीच्या तशी भारतीय समाजव्यवस्थेला लागू करता येत नाही त्यामुळे त्यानी असा अॅप्रोच सुचवला की 'मागास' पणाची व्याख्या जन्माधिष्ठित जातींच्या आधारे करण्यापेक्षा व्यवसायाधिष्ठित 'वर्गा' च्या आधारे करावी यातली सैद्धांतिक भूमिका लक्षात न घेता दोन्ही बाजूनी वाद उभे केले 'आर्थिक निकषाला प्राधान्य' देण्याची मागणी राखीवजागाविरोधकांनी उचलून धरली आणि या आयोगाच्या अहवालाच्या आधारे सरकारनं अन्य मागासवर्गीयांसाठी १०% च्या जागा २८% तर कशा काय वाढवल्या असा बिनतोड सवाल उभा केला तर राखीव जागांच्या समर्थकांना अशी भीती वाटली की 'आर्थिक निकषापायी' कदाचित सामाजिक उच्चवर्णिय सुद्धा 'मागासवर्गीय' या व्याख्येत बसू शकतील, तसं झालं तर आपले हितसंबंध धोक्यात येतील असं वाटून त्यानीही राणे आयोगाला धारेवर धरलं (लेहुआंच्या प्रतिपादनाचा हा पापुद्रा सनत मेहतांनी कसा छान उलगडून सांगितला) पण याहून आणखी एका छान पापुद्रा त्यांनी उलगडला तेव्हा अचानक सामाजिक समतेच्या प्रश्नाच्या गाभ्याचंच दर्शन झाल्यासारखं वाटलं. ते म्हणाले, 'आर्थिक' दृष्ट्या मागासवर्गीय आणि 'सामाजिक शैक्षणिक' दृष्ट्या मागासवर्गीय यात द्वैत नाहीच आहे मुळी दोन्हीकडं ९० टक्के लोक तेच आहेत उरता उरले ते दहा टक्के इकडे तिकडं' हे ऐकल्यावर एकदम टुणकन् उडी मारून म्हणावसं वाटलं की, 'मग या आंदोलनाचं आणि त्याला असलेल्या विरोधाचं काही कारणच उरत नाही since-

rely राणे आयोग अंमलात आणला की झालं!' सनत मेहतांनी नेमकं हेच सांगितलं. फक्त टुणकन् उडी मारली नाही इतकंच. असं असूनही 'आंदोलन चालू असेल तर त्याच मुख्य कारण राजकीयच असलं पाहिजे.' असं मात्र सनत मेहता म्हटले नाहीत कारण राजकीय कॉमेंट करणार नाही असं त्यांनी सांगितलं होतं. ते म्हणाले, 'दुर्दैवानं ईश्वरभाई निवर्तले. ते असते तर आताचा वैचारिक गोंधळ साफ करायला त्यांची खूप मदत झाली असती.'

मंडल आयोग काय किंवा राणे आयोग काय दलित समस्येचा विचार करण्यातले नवे नवे टप्पे आहेत. यानिमित्तानं इथल्या दलित चळवळीविषयी काही सांगता का? विशेषत: राजकारणाशिवाय अन्य क्षेत्रांमध्ये: शैक्षणिक, साहित्यिक... दलित चळवळीचं वारं पोचलं आहे का?

## सामाजिक जाणिवेचा अभाव

याचं त्यांनी उत्तर दिलं तेव्हा लक्षात आलं की, गुजरातमधल्या दलित चळवळीचा ऐतिहासिक आढावा बहुतेकजण समान पद्धतीनं मांडतात. म्हणजे सयाजीराव गायकवाड... महात्मा गांधीजी... ठक्कर बाप्पांचा प्रभाव .. आणि आता वाढत चाललेला आंबेडकरनिष्ठ विद्रोही प्रवाह. 'इथे सध्या आंबेडकर जयंती दलितांमध्ये दिवाळीसारखी साजरी होते' दलित साहित्याची शाखाही मूळ धरू लागली आहे. सनत मेहता स्वतःच या कामाशी संबंधित आहे. ते ज्या 'आदिवासी विकास परिषदे' चं काम करतात त्यांच्यातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'नया मार्ग' या नियतकालिकात खास दलित साहित्यालाच काही पानं वाहिलेली आहेत. झिनाभाई दराजी पण कामात आहेत. राखीव जागांच्या प्रश्नावर मात्र दलित संभ्रमात आहेत, असंघटित आहेत सहज जाताजाता धर्मांतराविषयी विचारल्यावर मात्र ते 'गार्ड' घेत म्हटले, 'प्रश्नाचा रोख ध्यानात आल्याशिवाय मी या प्रश्नाचं उत्तर देऊ शकणार नाही.' ठीक आहे बुवा. तुम्हाला काय पेचातबिचात पकडायचा आपला हेतू नाही. पण दलितांमधला एक स्पष्ट विद्रोही सूर असा आहे की, या समाज व्यवस्थेत आम्हाला समतापूर्ण वागणूक मिळत नसेल तर तो समाजव्यवस्थाच आम्ही ठोकरतो. यातून सामाजिक समतेचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीनं काही प्रगती साधली जाईल असं आपल्याला वाटतं का, इतकाच माझ्या प्रश्नाचा रोख आहे कोणत्याही भावनेचा थांग लागू न देणारा चेहरा तसाच ठेऊन मृदु सुरात त्यांनी सांगितलं 'नाही. धर्मांतर ही वैतागातून येणारी प्रतिक्रिया आहे. तस नुसतं आडनाव बदलून समता आणू पहायचेही प्रयत्न चालू आहेत पण ते अयशस्वी होणार' त्यांनी पुढे बोलणं चालू ठेवलं त्यात एक अप्रतीम मुद्दा मांडला–

सामाजिक समतेबाबत असली सवाल कसा आहे; दलितातून वर येणारा 'डी–क्लास' होतो, तो दलितासाठी काम करत नाही. आर्थिक सुबत्ता आल्यानंच केवळ प्रश्न सुटत नाही. उदाहरणार्थ, एखादा हरिजन तलाठी झाला तर सामाजिक समतेच्या दिशेन काही प्रगती होते का? नाही होत कारण तलाठी झाला की तो हरिजन रहात नाही, फक्त तलाठी रहातो. मग इतर हरिजनाकडून पैसे खाताना त्याला आपल्या हरिजनपणाचा विसर पडतो. म्हणजे सामाजिक जाणिवेचा अभाव असतो. तो तलाठी किंवा मंत्रिमंडळातही आम्ही अनेकदा पहातो की, वर आलेला दलित मध्ययुगीन सरजामशाही चालचलन फार पटकन आत्मसात करतो. प्रवासावर आम्ही स्वतःची बॅग घेऊन चालू पण हरिजन मंत्र्याला मात्र विमानातून उतरल्याबरोबर बॅग हातात धरून मागोमाग चालत येणारा 'अटेंडंट' लागतो सामाजिक जाणिवेचा अभावच त्यात ठळक उठून दिसतो. म्हणून आपल्याकडे समतेच्या प्रश्नाचा विचार करताना economic consciousness पेक्षा social consciousness चा विचार करायला हवा. माझं थोडफार काम त्याच दिशेनं चालू आहे.

दलित चळवळ, सामाजिक समता अशा प्रश्नांची वैचारिक चर्चा करणारा राजकारणी नेता, तोही काँग्रेसचा अन् तोही एक माजी मंत्री! केवढा तरी अलभ्य लाभ होता! सनत मेहतांवरच्या समाजवादी संस्कारांना याचं श्रेय द्यायला हवे. या चर्चेतच प्रथम अमेरिकेतल्या निग्रो समस्येचा संदर्भ आला. निग्रो साहित्य आणि दलित साहित्य यांची तुलना आली. काही भेटीगाठीबद्दल त्या माणसाचे मनःपूर्वक आभार मानावेसे वाटतात. सनत मेहतांचे असे आभार मानावेत अशी वैचारिक धार या चर्चेला होती.

त्यांचं घर एका गल्लीतल्या अपार्टमेंट्सच्या तळमजल्यावर छोटयाशा फ्लॅटमध्ये आहे. 'छोटा' इतर नेत्यांच्या राजवाड्याच्या तुलनेत म्हटलं. त्यातल्याही छोटयाशा हॉलमध्ये भिंतीचे रंग, रेडिओ, टेपरेकॉर्डर, VCR, स्टिरिओफोनिक सिस्टिम, कोच, जाजम, टीपॉय, टीपॉयवरचे सरबताचे पेले सारं कस नेटक, शालीन होनं. सर्व काळ त्यांच्या शेजारी सौभाग्यवती बसल्या होत्या. चर्चेत येणारे संदर्भ, संबंधित ग्रंथ किंवा नियतकालिकातून काढून देत होत्या. त्या काही विशेषच स–कौतुक बसल्यात की काय अशी मला शंका आली. मुलाखत आता उरकत आली असा सूर लावणारी 'भैरवी' सुरू झाल्यावर त्यांनी स्वच्छ मराठीत विचारलं 'काय, आता पुण्याला परत कधी जाणार?' मुलाखतीला एकदम घरगुतीपण प्राप्त झालं. सौ. मेहता मराठी आहेत.

आधीच्या चर्चेत असा मुद्दा आला होता की, राखीव जागाविरोधी आंदोलनाच्या मुळाशी बेकारीचा प्रश्न आहे. आहेत तेवढ्या नोकऱ्या तुला का मला असं भांडण्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती हा यावर उपाय आहे. रोजगार निर्मितीसाठी भांडवल–निर्मितीची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात अत्यंत सशक्त असलेल्या शेतकरी संघटनेच्या चळवळीचं 'शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव द्या' हे सूत्र ध्यानात होनं शेतमालाला रास्त भाव मिळाल्यास ग्रामीण भागात भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेला चालना मिळेल, त्यातून रोजगार निर्मिती होऊन बेकारी व दारिद्र्य हटेल असे ते सर्व अर्थशास्त्रीय प्रतिपादन आहे. म्हणजे समतेच्या प्रांगणात वेगळ्या दारानं प्रवेश करायचा रस्ता महाराष्ट्रातली शेतकरी चळवळ चोखाळते. म्हणून 'या चळवळीविषयी तुम्हाला काय वाटतं?' असं मी त्यांना विचारलं. हा प्रश्न मी गेल्या काही काळात अनेक नेते, कार्यकर्ते, विचारवंत यांना विचारला आहे. पण ही चळवळ काय आहे हे

## दलितातून वर येणारा 'डी–क्लास' होतो, तो दलितांसाठी काम करत नाही

समजलेला हा पहिला माणूस भेटला. या चळवळीमागचं अर्थशास्त्र सांगून, ते योग्य आहे असं म्हणून, त्यानी गुजरातमधे हा प्रयोग यापूर्वी झाला आहे हे मांडलं मात्र या चळवळीचं काही राजकीय रूपांतर होणार नसेल तर ती अयशस्वी होईल असही त्यांनी मांडलं. मागे एकदा दिल्लीत चरणसिंगांनीही असच सांगून आम्हाला सुचवलं होतं—'माझा निरोप शरद जोशीना सांगा, म्हणावं राजकारणात या' त्याच्या उद्देश महाराष्ट्रात लोकदलाला बेस मिळवणं असा असावा. सनत मेहतांचं तसं नव्हतं. त्याना जाणवलं ते त्यांच्या तर्कशुद्ध पद्धतीनी त्यानी मांडलं. त्यामुळे राजकारण अलाहिदा : सनत मेहताजी, मी तुमचा मन:पूर्वक आभारी आहे पुन्हा भेटू या. तोवर मी एका महत्त्वाच्या दलित कार्यकर्त्याला भेटून येतो. तुम्ही सांगितलेल्या दलित चळवळीच्या विविध बाजूंची त्याच्याशी चर्चा करून पहातो. तेही लोहियांचे शिष्य आहेत.

¤

'तुम्ही म्हणताय या गुजरातेतल्या दलित चळवळीच्या मर्यादा किंवा उणिवा आहेत हे खरं आहे; पण आता त्या लवकरच दूर होणार आहेत. हरिजन, गिरीजन आणि बक्षी पंच सर्वच आता संघटित होऊ लागले. हे मी फक्त गुजरातपुरतंच बोलत नाहीये. देशभर सर्व मागासवर्गीय एकत्र येऊ लागलेत त्यांचे हात उठू लागलेत. या उत्थानाचा मुख्य फोकस 'अन्य मागासवर्गीयांवर'आहे; पण तुमच्या लवकरच लक्षात येईल की. आमची चळवळ फक्त जातीय राहिलेली नाही. गरिबाचे आणि मागासवर्गीयाचे हितसंबंध समान आहेत. दहा वर्षांच्या आत गरीब ब्राह्मण आणि बनियेसुद्धा आमच्याकडे येतील. मुसलमान तर आमच्या बाजूला आहेतच.'— भोगीभाई मकवाना.

श्री. भोगीभाई मकवाना जुन्या संयुक्त सोशॅलिस्ट पार्टीचे दलित नेते. आता राजनारायण गटात आहेत. ते 'बगावत' (विद्रोह) नावाच्या वृत्तपत्राचे संपादक होते. त्यातल्या त्याच्या लिखाणाचा सूर बराच जहाल असे असं ज्यानी ते वाचलं असे लोक सांगतात. 'आता सध्या कोणी ते वाचू शकत नाही कारण ते छापलं जात नाही' अशी मिष्किल माहिती भोगीभाईंनीच सांगितली. जाती गुजरातसाठीचे सकाळी लेहुआच्या घरूनच त्यांना फोन केला होता. तेव्हा त्यानी सांगितलं होतं अविनाशभाई, तुमच्या इतर भेटी उरकल्या की रात्री घरी या. निवांतपणे गप्पा मारू. घरातल्या सगळ्यांची ओळख करून देऊन त्यानी निवांतपणे गप्पा मारायला सुरुवात केली. 'ही माझी पत्नी. जनता पक्षाची कॉर्पोरेटर. मी राजनारायण गटाचा त्यामुळे इथे गंभीर राजकीय मतभेद आहेत.' पती-पत्नी दोघेही घरभरून हसले. 'नवी धरती' नावाच्या स्लम क्वार्टर्समधल्या दोन खोल्यात ते राहतात. चेहऱ्यावर कायम हसू; पण त्या हसण्यात एक बेरकीपणा आहे. भिंतीवर लोहियाच एक पोर्टेट त्याखाली बसून भोगीभाईंनी गुजरातची जातीव्यवस्था थोडक्यात सांगितली.

स्वातंत्र्यापूर्वी सहा जाती गुजरातमध्ये सर्वसाधारणपणे समान स्तराच्या मानल्या जायच्या. पटेल, वाघरी, भारिया, बनिया, ब्राह्मण आणि हजाम. सौराष्ट्रात पटेल ना कुणबी म्हणतात आणि भारियाला काठी. काठी लोक मूळ रजपूत. त्याच्यावरूनच त्या भागाला 'काठियावाड' नाव आहे. आजकाल तिकडे कुणबीविरुद्ध काठीवाद वाढू लागलाय. तो उर्वरित गुजरातमधल्या पटेलविरुद्ध खत्री (क्षत्रिय) वादाचच 'काठेवाडी' रूप. (माधवसिंग सोळंकी खत्री. गुजरातमध्ये खत्री 'सवर्णा'त गणले जात नाहीत) या सहा जातीशिवाय हरिजन, आदिवासी हा मागासवर्गीय समाज होताच. सरदार पटेलांच्या काळापासून पुढे इतर सर्व जातींना मागे टाकून पटेल जात आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या पुढारली. जमिनदारी पटेलाकडे आली आणि गावाकडला बनियाचा व्यापारधंदा पटेलांनी बसवला. अशा रीतीने संख्येन थोडे असून पटेलांच गुजरातवर प्रभुत्व निर्माण झालं. स्वातंत्र्यानंतर १९६७ पर्यंत राजकारणाची सूत्रही पूर्णपणे पटेलाच्याच हातात होती. तिथपर्यंत कॉंग्रेसचे सर्व अध्यक्ष पटेलच होते. दरम्यान इतर जातींतही शिक्षणप्रसार झाला. ६७ ते ७१ च्या दरम्यान नवी हवा येऊ लागली. पटेलाच प्रभुत्व घटू लागलं. त्यांच्या जमिनीवर नेहमी लाभणारे हक्काचे मागासवर्गीय मजूर जमीन सोडून शहराकडे नोकरी, उद्योग व्यवसाय यासाठी धावू लागले.

'एक प्रकारे इंदिराजीना धन्यवाद द्यायला हवेत की १९७१ च्या निवडणुकामध्ये त्यानी 'गरिबी हटाव' ची स्लोगन दिली. प्रथमच, गरीब वर्गाच्या लक्षात आले की 'गरिबी' हा राजकीय इश्यु होऊ शकतो, गरिबी हटवली जाऊ शकते नव्हे, नव्हे गरिबी दूर होणे हा आपला हक्क आहे

ह्या संपूर्ण दशकात क्रमश: गरीब, मागासवर्गीय समाज संघटित, सुशिक्षित होत गेला. साहजिकच अल्पसंख्य पटेल जमातीचं वर्चस्व खाली खाली येत गेलं. माधवसिंग सोळंकीच्या सरकारात तर एकही पटेल नाही. ते गेलेलं राजकीय स्थान परत मिळवण्यासाठी पटेल जातीनं केलेला कट म्हणजे राखीव जागाविरोधी आंदोलन.

'पण म्हणजे सोळंकी सरकार हरिजनांचा उद्धार करणारं आहे- असं समजू नका बरका. त्यांच्या दृष्टीनं दलित समाज म्हणजे एक खात्रीशीर वोट बँक आहे. या वोट बँकवर डोळा ठेवूनच त्यानी निवडणुकीपूर्वी राखीव जागा वाढवल्याची घोषणा केली; पण तेही आतून... तेही आतून राखीव जागाविरोधी आंदोलनाला प्रोत्साहनच देतं. नाहीतर इतक्या लवकर ४९% जागा करण्याचा निर्णय १ वर्षासाठी स्थगित करायचा निर्णय कसा ठरला? १९८१ मध्ये carry toword system रद्द का झाली? हरिजनांवरील अत्याचारांची चौकशी का होत नाही? अन् कर्फ्यू असताना 'नवरचना समिती' ची मिरवणूक झालेली चालते, 'पिछडा लोक संकलन समिती'ची मात्र बंद सभागृहात सभा झालेली चालत नाही. याचा अर्थ काय?' इथून पुढे अनेक मुद्दे त्यानी श्री. लेहुआप्रमाणेच मांडले. एक संयुक्त दलित-मुस्लिम आघाडी अस्तित्वात येऊ लागली आहे का? याच्या उत्तरादाखल ते म्हणाले—

'अजूनही ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे वेशीच्या आत सवर्ण समाज रहातो. तर वेशीबाहेर हरिजन, बक्षीपंच आणि मुसलमान रहातात. १९८१ मध्ये राखीव जागाविरोधी आंदोलनाला हिंदु-मुस्लिम दंगलीचं वळण मिळालं तेव्हा मुसलमानाची बरीच कत्तल झाली. गावाकडे सवर्णांनी हरिजन आणि बक्षीपंच लोकाना आपल्या बाजूनं मुस्लिमाविरुद्ध वापरलं; पण लवकरच आमच्या लक्षात आलं की, आपण सर्व गरीब आहोत, आपसात कशाकरता भांडायचं?




गरीब म्हणून आमचे हितसंबंध समान आहेत. बक्षीपंच जातींमध्ये अनेक मुस्लिम जातीसुद्धा आहेत. उदा... खाटकी, धोबी, मेहेर, मियाणा, संदी, बग्नेर वगैरे. शेख, सय्यद आणि अरब सोडून जवळ-जवळ सर्व मुस्लिम जाती 'मागासवर्गीय' मध्ये येतात. तिथे प्रथम एक समाज दलित–मुस्लिम मंच तयार होऊ लागला. आता यावेळी अजून मुस्लिम समाज आमच्या बाजूनं मैदानात उतरला नाहोये; उतरायला तयार आहे.'

'दलितस्तान शब्द उच्चारल्याचं आता अधूनमधून कानावर पडू लागलंय. वर्गयुद्धाचीही परिभाषा वापरली जाते. तुमचं त्यावर मत?' मी विचारलं.

'हे पहा, राखीव जागांचं मूळ 'पुणे करारा'त आहे. त्यावेळी समाजाची उभी फाळणी टाळायला गांधी–आंबेडकरांनी राखीव जागांची तरतूद स्वीकारली. आता राखीव जागा रद्द करायच्या असतील तर पुणे करार मोडायला हवा. म्हणजे फाळणी स्वीकारणं आलंच. आमच्यावर अजूनही असह्य अन्याय होतो. त्याला धड वृत्त-पत्रातून वाचा फोडली जात नाही. कारण प्रेस सवर्णांच्या हातात आहे, राखीव जागाविरोधी आहे. उर्वरित हिंदु समाजाच्या बरोबरीचं स्थान आम्हाला मिळेपर्यंत राखीव जागा चालू रहायला हव्यात. नाहीतर दलितस्तानचे आवाज उठणं स्वाभाविक आहे. आजही तुम्ही पहा, वेश्याव्यवसायात जास्त करून हरिजन मुली असतात. असं का? आम्ही गरीब आहोत म्हणून? आमच्या जिण्याला काही किंमत नाही? एक गांधीजी आम्हाला जवळचे होते; पण आता मागे शिल्लक राहिलेले त्यांचे वारस नंबर एकचे ढोंगी आणि जातीय आहेत. त्यातही रविशंकर महाराजांबरोबरच गांधीजींचा शुद्ध वारसा संपला. आता त्या पोरबंदरमध्ये गांधीजींच्या जन्मस्थानी संध्याकाळी सातनंतर दारू विकली जाते. गांधीजींच्या आश्रमशाळा मठाधीशांच्या ताब्यात गेल्यात. या मठाधीशांना सत्ताधिशांचा अनुनय करणं जमतं. हे बदलायला हवं. ही परिस्थिती बदलली नाही तर वर्गयुद्ध अटळ आहे. अरे ही जनता पार्टी पहा, ऐसी पार्टी और नहीं होगी. केंद्रात ही पार्टी राखीव जागांची समर्थक आणि राज्यात त्यांचेच नेते राखीव जागाविरोधी आंदोलनाचं नेतृत्व करतात. भाजप तर आहेच. दलितविरोधी सर्वच पक्षातले सवर्ण हिंदु एकत्र येऊ लागलेत. मग दलितही एकत्र येणारच. शेवटी वर्गयुद्ध अटळ आहे.'

मुलाखत संपली तेव्हा रात्र बरीच झाली होती. बडोदा शहर कर्फ्यूखाली शांतावलं होतं. कर्फ्यूच्या आणि अंधाराच्या गर्भात 'उद्या' कसा आकार घेणार आहे कुणास ठाऊक?

(यापुढील भाग पुढील अंकी)



# तडाक

● रमेश दा. गाडे ●

सेक्शन ऑफिसर बेलसऱ्यांनी हुश्श करीत खुर्चीत अंग टाकलं. गेल्या पंधरा–वीस वर्षात ऑफिस किती वाढलं होतं ! सगळ्यांशी दोन–दोन मिनिटं करीत बोलताना दोन तास सहज निघून गेले होते. पण आज त्यांना याबद्दल कुणी जाब विचारणार नव्हतं. उद्यापासून तर ते निवृत्तच होणार होते. त्या आधी जुन्या–नव्या सहकाऱ्यांचा निरोप घेणं तर आवश्यकच होतं. त्यांच्या निरोपाच्या समारंभाची तयारी करणारे उत्साही कारकून या कामासाठी फिरत असतानाच त्याकडे दुर्लक्ष केल्यासारखं दाखवत ते अख्खं ऑफिस पालथं घालून आले होते अन् उतारवयात हे श्रम जरासे जडच होऊन ते धापा टाकीत खुर्चीत जवळपास कोसळलेच होते.

त्यांच्या विभागात काम करणारे लिपीकही आज काम करण्याच्या 'मूड' मध्ये नव्हतेच. साहेब तर उद्या जाणारच मग आज कशाला त्यांना त्रास द्या (अन् आपणही घ्या !) या विचाराने ते सकाळपासूनच टेबलं आवरून बसले होते. सुदैवाने त्यांच्या विभागाचे काम दैनंदिन स्वरूपाचे नसल्यामुळे एक दिवस कुणी काम केले नाही तरी चालण्यासारखे होते. सारांश काम करण्याचा उपजत निरुत्साह अन त्याकडे क्षमाशील दृष्टीने पाहणारे वरिष्ठ याचा मोठा मनोज्ञ संगम त्या दिवशी झाला होता.

बेलसऱ्यांना आठवले. आपण नोकरीला लागलो तेव्हा असे नव्हते. ऑफिसमध्ये वेळेवर येणे, मानेवर खडा ठेवून काम करणे आणि रोज उशिरापर्यंत आकडेमोड करीत राहणे हेच लिपिकाचे त्या वेळचे रूटीन होते. 'ओव्हरटाईम' हा शब्दच कुणाच्या कोशात नव्हता. माणूस रिटायर होवो वा काम करता करता मरो, काम जास्त काळ थांबून राहणे वा रेंगाळणे हा प्रकारच नव्हता. अन् अख्ख्या ऑफिसमध्ये डोकी तरी किती होती ? हद्द झाली तर पन्नास–पाऊणशे. पण गेल्या पंचवीस वर्षांत चित्र किती पालटलं होतं ! ऑफिस विस्तारलं होतं, कामगार संघटनेने आपले ठाण मांडले होते अन् ऑफिसनेच त्यासाठी जागाही दिली होती. कार्यालयीन उपहारगृहे निघाली होती–लिपिकांसाठी अन् अधिकाऱ्यांसाठी वेगवेगळी. जुनी माणसे निवृत्त झाली होती अन् नव्या दमाची उत्साही, हुषार, स्मार्ट पण काहीशी आक्रमक वाटणारी पोरं पोरी आली होती. खरं म्हणजे ह्या अलिकडे लागलेल्या स्टाफला त्यांच्या निवृत्तीचं काही वाटत नव्हतंच. केवळ एक साधा, सरळ, अधिकारांतर्गत कुणाचं वाईट न करणारा 'मोस्ट ऑर्डिनरी' अधिकारी निवृत्त होतोय् एवढंच त्यांना वाटत होतं. बेलसऱ्यांना वाटलं, एवढं वाटत असेल तरी पुरे. पुढे तरी कुणालाच कुणाचे काही वाटणार नाही. झपाट्याने बदलत गेलेल्या परिस्थितीचे अखेर तेही एक साक्षीदार होते.

त्यांना वाटलं, सगळं बदललं; पण आपण बदललो नाही. ऑफिसमध्ये कधी उशीरा आलो नाही. 'विदाऊट पे' सुटीचा डाग कधी रेकॉर्डं बुकास लागू दिला नाही. ऑफिसचं काम अगदी चोख केलं नि वरच्या अधिकाऱ्याकडून कधी दोन गोष्टी ऐकून घेतल्या नाहीत, की लोकांशी हरघडी संबंध येणाऱ्या आपल्या खात्यात कधी दोन पैची 'वरची' प्राप्ती करून घेतली नाही. त्यांना वाटलं, इतर कारकुनांच्या बॅगेत ऑफिसची स्टेशनरी हटकून सापडायची. नव्हे, ती नेण्यासाठीच बॅगा न आणणारेही जून–जुलैमध्ये बॅगा आणायचे. पण आपण सुतळीच्या तोड्यास कधी हात लावला नाही. एल. टी. सी. च्या बिलात, मेडिकल बिलात घोटाळे करणारे आपल्या आसपास वावरत होते पण आपण कधी ऑफिसकडून एक पैसा जादा घेतला नाही. ऑफिसच्या कॅंटीनमध्ये अल्प दरात खाऊनच्या खाऊन ट्रेमधली साखर पुडीत बांधून नेणारे कमअस्सल अधिकारीही त्यांनी पाहिले होते पण त्यांना कशाचाच संसर्ग झाला नव्हता.

एकदा तर त्यांनी कमालच केली होती. सुटीवर असताना कुणाला तरी भेटायला म्हणून ते ऑफिसमध्ये आले होते त्यावेळी त्यांनी आपली सायकल कर्मचाऱ्यांसाठीच्या विनामूल्य स्टॅंडवर न लावता पब्लिक स्टॅंडवर लावली होती अन् तिथल्या पोऱ्याला तो नको नको म्हणत असताही वीस पैसे देऊन टोकन द्यायला त्याला भाग पाडले होते ! ही गोष्ट खडूस देशमुखास कळण्याचाच अवकाश, त्यानं ते साऱ्या ऑफिसभर केलं होतं. अन् त्यानंतर पंधरा दिवस साऱ्यांनी त्यांचा 'हरिश्चंद्राचे अवतार' असं चिडवीत पिच्छा पुरविला होता. बहुतेकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा त्यांच्या स्वच्छपणामुळेच जरासा कुत्सितपणाचा होता.

साहेबाने बोलावल्याचे सांगायला शिपाई आला तशी त्यांची तंद्री मोडली. ते त्यांच्याकडे जाताच, त्यांच्यापेक्षा कार्यकाल कमी असलेला तो प्रोबेशनरी ऑफिसर उठून उभा राहिला अन् त्यांचेशी हस्तांदोलन करीत म्हणाला, 'वुई विल् बी ट्रुली मिसिंग यू, मि. बेलसरे !'

यावर रितीप्रमाणे काही तरी बोलायचं म्हणून बेलसरे म्हणाले, 'कसचं कसचं ! हे चालणारच ! ओल्ड ऑर्डर...'

त्यांना मध्येच थांबवत साहेब म्हणाले, 'ते ठीक आहे. पण बेलसरे, तुमच्यासारखी प्रांजळ, 'चेस्ट' माणसं मिळणं कठीण आहे आता !'

यावर किंचितसे हसुन बेलसऱ्यांनी साहेबांचे आभार मानले व थोडेसे औपचारिक बोलून ते जागेवर येऊन बसले.

त्यांना खरोखर फार बरं वाटत होतं. आपल्या चोखपणाची कुणी तरी आवर्जून दखल घेतली याच त्यांना फार मोठं समाधान वाटलं. त्यांना वाटलं, आपण चांगले वागतो ते कुणी कौतुक करावं म्हणून नव्हे. पण कुणीतरी त्याला बरे म्हटले तर आपल्याला आनंद होतो हे मात्र खरं. चला, आपल्या इतरांना अतिरेकी वाटणाऱ्या वागण्याची दखल निदान एका माणसाने तर घेतली.

खुर्चीत रेलून मोठ्या समाधानानं ते दातांच्या फटीत अडकलेले पानाचे तुकडे टाचणीने कोरून काढू लागले अन् मग थोड्या वेळाने त्यांनी ती टाचणी खाली टाकून दिली.

एवढ्यात, देवळात घंटेखाली उभे असताना अकस्मात घंटा शिरावर आदळावी तसा एक विचार त्यांच्या मनःपटलावर आदळला आणि त्यांच्या साऱ्या मनःस्वास्थ्याचा चेंदामेंदा करून गेला.

दात कोरण्यासाठी त्यांनी उभ्या आयुष्यात कधी स्वतःची टाचणी वापरलीच नव्हती ! □

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील

# शिक्षणातील ग्राहक चळवळ

मुलांचं बोलणं आपण ऐकलं आहे. शिक्षण-विषयीच्या मुलांच्या विविध संकल्पना कशा तयार होतात, त्यांचं तर्कशास्त्र कशा प्रकारचं असतं, दुटप्पी न्यायनीती त्यांना कशी आवडत नाही हे सारं आपण मुलांच्या बोलण्यातून समजून घेतलं आहे. अनेक नियतकालिकांत आणि काही पुस्तकांतही हास्यचित्रं असतात. ही हास्यचित्रं म्हणजे सद्यःपरिस्थितीवरील प्रच्छन्न टीका असते. नेमक्या वर्मावर अचूक बोट ठेवलेलं असतं. अनेक व्याख्यानं अथवा लांबेचौडे लेख जे पटवून देऊ शकणार नाहीत ते हास्यचित्रांमार्फत मनाचा थेट तळ गाठतं.

**हास्यचित्र क्रमांक १ –** व्याख्याते मास्तर सांगताहेत की यशस्वी होण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण घेणं, महत्त्वाकांक्षा बाळगणं, प्रामाणिकपणं सतत उद्योग करणं. विद्यार्थ्यांपैकी कोणी मोठमोठ्या शब्दांच्या भाराखाली दडपून गेले आहेत, काही जांभया देत आहेत, काही भक्तिभावाने ऐकत आहेत तर काहींच्या मनात विचार येत आहे की हा शाब्दिक बकवास आहे.

शब्दांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सदाचाराकडं नेणं किती अवघड आहे हेच या हास्यचित्रात सांगितलं आहे. आज वयात येणारे विद्यार्थी पाहात आहेत की व्यावहारिक यशाचा आणि शिक्षणाचा संबंध नाही, प्रामाणिकपणे कष्ट करण्यापेक्षा दुसरेच काही मार्ग चटकन यश मिळवून देतात. सतत उद्योगापेक्षा चमचेगिरी अधिक उपयोगी पडते. त्यांच्या या अनुभवांमुळं त्यांना व्याख्यात्यांचे म्हणणं केवळ शाब्दिक, अर्थहीन, पोकळ वाटतं आहे. स्वाभाविकच अशी व्याख्यानं देऊन विद्यार्थी सतत उद्योग करतील, प्रामणिक परिश्रमाकडं वळतील आणि शिक्षण घेतील अशी अपेक्षा करणं चुकीचं आहे. विद्यार्थ्यांना आपल्याला जे सांगायचं आहे ते आजच्या वास्तवापासून तोडून काढून सांगितले तर ते हवेत बंगले बांधण्यासारखं ठरेल. आपल्याला वाटतं 'मुलांना ते काय समजतं? त्यांना जगातल्या घडामोडींची काय दखल?' परंतु मुलं डोळसपणं वास्तव पाहात असतात, अनुभवत असतात.

**हास्यचित्र क्रमांक २ –** व्यक्तींचं बोलणं व त्यांची प्रत्यक्षातील वागणूक कशी वेगवेगळी असते हे या चित्रात पाहिलंत ना? 'विद्येचा आणि शाळांचा संबंध नाही. मुलं जे शिकतात ते शिक्षकांमुळं नव्हे त्यांच्याशिवाय' असे प्रतिपादणारेच आपल्या मुलाबाळांना 'जा शाळेत जा. जातोस की नाही. गेलास का?' असं म्हणतात. शाळेच्या कटाळ्यामुळं मुलं हे दुखतं, ते दुखतं अशा नाना सबबी सांगतात. पण शिक्षणाला नावं ठेवणारी माणसं शेवटी मुलाबाळांना त्या जीवघेण्या शर्यतीत ढकलतातच!

शाळेविषयी मुलांना काय वाटतं हे समजून घेण्यासाठी एकदा एका शिक्षकानी मुलांना 'शाळेचं शब्दचित्र रेखाटा' असं सांगितलं. त्या विषयावरच्या त्यांच्या प्रतिमा जाग्या करण्यासाठी शाळेची भौतिक वैशिष्ट्ये, तिथले रंग, वास, वेगवेगळ्या खोल्यांत









जाताना भाववृत्तीत पडणारे फरक लिहायला सांगितलं. तेथील खिडक्या, दरवाजे, भिंती, फर्निचर इत्यादींची स्थिती, शाळेत वापरले जाणारे खडू, फळा, नकाशे, प्रतिकृती इत्यादी साहित्याची अवस्था– कित्येक गोष्टींबद्दल लिहावयास सुचविलं. एकापाठोपाठ होणारे कंटाळवाणे तास, शिकवण्यातील शब्दजंजाळ, कृतीसाठी अभावानं केलं जाणारं आवाहन, बांधीव वेळापत्रक व त्या वेळापत्रकामुळं एखाद्या विषयाचा तास सुरू होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांच्या अंगप्रत्यंगावर येणारा भयानक कंटाळा, गमतीजमतीला असणारा प्रतिबंध, शारीरिक थकण्याचा अजिबात न होणारा विचार, एखाद्या कारखान्यात वस्तूमागून वस्तू सरकत राहावी याप्रमाणं घंटेच्या टोलाबरोबर सरकणारे शालेय विषय अशा अनुभूतं मुळं शाळेला मुलं राजी नसतात. हे सारे त्या लिखाणातून समजतं. एखाद्या प्रवाहात पडलेलं पान जसं प्रवाहाबरोबर वाहात जातं त्याप्रमाणे शालेय शिक्षणाच्या साच्यात मुलं दिवसांमागून दिवस जात असले, तरी शाळा नाही म्हटलं की ती आनंदित होतात. कोणी मेलं आणि शाळेला सुटी मिळली की टाळ्या पिटतात. एखादी गोष्ट शिकायची मुलानेच ठरविलं की मूल किती परिश्रम करतं ?

'एका कोळियाने एकदा आपुले,
जाळे बांधियले उंच जागी

काव्यपंक्तीप्रमाणे किती तरी मुलं सायकलच्या पॅडलवर पाय मारीत पडतात, पुन्हा चढतात जरा वेळ मिळाला की सायकलकडे धावतात. 'सायकलीचा अभ्यास केलास का?'असं आपल्याला म्हणावं लागतं का ? शाळेचा अभ्यास असा आनंदाचा आणि आवडीचा का बरं होत नाही ?

**हास्यचित्र क्रमांक ३** – या चार चित्रांच्या मालिकेतील मुलगी ' शहाणी ' झालेली आहे. मुलाला सांगत आहे 'अरे बाबा, परीक्षेत लिहायचं ते सगळं वेगळं असतं.' ही चित्रमालिका म्हणजेही वास्तवाशी अनुबंध नसणाऱ्या शिक्षणावर ओढलेला आसूड आहे. चित्रातील मुलीला आपले मुख्यमंत्री हे देशातील एक महान मुख्यमंत्री आहेत किंवा ते लोकप्रिय नेते आहेत असं मुळीच वाटत नाही. परंतु त्या मुलीला हे उमजलं आहे की इतिहासाच्या चाचणीत मुख्यमंत्र्याबद्दल हे असंच लिहिलं पाहिजे, मार्क मिळवण्यासाठी तेच उपयुक्त ठरेल. त्या भांबावलेल्या दुसऱ्या पोराला मात्र त्या मुलीच्या बोलण्याचा आणि कृतीचा अन्वयार्थ लावता येत नाही.

आज शाळाशाळांत अशी अनेक भांबावलेली मुलं आहेत. 'बाई, हे असच का लिहायचं ?' या सारख्या प्रश्नाची उत्तरे विविध असली तरी त्यांचा सूर एकच असतो. 'मी सांगते ते ऐक. जास्त बोलू नकोस. तू मला शहाणपणा शिकवू नकोस, आम्ही चार पावसाळे जास्त काढलेले आहेत.' भांबावलेल्या पोरांच्या मनात प्रश्न उमटत असतात, 'तुमचं का ऐकायचं ?' 'आम्हाला काय वाटतं ते का बोलायचं नाही ?', 'तुम्ही चार पावसाळे जास्त काढले असले तरी सगळे पावसाळे का तंतोतंत सारखे असतात?' मुलांच्या मनातील दडपल्या जाणाऱ्या प्रश्नांमुळं उलटणाऱ्या प्रत्येक वर्षाबरोबर मूल मनातले सारे प्रश्न, विचार, भावना, कल्पना निरीक्षणं, स्वतःची मतं–सारं सारं प्रौढांपासून लपवाला शिकत रहातं !

**हास्यचित्र क्रमांक ४** – चित्रात एक आई आणि एक मुलगा दिसतो आहे. गेले काही महिने मुलाच्या तोंडी 'आमच्या शकूताई' ह्या पालुपदाशिवाय पुढचे जणू शब्दच येत नाहीत. शेवटी वैतागून एक दिवस आई विचारते, 'काय रे ? काय ही तुझी आणि शकूताईची भानगड ? कोण ही शकूताई ?' मुलगा अभिमानानं सांगतो, 'शकूताई आमच्या बाई आहेत. त्या मला समजून घेतात.' मुलाचं हे उत्तर ऐकून आई गारदच होते शिक्षिकेचा इतका ध्यास ? आणि शिक्षिकेनं मुलाला समजून घ्यायचं ? मुलाच्या शब्दांमुळं बसलेल्या धक्क्यातून सावरल्यावर आई म्हणते. 'त्या अति हुशार (genius) असतील किंवा नव्यानंच नोकरीला लागल्या असतील !'

या हास्यचित्रानं तुम्हाला मला दोन गोष्टी सांगितल्या. (१) मुलाला जेव्हा वाटतं की शिक्षकाला आपल्याबद्दल काही वाटतं आहे, आपले प्रश्न, आपल्या अडचणी समजून घेण्याची शिक्षकाला इच्छा आहे तेव्हा शिक्षकाचा तो जणू भक्त बनतो. शिक्षकाबद्दल आत्यंतिक आदर, अभिमान विद्यार्थ्याला वाटतो. (२) शाळा कशा गिरण्यांसारख्या बनल्या आहेत, मुलांचा आणि शिक्षकांचा व्यक्तिगत संबंध शाळेत कसा येत नाही व शाळा म्हटली की ते तसंच असायचं हे जणू पालकांना आता उमजलं आहे, त्यानी ते स्वीकारलं आहे, चित्रातली आई ही अशा पालकांचीच एक प्रतिनिधी ! त्यामुळंच आईला वाटतंय की ही शकूताई अगदी फारच हुशार असेल किंवा अधिक बरोबर बोलायचं झालं तर शाळेत नवागत असेल. शाळेत चार पावसाळे गेले की संपेल तिचं हे फॅड–मुलांना समजून





घ्यायचं !

**हास्यचित्र क्रमांक ५** – शाळेतील वैकल्पिक विषयांना प्रत्यक्षात फारसा अर्थ नसतो. आपल्याकडे दहावीच्या अभ्यासक्रमात वैकल्पिक विषयांची यादी आहे. पण प्रत्यक्षात मात्र ठराविक विषयच 'वैकल्पिक' म्हणून विद्यार्थ्यांना निवडण्याची मुभा असते- विषयासाठी लागणारे साहित्य वा सुविधा नाहीत, त्या विषयातले शिक्षक मिळत नाहीत, वैकल्पिक म्हणून ठराविक विषय निवडण्याकडेच विद्यार्थ्यांचा काल असल्याने थोड्या विद्यार्थ्यांसाठी एक वेगळा विषय शिक्षक नेमणं शाळांना परवडत नाही–अशा या ना त्या कारणानं परिणाम घडतो तो असा की वैकल्पिक म्हणून निवडावयाचे विषयही जणू सक्तीचेच विषय असतात. शाळेतील मुलं लवकरच शिकतात की शिकायची इच्छा आहे म्हणून विषयांची आपण कागदावर नोंद करतो आणि जे विषय प्रत्यक्षात शिकावे लागतात त्यांचा एकमेकांशी संबंध नसतो. अनेक चांगल्या तोंडावळ्याच्या शैक्षणिक योजना व्यवहारात उतरताना कशा तोंडावळा बदलतात यावर हे हास्यचित्र म्हणजे चपखल टीका आहे. कोल्हापुरातील एका बाईंनीही मला अशीच एक 'शिक्षण कथा' ( भयकथा या शब्दाच्या चालीवर तयार केलेला शब्द !) सांगितली होती. द्वितीय स्तरावरील भाषा (second language) म्हणून त्यांच्या मुलीनं फ्रेंच भाषेची नोंद केली. आईवडिलांनाही आनंद झाला–आपल्या मुलीला अतिशय महत्वाच्या एका भाषेची तोंडओळख शालेय वयातच होईल म्हणून. परंतु बरेच दिवस गेले तरी त्या विषयाचा एकही तास झाला नाही असं मुलीकडून कळल्यावर हे सुबुद्ध पालक शाळेत चौकशीला गेले. 'फ्रेंच विषय शिकवायची व्यवस्था ज्या त्या पालकांनी करायची आहे. फ्रेंच विषय घेतला आहे अशी नोंद आम्ही शाळांत परीक्षेच्या आवेदनपत्रावर करू.' असं शाळेत सांगितलं गेलं. आता सांगा ! पालकांनी करून करायची फ्रेंच शिकवायची व्यवस्था !! साहजिकच त्या मुलीला द्वितीय भाषा म्हणून हिंदी शिकावं लागलं. ती शिकली की what you sign up for and what you get are two different things.

**हास्यचित्र क्रमांक ६** – या हास्यचित्रात बाई शाळेच्या शैक्षणिक सल्लागार आहेत. त्यांना वाटतंय की पहिली घंटा झाल्यानंतर अजिबात हलायचं नाही हा नियमच उद्याच्या भारतीय समाजाचा कणा आहे ! कारण या नियमाची निमूट अंमलबजावणी करणारी मुलंच उद्या नागरिक होणार. 'पहिली घंटा झाली की हलायचं नाही !' अशाप्रकारचा






नियमाची कडक शिस्तीच्या नावाखाली अंमलबजावणी करता करता शाळेत मुळी कशालाही 'का ?' असं विचारण्याची ताकदच शोषली जाते. अशी मुलं शाळेतील क्रमिक पुस्तकं, शिक्षक, अभ्यासक्रम, परीक्षा ह्या साऱ्यालाच निमूटपणानं मान तुकवायला शिकतात. मान तुकवायची ही सवय अंगी इतकी बाणते की नागरिक म्हणून वाढते कर, संरक्षणावरचा वाढता खर्च, विविध कायदे, भडक जाहिराती, दूरचित्रवाणीवरील हीन अभिरूचीचे कार्यक्रम...अस्सं सारंच ते मान्य करायला शिकतात आणि मग हेच शिस्तशीर (!) नागरिक आमच्या संस्कृतीचा आधार ठरतात!

आपल्या सगळ्या शाळांत अलिकडे काही वर्षे 'प्रतिज्ञा' म्हटली जाते. राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल या अपेक्षेने ही प्रतिज्ञा प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्रमिक पुस्तकाच्या पहिल्या पानावर छापली गेली. परंतु अभ्यासक्रमाचा भाग नसलेलं हे पहिले पान सर्वसाधारण शिक्षक आणि मुलं नुसतंच उलटतात असं लक्षात आल्यावर शालेय प्रार्थनेनंतर सामुदायिकपणे प्रतिज्ञा म्हणण्याचा इलाज शोधून काढण्यात आला! परंतु 'भारत माझा देश आहे.. माझ्या देशाच्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे..' प्रतिज्ञेतील अशा वाक्यांचा अर्थ समजेल असा काही प्रयत्नच शाळांत केला जात नाही. (कारण तसा 'आदेश' नाही!) बंदुकीतून गोळ्या उडाव्यात तशा प्रतिज्ञेतील शब्दांच्या फैरी झडतात आणि मुलं वर्गावर्गात जातात – खरं शिक्षण घेण्यासाठी!

सहाच हास्यचित्रं आपण पाहिली. त्यांच्याबद्दल आपण थोडी बातचीतही केली. शाळा म्हणजे शाब्दिक पोपटपची; स्वतःला पटत नसलेलंही मार्क मिळविण्यासाठी लिहिणं; विद्यार्थीना शिक्षक समजून घेतील अशी अपेक्षाच अव्यवहार्य. तात्त्विकदृष्ट्या सुंदर दिसणारे शैक्षणिक तोडगे प्रत्यक्षात फार पोकळ असतात आणि 'शिस्त' या नावाच्या वरवंट्याखाली सारंच कळाहीन, प्राणहीन बनतं–हे सारं फार बोलकेपणं मांडणारी ही हास्यचित्रं तुम्हाला मनोमन पटली याबद्दल मला शंका नाही. मी साशंक आहे ती तुम्हाला पटलेल्या गोष्टी पालक किंवा शिक्षक या नात्यानं साकार करण्यासाठी शिक्षण संस्थात प्रयोगशीलता यावी, त्यात अधिक लवचिकता असावी याबद्दल तुम्ही कितपत अग्रही रहाल आणि शिक्षणसंस्थांच्या बाहेर शिक्षणाचे जे छोटे छोटे प्रयोग उभे राहू पहात आहेत त्यांना सक्रीय सहकार्य द्याल याबद्दल! शिक्षणदेवाची नुसती प्रार्थना काय कामाची? शाळा नामक संस्थांत शिक्षणाची लवचिक, सृजनशील, आनंददायक प्रक्रिया चालायची असेल तर आता शिक्षणाच्या ग्राहकांनीच–तुम्ही–आम्हीच चळवळ उभारायला हवीय.

□

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# कणभर पुढे

पुण्यात नुकताच एक केरळ शास्त्र साहित्य परिषदेचा जनजागरणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी केरळमधून सुमारे वीस सामाजिक कार्यकर्त्यांचा गट आला होता. भोपाळ दुर्घटना, स्त्रियांचे प्रश्न, डॉक्टर करत असलेली बेजबाबदार पिळवणूक, कामगारांचे प्रश्न, शिक्षण अशा अनेक विषयांवर छोटी छोटी नाटकं या गटानी सादर केली. त्यातलं शिक्षण या विषयावरचं 'प्रॉडक्ट' नावाचं नाट्य अगदी झणझणीत अंजन होतं.

पाचसात कार्यकर्ते गोल करून उभे असतात. त्यांच्या हातातल्या पांढऱ्या काठ्या त्यांनी उंच धरलेल्या असतात. त्यांची टोकं वर एकत्र जुळलेली असतात. निवेदक ह्या यंत्राची ओळख करून देतो. तो म्हणतो, 'हे आपल्याकडचं शिक्षणाचं यंत्र आहे. त्याचं नाव लॉर्ड मेकॉले. हे यंत्र फार जुनं झालंय. त्याचे भाग गजलेत, ते नीट चालत नाही. हा इथे हे यंत्र चालवणारा उभा आहे.' हातात नाकासमोर पांढरी काठी उभी धरलेला माणूस मिलिटरी खाक्यात उभा असतो. तिकडून तीन मुलं नाचत बागडत येतात. ती छान गाणी म्हणत असतात. दंगा करत असतात. मोकळेपणानी हुंदडत असतात. यंत्र चालवणारा त्यांच्यापुढे कडकपणे जाऊन उभा राहतो. ती पोरं हसायची थांबतात. हाताची घडी तोंडावर बोट घेऊन गप्प रांगेत उभी राहतात. यंत्र चालवणारा खटाक्‌दिशी एका पोराला धरून यंत्रात ढकलतो. यंत्र सुरू होते. ग, म, भ, न, अ, आ, इ, ई म्हणत थोड्या वेळान धडक् करून थांबतं. फटाक्‌दिशी आतलं पोर बाहेर येतं. बाहेर आलेल्या पोराचे हातपाय वाकडे असतात. ते सरळ उभं राहू शकत नाही. डोळे चकणे, मान वाकडी झालेली असते. असंच नंतर त्या उरलेल्या दोन पोरांचं होतं आणि त्या यंत्राची प्रॉडक्टस् ही तीन लुळी, पांगळी, तिरकी तारकी, वेडी गबाळी पोरं आपल्यासमोर उभी राहतात.

निवेदक त्यांचे हात नीट करायचा प्रयत्न करतो. मान वळवू पहातो, पण बदल पक्का असतो. त्यात काही बदल होत नाही. निवेदक सांगतो हे प्रहसन नाही ही शोकांतिका आहे.

ए, बी, सी, डी किंवा १, २, ३, ४ म्हणणाऱ्या त्या यंत्रानी दिलेली ही प्रॉडक्टस पाहून एकीकडे हसू येत असतानाच एकीकडे चरचरून डाग बसतात मनाला.

ही व्यंगं घेऊनच माणसं पुढचं जीवन जगतात. कामं करतात, नोकऱ्या करतात, गोंधळतात. प्रश्न समजून घ्यायला, ते सोडवायला अपुरी पडतात. निराश होतात. अन्याय करत राहतात. असमाधान वाढवत रहातात.

चार चार पाच पाच वर्षं पदवीचा अभ्यास करून पुन्हा काम करताना आढळायला लागतं की प्रत्यक्षात शिकलेल्या गोष्टींचा फारसा उपयोग होत नाही आहे.

वर्गात शिकवावं कसं हे शिकलेल्या शिक्षकापुढे मुलांचे त्यांच्या पालकांचे वर्गाबाहेरचे प्रश्न आले की काय करायचं उलगडत नाही. समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना खरंखुरं समाजकार्य करायची वेळ आली तर सामाजिक प्रश्नाचं विराट, गुंतागुंतीचं स्वरूप पाहून चक्रावून जायला होतं. अभ्यासक्रमातल्या गुळगुळीत थिअरीत हे शिरलेलंच नसतं, आर्किटेक्टला इमारत कागदावरच कळते. प्रत्यक्षात इमारत उभी राहतानाचे कामगारांचे प्रश्न, मटिरिअलचा तुटवडा, अधिकाऱ्यांची दिरंगाई, लाचखाऊपणा याचा स्पर्श छान छान कपडे घालून कॉलेजात मिरवताना कधी झालेलाच नसतो. डॉक्टर झालेल्या विद्यार्थ्याला 'आपण आपल्या पेशंटचं खरंच भलं करतो आहोत का?' हा प्रश्न स्वत:ला विचारायला वेळच नसतो कारण ही नीती शिकण्यात आलेली नसते. पेशंटसूचं रोगाबाबत शिक्षण करणं ही जबाबदारी त्याची नसतेच, आणि पेशंटस् शहाणे होऊन चालेल तरी कसं? मग बारीक सारीक आजाराला मोठ्ठं इंजेक्शन घेऊन १०–१५ रुपये कोण देईल? विनाकारण ऑपरेशन्स करून घेऊन हजारो रुपये कोण ओतील?

जवळ जवळ प्रत्येक क्षेत्रातली माणसं त्या त्या क्षेत्रातल्या शिक्षणाबद्दल असमाधान व्यक्त करतायत्.

कित्येकदा शिक्षणाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांचा एकमेकांशी किती निकटचा संबंध असतो हे वर्षानुवर्षं लक्षात घेतलं जात नाही. स्त्रियांचे प्रश्न आणि कायदा या विषयावर बोलताना या क्षेत्रातले एक अधिकारी गृहस्थ म्हणाले होते, 'स्त्रियांच्या संबंधित बलात्कार, घटस्फोट इ. खटल्यांमध्ये न्यायाधिशाला काही सामाजिक जाण असली, स्त्रियांच्या प्रश्नांची समज असली तरच योग्य तो न्याय मिळण्याची शक्यता असते. नाहीतर कायद्यातून अनेक पळवाटा काढून स्त्रीला न्याय नाकारला जातो. यासाठी न्यायाधीशांचं ट्रेनिंग होणं अतिशय गरजेचं आहे.'

माणसाला जगवणं, मारणं, तडफडत जगायला लावणे ज्याच्या हाती त्या महत्त्वाच्या माणसाच्या शिक्षणातही ह्या त्रुटी असाव्यात? त्यापायी अनेक निरपराधी माणसांचा बळी जावा? अनेक अपराधी मोकळे सुटावेत आणि हे चुकीचं घडतंय हेही वर्षानुवर्षं कुणाच्या ध्यानात येऊ नये?

आपण सगळेच फार मोठे होईपर्यंत अजाण राहतो. काही वेळा जन्मभर अजाण राहतो. आपल्या मुलांना ही सगळी समज लवकर येईल यासाठी फार प्रयत्न करायला हवेत.

सध्या उन्हाळ्याची सुटी चालू आहे. मुलांसाठी नाटकं आहेत. शिबिरं आहेत. प्रदर्शनं आहेत. कार्यक्रम आहेत. किती मुलांना त्याचा फायदा मिळतो आहे? ही सुट्टीचीच मक्तेदारी का व्हावी! तीही शहरापुरतीच?

चांगले चित्रपट, नाटकं, खेळ, करमणूक, संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला, व्यवहार, कष्ट, श्रम, शास्त्र, सामाजिक जाण, संवाद शक्ती, संपर्क माध्यमांची समज हे मुलांच्या वर्षभराच्या अभ्यासक्रमाचे भाग असायला हवेत. मुलांना वाटेल तेव्हा जिथे जाऊन बसता येईल अशी सुसज्ज वाचनालयं हवीत.

त्यांची सृजनशक्ती फुलवता येईल अशा वाटा वर्षभर उघडया हव्यात.

मुलांच्या खेळांचा अभ्यास करणारे एक तज्ज्ञ सांगत होते. तीन वर्षापर्यंत प्रत्येक मुलाला पोहणं यायला हवं. १२ वर्षापर्यंत त्यांना सगळया खेळांची ओळख व्हायला हवी. खेळण्याची संधी मिळायला हवी आणि मग त्यातून मुलाला / मुलीला स्वतःचा आवडता खेळ निवडता यायला हवा, तो जोपासता यायला हवा. एखाद्याला खेळाची आवडच नसेल, तेही कळायला हवं. आपल्या मुलांना किती खेळ खेळायची संधी मिळते ?

कॉम्प्युटर युग येऊ घातलंय म्हणतात. पण माणसाच्या मनाचा, बुद्धीचा कॉम्प्यूटर अद्याप पुरेसा वापरलाच जात नाही. पुरेसं शिकायची संधी मिळत नाही. ज्यांना हे समजतं ती माणसं वाटा शोधत राहतात.

माणसांच्या शिक्षणाचे झरे समाजात झुळझुळ वहात राहिले पाहिजेत. 'गारांचा पाऊस' हे सदर गेल्या वर्षी जूनमध्ये सुरू करताना हेच मनात होतं. श्रीभाऊ माजगावकर म्हणाले होते. 'मुलं आणि कुटुंब, मुलं आणि पालक, मुलं आणि शाळा, मुलं आणि समाज यांच्यात जे जे घडतं त्याविषयी लिहा. एकाच प्रकाराचं बंधन घालून घेऊ नका. स्वतःवर असं सदर लिहिताना मन वेगळया प्रकारे काम करायला शिकतं, तपशील उचलायला शिकतं. त्या त्या दिवशी तेवढं लिहिणं हे नैसर्गिक क्रियेसारखं चक्र चालू होतं.

या सगळयाचा अनुभव हे सदर लिहिताना मला आला. मुलांच्या संदर्भात आजूबाजूला जे घडतं, ऐकू येतं, वाचायला पहायला मिळतं त्याला शोषून घेणारी संवेदनक्षमता तयार होते याचा उपयोग इतर कामातही होतो. गारांच्या पावसाची दर आठवडयाला वाट पाहणारे खूप वाचक भेटले. काहींनी कधी गारांचा यावेळी चांगलाच मार बसला असंही कळवलं. या वाचकांच्यात विशेषतः पालक असतील अशी माझी समजूत होती. पण एका छोटया वाचकाशीही माझी मैत्री झालीय. दहावीतला हा मुलगा माणूस हातात पडताच प्रथम 'गारांचा पाऊस' वाचतो. त्यानं लिहिलं होतं 'या सदरात तुम्ही आम्हा मुलांच्या बाजूनी खूप काही लिहिता ते आवडतं.' या बालवाचकानी माझ्यावरच्या आणखी एका जबाबदारीची मला जाणीव करून दिली. मुलींना पाळी येण्याबद्दल काय सांगता येईल ते एका लेखात लिहिलं होतं. काही वाचक स्त्रियांना ते हातात पडल्यानी फार बरं वाटलं होतं. त्या म्हणाल्या, 'तो अंक आम्ही जपून ठेवलाय. मुलीची परीक्षा झाल्यावर तिला वाचायला देणार आहे. आमचं मोठं काम तुम्ही केलं.' जागरूकपणे वाचणाऱ्या, संवाद साधणाऱ्या या सर्वच वाचकांबद्दल मला कृतज्ञता वाटते. तुमच्या–माझ्या शिक्षणामधली ही हिरवळ ! ही दिलासा देते. विसावा देते. पुढच्या प्रवासासाठी ओलावा देते.

या लेखाबरोबरच 'गारांचा पाऊस' बंद होतो आहे. त्यानी दिलेल्या गारव्यानी, ओलाव्यानी आणि मारानंही आपण मुलांना समजून घेण्यात आणि स्वतःला ओळखण्यात कणभर पुढे गेलो आहोत असं तुम्हाला वाटतंय ? मला वाटतं आहे !

कुठलंही ज्ञान चार तज्ज्ञ लोकांची मक्तेदारी होऊ नये. ते सहजपणे सर्वांपर्यंत पोचवण्याचं काम अशी सदरं करतात. वाचताना वाचक शिकतो तसं लिहिताना लेखकही खूप शिकतो. त्याला नव्या नव्या वाटा दिसू लागतात. मुलांना समजून घेण्याच्या, त्यांच्याकडून शिकण्याच्या आणि त्यांना शिकू देण्याच्या वाटा सर्वांना गवसत राहोत हीच अपेक्षा ! □

---

**पुस्तके**

## वैशिष्टयपूर्ण व आशयसंपन्न कथासंग्रह : पूर्वज

पूर्वज हा श्री. वि. ग. कानिटकर यांचा कथासंग्रह वाचला आणि एक चांगले पुस्तक वाचल्याचे समाधान मिळाले. या संग्रहातील सात कथा चरित्रात्मक कथा आहेत. मराठीत आजवर अनेक चरित्रात्मक कथा, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. तरीही श्री. कानिटकर यांच्या चरित्रात्मक कथांना स्वतःचे वैशिष्टय आहे. बहुतेक चरित्रात्मक कथा, कादंबरीत वर्णित सुप्रसिद्ध व्यक्तीचे कौटुंबिक जीवन आणि कर्तृत्वजीवन यातील संघर्ष किंवा एखादे प्रेमप्रकरण रंगविले असते. पूर्वज या कथासंग्रहातील कथा सुप्रसिद्ध व्यक्तींवर असल्या तरी यापेक्षा वेगळया आहेत. इ. स. १८७० ते १९२० या कालखंडातील महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनातील काही प्रसंगांवर, काही क्षणांवर, एखाद्या बाजूवर या कथा लिहिल्या आहेत. निरनिराळया व्यक्तींच्या जीवनातील, निरनिराळया पैलूंनी लेखकाला आकर्षित केले आहे.

म्हणून पूर्वज या कथासंग्रहातील कथांच्या विषयांना विविधता आहे. अमित्र या कथेत काशीताई कानिटकर आणि गोविंदराव कानिटकर हे दांपत्य आणि सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. हरिभाऊ आपटे यांच्या गाढ स्नेहाचे आणि अबोल संघर्षाचे चित्र आहे. पहिले नाटक या कथेत आद्य मराठी नाटककार विष्णुदास भावे यांनी त्यांच्या पहिल्या नाटकाकडे केलेला प्रवास आहेच. शिवाय रंगभूमीवर पहिले नाटक करण्यासाठी आधी सरकारवाडयात करावे लागलेले हिकमती नाटक आहे. ग्रँड इंडियन सर्कसमध्ये सर्कसच्या नादाने बेभानपणे घराबाहेर पडलेले विष्णुपंत छत्रे आहेत. विष्णुपंत आणि आवडी डोंबारणीचा विलक्षण योगायोग आहे. त्या योगायोगातून धोंडोपंतांच्या आयुष्यातही एक सर्कस निर्माण झाली आहे. नटश्रेष्ठ गणपतराव जोशी यांच्या हळुवार, उत्कट मनाचे सखोल दर्शन 'चरित्र' या

कथेत आहे. एक विवाहसंबंध जुळविण्यातले राजकारणी पेच 'सणग' या कथेत पकडले आहेत. 'मंथरे तुला लागले पिसे' या कथेत भास्करबुवा बखले यांची रंगभूमीवरील प्रथम प्रवेशाची धुंद कहाणी आहे. रावसाहेब मंडलीकांच्या जीवनातील विलक्षण नियती 'दत्तक' या कथेत चित्रित झाली आहे.

भूतकालीन चरित्रात्मक लेखनामध्ये कित्येकदा अनेक हेतू दिसतात. कधी त्यातून आपला गौरवशाली इतिहास कथन केला जातो. कधी त्यात दलितांची समस्या शोधली जाते. कधी आधुनिक मानवाच्या सुखदुःखाचे प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न होतो. 'पूर्वज'-मधील कथांवर अशा कोणत्याही हेतूचे दडपण दिसत नाही. प्रत्येक कथेतील व्यक्ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील सुप्रसिद्ध व्यक्ती असली तरी त्या व्यक्तीचा गौरव करण्याचा किंवा तिला खाली खेचण्याचा प्रयत्न या कथांमध्ये केलेला नाही. या व्यक्तींना जाणून घेणे या छंदातून सर्व कथांचा जन्म झालेला दिसतो.

चरित्राबरहुकुम या कथा आहेत किंवा नाहीत या प्रश्नात मी शिरत नाही. केवळ लेखनाकृती म्हणून त्यांचा विचार करीत आहे. या कथा चरित्रावर आधारीत असल्या तरी त्या केवळ हकीगत कथन, निवेदनात्मक पद्धतीच्या नाहीत. लेखकाच्या प्रतिभेने निरनिराळ्या व्यक्तींच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे मुख्य व्यक्तींच्या भोवती अनेक लहानमोठ्या व्यक्ती, स्थळे साकार झाली आहेत. यात मर्यादेने वागणाऱ्या सासुरवाशीणी आहेत. बनेल रखेल्या आहेत. लेकीच्या लग्नासाठी अगतिक झालेला पिता आहे. तसाच मुलगा नाटकात गेला म्हणून शंकित झालेला पिता आहे. लग्न जमविण्याच्या खुब्या सांगणारे भटजी आहेत. नटवेष घेणाऱ्यांना पंक्तीत घ्यावे की न घ्यावे म्हणून अटीतटीने वाद घालणारे शास्त्री आहेत. खेडेगावातले वाण्याचे दुकान आहे. मुंबईतल्या गॅसबत्त्यांच्या उजेडात झळाळणारे नाट्यगृह आहे. यातून प्रत्येक कथेचे स्वत:चे असे रसायन तयार झाले आहे आणि स्वयंपूर्ण असे चित्र उभे राहिले आहे. त्यामुळे या कथा विशिष्ट व्यक्तींपुरत्या मर्यादित न रहाता विशिष्ट मनोवृत्तीच्या कथा होतात. म्हणूनच 'अमित्र' या कथेतील हरिभाऊ–काशीताई–गोविंदराव या तीन व्यक्तींमधला संघर्ष कोणत्याही संवेदनाक्षम व्यक्तीला आपला संघर्ष असे वाटू शकते. 'राज्यपद जवळ आणून देणारा असेल तर आम्ही वाड्यात सापदेखील प्रेमानं सांभाळतो' या दाजीबांच्या मनातील उद्गारात राजकारणी माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे सारच समजल्यासारखे वाटते. रावसाहेब मंडलीकांना पहाताना एका सत्शील परंतु धारदार व्यक्तिमत्त्वाचा, उग्र तशाच हळव्या मनाच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा गवसल्यासारखा वाटतो. कथा आशयसंपन्न होते.

श्री. कानिटकर यांची शैली सुबोध, ओघवती आहे. अलंकरण हा तिचा स्वभाव नाही. 'रस्ता निर्मनुष्य होता. एखाद दुसरा टांगा विरुद्ध बाजूने गावात येत होता. दुतर्फा शेतातून गडी माणसे काम थांबवून घरी जायच्या विचारात होती. मावळत्या प्रकाशात चितुर पाखरं सर्वत्र घिरट्या घालीत होती. गोविंदरावांची पावलं झपाझप पडत असली तरी डोके मात्र भणाणत चालले होते' (अमित्र) अशा अनलंकृत शब्दात किती तरी प्रसंग सहज दृग्गोचार होतात. सर्वच कथांमध्ये अनेक संवाद आले आहेत. या संवादांमध्ये बायकी भाषा, पुरुषी भाषा, असंस्कृतांची भाषा, सुसंस्कृतांची भाषा, राजदरबारातल्या लोकांची भाषा, सामान्य माणसांची भाषा यामधले बारकावे फार सहजपणे टिपले गेले आहेत. 'घोंड्याचा बावटा आलाय पुढे. आता मागून विष्णूचा रथ यायचा असेल.' (ग्रेट इंडियन सर्कस) जुन्या बायकांची बोलण्याची पद्धती यात अचूक पकडली आहे. डोंबारी दणादणा बोलतो. श्रीमंत शांतपणे बोलतात. रावसाहेब मंडलीक मोजकेच बोलतात. श्री. कानिटकरांच्या शैलीत फार क्वचित प्रतिमा येतात आणि त्या सूक्ष्म संवेदना टिपतात. 'एखादा प्रचंड पक्षी थरथरावा तसा तो अवाढव्य कापडी तंबू त्या सुरांनी थरारून जात असतानाच ...' अशा प्रतिमेतून भरलेला सर्कसचा तंबू डोळ्यांना दिसतो. बँडचे सूर ऐकू येतात. मुंबईच्या चाळीतल्या आवाजावर ते म्हणतात, 'असंख्य संमिश्र आवाजांची एक नदीच अखंडपणे वहात होती.'


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

ओघवत्या शैलीतील 'पूर्वज' हा कथासंग्रह विषयदृष्टधा वैशिष्ट्यपूर्ण आणि आशयाने सपन्न आहे.

—विनया खडपेकर

'पूर्वज'
वि. ग. कानिटकर
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठसंख्या : १०९
मूल्य : वीस रुपये

## गंगार्पण — समृद्ध कथा

मराठी कथेला समृद्ध करण्याचे ज्यानी प्रामाणिक प्रयत्न केलेत किंवा करताहेत, त्याच्यात राजेंद्र बनहट्टीचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. त्याची अनुभव घेण्याची पद्धत वेगळी आहे, हे त्याचा 'गंगार्पण' हा सहावा कथासग्रह वाचून लगेच जाणवत. मिळालेल्या अनुभवावर ते उतावीळपणाने कथा लिहून त्याला शब्दात पकडण्याची घाई करत नसावेत. तो अनुभव चागला मुरू देऊन त्याला नैसर्गिक घाट देत असावेत, असं त्याची कथा वाचून वाटतं.

श्री. बनहट्टीच्या कथेची सर्व सौंदर्यलक्षण सग्रहातल्या पहिल्याच, 'समंध' या कथेत एकवटली आहेत. एक निर्दोष कथा म्हणून तिचा उल्लेख करावा लागेल. कॉलेजमध्ये हुषार म्हणून नावाजलेले फिजिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक, बोडस सर आणि त्यांचा त्यांच्याइतकाच किंबहुना त्याच्याहून काकणभर सरसच असा हुषार पण अतिशय विनम्र आणि बोडस सरांवर पुत्रवत् आदरयुक्त प्रेम करणारा त्यांचा विद्यार्थी दिघे यांच्यातील सबंधावर आधारलेली ही कथा मनाचा ठाव घेते. एक अत्यंत पवित्र आणि देखण नातं ती आपल्यासमोर उलगडते. दिघेच्या बुद्धिमत्तेचा बोडसांना अभिमान आहे; पण त्याचं तळपणं बोडसाना हळूहळू, त्याचा अजिबात तसा हेतू नसूनही बाजूला टाकत. हे सर्व सहजा घडतं अस नाही. सस्थेची बॉडी हे घडवून आणते. एम्. एस्. सी होताच दिघेसाठी जणू वाटच बघत असलेलं प्राध्यापकपद त्याला सहज मिळतं. त्याचं नाव ज्याच्या त्याच्या तोंडी होत. पुढे दिघेला मिळालेली लाइफ मेंबरशिप, स्वतत्र बंगला, हेड ऑफ द डिपोर्टमेंट हे सगळे बहुमान दिघेकडे चालत येतात. बोडसानी मात्र त्या गोष्टीची जन्मभर केवळ वाटच पाहिली असते. शेवटी तर बोडसाची बदली करून त्याना सागलीला पाठवलं जात ! या कळसाला लेखकानं अप्रतिम वळण दिलंय ! प्रत्येक घटनेच्या वेळी दिघे आणि बोडसांच्या होणाऱ्या प्रतिक्रिया, त्यांचं सभाषण, उभयतांची घालमेल विशेषत: बोडसाच्या मनातला सूक्ष्म संघर्ष हे सर्व बनहट्टीनी कमालीच्या कुशलतेन टिपले आहे. या कथेचा खरा आस्वाद म्हणजे ती कथा वाचणं एवढंच म्हणता येईल !

'गंगार्पण' ही कथाही अशीच कसदार. संघाची तत्त्व रक्तात पेरून त्यासाठी आयुष्य झोकून देणारा अण्णा आणि त्याचे हताश, अगतिक आईवडील याची ती सुन्न करणारी कहाणी आहे. अंगावर वळ उमटेपर्यंत संघाच्याच पट्ट्यानी वडिलानी झोडपल तरी तोंडावाटे ब्रही न काढता मुकाटपणे आपली सघभक्ती कायम ठेवणारा अण्णा संघकार्यासाठी घर सोडतो. त्यान इतर भावंडाप्रमाणे लग्न करून ससार करावा अशी आईची इच्छा. पण अण्णाचा ध्येयवाद श्रेष्ठ. जन्मदात्याना आपला राग सोडणं भाग पडतं. अण्णा एक खूळ डोक्यात घेऊन निघून गेलेला. तुरुंगातही गेलेला. मध्येच केव्हा तरी तो उगवायचा. घरच पोटभर खायचा बरोबर कार्यकर्त्याच टोळकं असायचे. तेही ताव मारायचे. पुन्हा खर्चाला आई बिचारी मायेपोटी पैसे द्यायची. ह्याला कमवायची अक्कल नाही. पण पुढे पुढे पैसे घेणे हा आपला रास्त हक्क त्याला वाटू लागतो त्यात लाज वाटत नाही आईवडिलाची परिस्थिती काही फार चागली नाही. तरी ते कर्तव्य म्हणून त्याला पैसे पुरवत राहतात. त्यालाही थोडे फार पैसे मिळायचे; पण आईवडिलाना काही देण्याची बुद्धी त्याला कधीच झाली नाही. वडिलाच उतारवय येत. कमाईची ते मुलामध्ये सारखी वाटणी करतात. अण्णाच उतारवयात कसं होईल याची काळजी त्याना जास्त. म्हणून ते वीस हजार रुपये अण्णांच्या नावाने डिपॉझिट म्हणून बँकेत ठेवतात त्या डिपॉझिटवर वर्षभराच्या आतच कर्ज काढतो. नव्वद टक्के रकमेचा चुराडा ! त्याच व्याज भरण्याची जबाबदारी पुन्हा आईवडलावरच, कारण बँकेचा तगादा त्याच्याच मागे. अण्णा सघकार्यासाठी मॉरिशसला निघून गेलेला. आई सतापते, चिडते, वेडाची झाक तिच्या हसण्याबोलण्यात येते. वडील अत्यत सोशिकपणे तिची समजूत घालतात. उरलेला जन्म अण्णान काढलेल्या कर्जाचे हप्ते भरण्यात त्याना घालवायचा असतो. जे काय करायचं ते आपण केलं. तो गेला तो कधी परत आलाच नाही समजा कुंतीने नाही का, आपला पहिला पुत्र गगार्पण केला ? तस झालं समजा ? वडिलाचे, एक वृद्ध पित्याचे, कर्तव्यशून्य नादान मुलाच्या बापाचे हे शब्द काळजाला घरं पाडतात. वार्धक्याची एक नितात करुण व्यथा त्यातून बोलकी होते. अशा किती तरी पित्याना आपले पुत्र निरनिराळ्या कारणासाठी गंगार्पण करावे लागत असतील आणि म्हातारपणी एकमेकाचे अश्रू पिण्याचेच तेवढ काम उरत असेल. वाया गेलेली पोरं अनेक असतात; पण सत्कार्य म्हणून अगिकारलेलं कामही किती स्वार्थी आणि आधळ असू शकत याचा प्रत्यय ही कथा वाचून येतो.

पितृप्रेमाची एक वेगळीच तऱ्हा 'पूर्वज' या कथेत बघायला मिळते. काहीशी गूढत्वाची झाक असलेली ही कथा. दामू हा अर्धवट, वेडसर मुलगा. नानाचा—त्याच्या वडिलाचा त्याच्यावर सर्वात जास्त जीव. मरतानाही त्याच्या डोळ्यात दामूचीच काळजी मूकपणे हलत होती. आपल्या पश्चात् या वेड्या पोराला कोण विचारणार याच चिंतेत गेलेला आत्मा पोराभोवतीच घोटाळत राहिला. नाना गेले त्या जागी ठेवलेल्या पीठावर उमटलेली लाब रेघ बघून जमलेल्या सर्व नातलगाची खात्री पटली की, नाना नागाच्या जन्माला गेला दामूला पित्याच्या घोटाळणाऱ्या आत्म्याची चाहूल लागत असावी. एक दिवस तो गावाबाहेर रानजाईकडे गेला. गूढ ओढा, गूढ डोंगर, झाडोऱ्याचं रान, खडक, त्याच्यातल्या गुहा, बेभान पायवाटा, ओढाळ सावल्या हे सर्व दामूला सैरभैर करून खुणवायला लागलं. त्याला नाग झालेल्या पि[illegible]चा शोध घ्यायचा असावा. अखेर त्या गुहेत त्याला प्रचंड लाबीचा काळा

नाग दिसला. त्याच्या दर्शनाने दामू बेभान झाला. नागाप्रमाणेच डोलू लागला. हळहळू त्याच्या पापण्या जड झाल्या. तोंडात अंगठा अडकेला आणि त्याचे शरीर सैल पडले. दामूची आणि नागाची भेट, वेडया दामूची नागाशी झालेली तल्लीनता, समतानता आणि एकरूपता लेखकानं समर्थ वर्णनातून उभी केली आहे

'देवळातले तीन दिवस' ही जीवनकलह, त्यासाठी एका साध्या माणसाची चाललेली धडपड आणि देवाच्या दारातून टग्यानी केलेली त्याची विटबना व हकालपट्टी या अनुभवासाठी, वाचनीय ठरते. एक निसर्गरम्य गाव गावाबाहेर सुदर टेकडी आणि त्या टेकडीवरचं ओबडधोबड देऊळ. सोनचाफ्याचं झाड सुगध शिपडत उभ आणि सतत हुंदडत जाणारं वारं. एक दिवस टेकडी चढून निनावे तिथं आला. मडपात खांबाशी बसून रहायला लागला. देवळातला गुरव, आबा ह्या माणसानी त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण तो अगदी मोजकंच बोलायचा. देवळात येणाऱ्या जाणाऱ्याना निनावे दिसायचा. त्याच रोजचं तिथ असणं भोळयाभाबडया लोकाच्या श्रद्धेला आव्हान देऊ लागल. काही लोक त्याच्यासमोर पैसे टाकायचे. काही लोक आपल्या अडचणी, दु:खं सांगायचे. त्यांना धीर द्यायला निनावे काहीतरी बोलायचा. हळूहळू तो बायाबापडयाचा 'देवळातला बाबा' झाला. गुरवाला हे आवडलं नाही. देवस्थानात भीक मागण किंवा बुवाबाजी करण चालणार नाही अशी समज त्यानं निनावेला दिली. खरं तर निनावेचा या दोहोपैकी कोणताच उद्देश नव्हता. त्याचं वागणं तर असं सरळ होतं की त्याला घालवून द्यायचा उपाय आबाना अगर गुरवाला सापडेना; पण अखेर सापडला. देवाच्या गळयातली माळ गेली असा आळ घेऊन निनावेला काठयानी भरपूर झोडपलं गेलं आणि त्याला टेकडीचा पायथा दाखवण्यात आला माणसांमधली स्पर्धा जीवघेणी असते आणि साध्या सरळ माणसाला सुखान जगू देत नाही देवाच्या दारी साळसूद चोरटेपणा मात्र सर्रास खपतो या सत्याचं भेदक दर्शन या कथेतून होत.

बनहट्टीच्या कथामध्ये शहरी आणि ग्रामीण अनुभव सारख्याच ताकदीने पेललेले असतात. जे काही सागायचं ते सोप्या भाषेत सागितलेलं. पण गूढत्वाची ओढ असलेली. नाग किंवा साप आणि वेडसरपणा यांचं त्याच्या प्रतिभेला असलेलं आकर्षण कथा वाचताना जाणवत रहात नागाच्या रूपानं गुहेत वास करणारा दामूचा पिता हे 'पूर्वज' या कथेतल नागाचं एक रूप तर 'साप' या कथेत साप चावून मुलगा मेल्यापासून भ्रमिष्ट झालेला बाप आढळतो. त्या पिवळयाधमक सापाची भीती दाखवून तो शेजारच्या रिकाम्या बगल्यात कोणालाच राहू देत नाही. ज्या दिवशी सापानं त्याच्या मुलाला दंश केला त्या दिवसापासून तो त्या सापाचा वेडयासारखा शोध घेत होता. इथं त्याच्या मनीमानसी बसणारा साप त्याच्या पुत्रविरहाचं, शोकाकुल अवस्थेचं आणि चिरतन दु:खाचं प्रतीक बनून जातो.

बनहट्टीच्या कथेमधली काही माणसं आपल्या मनात घर करून बसतात. कथेतून हरवलेली ती माणसं आपल्या मनात वस्तीला येतात 'हरवलेली माणसे' या कथेतला पाडे अशीच एक नामी वल्ली. तसा अगदी फाटका माणूस. छपाईचा कागद खपवण्याचं कॉन्ट्रॅक्ट घेऊन त्यावर थोडेसे पैसे मिळवायचा दुसऱ्याच्या पैशान नेहमी नाटक आणि इंग्रजी सिनेमे बघायचा काही दिवसात त्यानं स्वत चं वेगळ दुकान टाकलं. तो लेखकाकडे पूर्वीसारखा येईनासा झाला. आतापर्यंत सहवासानं लेखक त्याच्यात गुंतला होता. पण पाडेच्या मनाचा थाग त्याला लागला नव्हता. पाडे त्याच्यापासून असाच दूरदूर गेला, नोकऱ्या बदलत राहिला आणि एक दिवस जगाच्या गर्दीत हरवून गेला काही देण घेण नसताना पाडे या माणसाबद्दल आपल्याला इतक का वाटत, ते लेखकालाही कळेना. आयुष्यात काही माणस अशी भेटतात की ती कळत नकळत स्वत:कडे आपल्याला खेचतच राहतात. प्रकाशाच्या, कोलाहलाच्या, झगमगाटाच्या जगापासून हा पाडे कायमचा दूर निघून गेला. पण लेखकाला तो कधीच कळू शकला नाही. त्यानं पाडेच्या मुलाला आणि पत्नीला भेटून त्याच्याविषयी जाणण्याचा प्रयत्न केला, पण पाडेच्या एकलेपणाचं गूढ त्याला शेवटपर्यंत कळलं नाही.

अशा बनहट्टीच्या कथा. कथेला काही निश्चित कथानक असेलच अस नाही कथाविषय झालेल्या व्यक्तीचं व्यामिश्र मन हेच त्यांच कथानक असतं. त्या मनाचे पापुद्रे उलगडताना काही वेळा सूचकता तर काही वेळा गूढता यांचा आश्रय लेखक घेतो. त्यामुळ कथा सूचकतेच्या अंगानं अधिक जाऊन धूसर होत जाते. याला अपवाद काही कथाचा. समंध, गगार्पण, साप आणि सांगाती या कथा अपवाद ठरतील. म्हणूनच त्या जास्त लक्षात राहतात आणि आवडतातही. काही मनामनाची नाती इतकी अतूट असतात की, देहाच्या जन्ममरणाने त्यात काही फरक पडत नाही. असे आत्मे जन्मजन्मांतरीचे एकमेकाचे सागाती असतात, हे सांगणारी 'सांगाती' ही कथा अशीच चटका लावून जाते. 'वनवास' ही सरळ उलगडत जाणारी कथा. केवळ भूतदयेपोटी टाकून दिलेल माजराचं पिल्लू घरी आणल्यावर ती त्यात मनानं गुतत जाते. तिचा नवराही. पण ते मोठं झाल्यावर शेजाऱ्यांच्या तक्रारी यायला लागतात. तिला पुन्हा त्याला नाइलाजानं टाकून द्याव लागत. तिच्या आयुष्यात एक भरलेली जागा अचानक रिकामी होते. आपल्या आयुष्यात अशा किती तरी पोकळया निर्माण झालेल्या असतात.

अशा असंख्य पोकळयांना बनहट्टी शब्दांनी भरून काढतात, तेव्हा त्याच्या कथा बनतात!

—आशा कर्दळे

गंगार्पण
राजेंद्र बनहट्टी
विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे
पृष्ठे · १८६, किंमत : ४० रु.


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

रंगभूमी

# दोन घटका रंजन करणारा
# चोरीचा मामला

वि. भा. देशपांडे

'मामला चोरीचा' हे वसंत सबनिसाचे नवे नाटक. नाटकाचे नाव आणि नाटककाराचे नाव एकत्रित डोळ्यासमोर आले की, काही नाटकाची जात आपण ओळखू शकतो त्यातले हे नाटक आहे. या नाटकाचा बाज आहे विनोदी याला आणखी एक पूरक गोष्ट आहे ती म्हणजे शरद तळवळकरांच्या कलाकार नाट्यसंस्थेसाठी पर्यायाने तळवळकरांसाठी हे नाटक आहे म्हटल्यावर ते विनोदी असणार हा अंदाज अचूक आहेच.

नाटकाच्या कथानक घडणीत किंवा व्यक्तिरेखनाच्या संदर्भात नवे असे फारसे नाही. एक कुटुंब. नवरा, बायको, मुलगा, मुलगी. बायकोच्या माहेराहून आलेल्या इस्टेटीवर घर सुखात आहे. या सुखामुळे किंवा आणखी काही कारणामुळे घरचा कर्ता पुरुष रीतीप्रमाणे कामधदा किंवा नोकरी वगैरे काहीच करीत नाही. अनेक अर्थाने घरातील सर्व गोष्टींवर बायकोचे—बाईसाहेबाचे वर्चस्व आहे दरारा आहे चालण्या—बोलण्यात जरब आहे. प्रत्येक शब्द झेलला जातो आहे हे तिचे वर्चस्व काही दिवसानी घरातल्या मडळींना त्रासाचे होऊ लागते. उरलेले तिघे आणि मदतीला दोघेजण घेऊन घरातल्या बाईसाहेबाविरुद्ध कारस्थान रचून एकप्रकारे बंडखोरी करतात. ती बंडखोरी, कारस्थानें आपल्या देखत घडत असतात. त्याचे पुढे काय होते ते प्रत्यक्षात पाहण्यासारखे आहे, सागण्यासारखे नाही. सबनीसानी तसे सरळ, साधे, हसे मिळतील या हिशेबाने हे नाटक लिहिलेले आहे. एक मनोरंजक किंवा दोन घटका हसवणे एवढाच याचा माफक हेतू असल्याने या नाटकाच्या संहितेच्या संदर्भात अधिक अपेक्षा करण्यात मतलब नाही, कारणही नाही.

वसंत सबनीसांनी शरद तळवळकरांना विनोदी नाटक देणे याची त्या दोघाना आणि पर्यायाने प्रेक्षकाना सवय झालेली आहे. त्याचा एक अर्थ असा आहे की, हे नाटक तळवलकरांना गृहीत धरून बेतलेले असते. तसे याही नाटकाच्या संदर्भात घडलेले आहे. भाऊरावच्या मध्यवर्ती भूमिकेत खुद्द तळवलकर आहेत. त्यांच्या पत्नीच्या—बाईसाहेबाच्या भूमिकेत अश्विनी देसाई आहेत. नाटकात कथानक घडण्यास आणि प्रतिक्रिया व्यक्त करणारी अशी ही लक्षवेधी पात्रे आहेत. त्याच्या जोडीला पूरक म्हणून जे कलाकार आहेत त्यामध्ये अजित आणि अमृता सातभाई, अतुला भाडवडेकर, श्रीकात कुलकर्णी, चंद्रशेखर भागवत इत्यादी आहेत.

ह्या सर्व कलाकारामध्ये अभिनयाच्या हिशेबात दोन स्तर आहेत. शरदराव आणि अश्विनीबाई याना आजवरचा नाट्याभिनयाचा जो अनुभव आहे, त्या बळावर ते आपला अभिनय सहजपणाने करू शकतात हे सतत प्रत्ययाला येत होते. विशेषत: विनोदी नाटकाला वाक्यफेकीचा वेळेचा जो अचूक अंदाज असावा लागतो, विशिष्ट शब्दानी विशिष्ट परिणाम साधावा लागतो याचे भान त्याना चागले आहे. परिणामी प्रयोगाची रगत वाढत जाते, त्याचे श्रेय या दोघांकडे जाते. अन्य कलावंताच्या बाबतीत एक गोष्ट जाणवत होती ती म्हणजे नाटककाराने लिहिलेले शब्द, दिग्दर्शकाने दिलेल्या सूचना याचे पालन काटेकोरपणाने होत होते पण विनोदी नाटकात तेवढयाने भागत नाही. आपण उच्चारलेले वाक्य किंवा शब्द प्रेक्षकावर किती आणि कसा परिणाम घडवतात याचा अंदाज यावा लागतो तो पहिल्या वाक्याचा अदाज घेऊन मग पुढच्या वाक्याची फेक अपेक्षित असते. हे एक तंत्र आहे ते जमायला काही प्रयोग खर्ची घालावे लागतील. अजित, अमृता, हे कलाकार गुणी आहेत. हौशी रंगभूमीवरचा अनुभव काही प्रमाणात त्याच्या गाठी आहे ते नव्याने व्यवसायात येत आहेत ही स्वागतार्ह गोष्ट आहे. प्रत्यक्ष व्यावसायिक रगमचावर आल्याखेरीज त्यातल्या खाचाखोचा कळणे अवघड असते. ही एक सधी आहे त्याचा किती उपयोग करून घेतात ते पाहू या त्याच्याकडून अपेक्षा आहेत म्हणून हे सारे सांगणे.

या नाटकाच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिग्दर्शन दामू केंकरे यांचे होते. केवळ दिग्दर्शनच नव्हे तर प्रकाशयोजना आणि नेपथ्य ही जबाबदारी त्यानी साभाळलेली होती. ह्या तिन्ही विभागात केंकरे निष्णात किंवा प्रवीण आहेत हे त्यांनी गेल्या तीस—पस्तीस वर्षात सप्रयोग सिद्ध केले आहे. त्याचा प्रत्यय याही ठिकाणी आला. त्यानी नाटकाची जात ओळखून फारशी गुतागुत न ठेवता पात्राच्या केलेल्या विरचना, त्यांना दिलेल्या हालचाली नाटकाचा परिणाम वाढवायला कारणी ठरल्या. नाटकाच्या प्रयोगाचा वेग आणि समयसूचकता यावरचे त्याचे नियत्रण जाणवणारे होते. केंकरे हे हौशी—प्रायोगिक—व्यावसायिक रंगभूमीवर आपल्या तब्येतीने, तंत्राने दिग्दर्शने करीत असतात. त्याच्या दिग्दर्शनाचा सख्यात्मक भाग कमी वाटला तरी गुणात्मकता किती तरी पटीने अधिक असते. त्यांच्या दिग्दर्शनाचे जे काही विशेष आहेत त्यामध्ये स्वरनियंत्रण हा जसा भाग आहे, तसाच सपूर्ण नाटकभर त्याचे दिग्दर्शन सहजपणाने मिसळून गेलेले असते. येथे दिग्दर्शक दिसतो असे त्याच्या नाटकाच्या बाबतीत घडत नाही नाटकाचे एकूणच सुविहितपण जे जाणवते त्यातला फार मोठा वाटा त्याच्या दिग्दर्शनाचा असतो हे फार थोडयांच्या ध्यानी येत असावे. 'मामला चोरीचा'मध्ये हे सहजपण, सुविहितपण आपल्याला जाणवेल पण केंकरे म्हणून वेगळे जाणवणार नाहीत. त्यानी केलेले नेपथ्य नाटकाची गरज उत्तमपणाने भागवणारे होते. पण समोरच्या भिंतीला असणाऱ्या काचेच्या खिडक्या पहिल्या दोन अंकात विशेष वापरात दिसल्या नाहीत. बाईसाहेबांचे ऑफिसचे अनेक सदर्भ नाटकात आहेत. पण त्या हॉलमध्ये विशेषत: फोनच्या टेबलावर त्याच्या काही वस्तूंच्या खुणा जाणवल्या नाहीत. नेपथ्यकार म्हणून त्यांनी ह्या गोष्टीचा विचार केला असेलच. पण प्रेक्षकाच्या बाजूने हे जाणवले एवढे मात्र निश्चित. काही वर्षांच्या अंतरानतर केंकरे हे दिग्दर्शक म्हणून पुन्हा पाहावयास मिळाले ही चागली गोष्ट आहे. त्याच्या प्रथितयश, परिपक्व दिग्दर्शकाचा लाभ नाटककार, नाट्यसंस्था योग्य त्या प्रमाणात उठवतील अशी आशा.

□

# नवरी मिळे नवऱ्याला

## हलकीफुलकी करमणूक

उकाडा दिवसेंदिवस असह्य होत चाललाय. घरात बसून पंखा किंवा गार पेयाद्वारे तो दूर करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा दोन-तीन तास शीतल करमणूक हवी असेल तर सरळ 'नवरी मिळे नवऱ्याला' असं मजेदार नाव असलेल्या चित्रपटाची वाट धरावी. सचिननं दिग्दर्शित केलेला हा चित्रपट घटकाभर करमणुकीसाठी नक्कीच चांगला आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या विनोदी किंवा विनोदी व्हायचा प्रयत्न करणाऱ्या चित्रपटांची लाट आली आहे. 'गोंधळात गोंधळ'च्या यशामुळं ही प्रेरणा इतरांनी घेतली असावी. काही असलं तरी तमाशाच्या चक्रातून चित्रपटसृष्टी बाहेर पडली हे स्वागतार्हच. 'नवरी मिळे......' हा चित्रपटही या ताज्या लाटेला सुसंगत असाच आहे.

चित्रपटाचा नायक आहे जयराम (सचिन) हा जयराम भाऊराव देशमुख (श्रीकांत मोघे) या बड्या कॉन्ट्रॅक्टरच्या घरी कामाला असतो. स्वतः देशमुख, त्यांची पत्नी (आशालता), फोटोग्राफीचा नाद असलेला मुलगा रमेश (संजय जोग) आणि मुलगी रश्मी (नीलिमा) या कुटुंबात तो घरच्यासारखाच असतो. घरात या चलाख जयरामशिवाय कुणाचंही पान हलत नसतं.

अशा या जयरामची भेट अपघातानंच चमेलीशी (सुप्रिया सबनीस) होते. चमेली अनाथ असते आणि कामाच्या शोधात असते. पण जयराम इतकीच तीही चलाख असते. अशा या चमेलीला जयराम आपल्या शेजारीच रहाणाऱ्या इनामदारांकडे नोकरी लावून देतो.

इनामदार हे माजी संस्थानिक. आता त्यांची स्थिती 'बडा घर पोकळ वासा' अशी उरली असली तरी इनामदारांच्या माँसाहेब (दया डोंगरे) मात्र अजूनही संस्थानिकांच्या



काळातून बाहेर यायला तयार नसतात. संस्थानिकांनी काम करायचं नाही या रिवाजामुळं त्यांचा मुलगा नानासाहेब व नातू बाळासाहेब (अशोक सराफ) घरात नुसते बसून असतात. चांगली चित्रकर्ती असलेली त्यांची नात कला (निवेदिता जोशी) ही देखील आपल्यावर पडणाऱ्या बंधनांमुळं उदास असते या घरात चमेली काम करायला लागते आणि ती व जयराम मिळून देशमुख आणि इनामदार कुटुंबाचा कायापालट घडवून टाकतात.

रश्मीला कॉलेजात लागलेल्या वाईट संगती ओळखून जयराम तिला योग्य वाटेवर आणतो. दुसऱ्या बाजूला नुसतं घरी बसून खाण्याबद्दल चमेली बाळासाहेबांना सुनावते. परिणामी ते देशमुखांच्याच कंपनीत नोकरीला लागतात. बंदूक चालवायची समान आवड रश्मी आणि बाळासाहेबांना एकत्र आणते आणि ते लग्न करायचं ठरवतात.

रमेश फोटोग्राफीचा नाद असल्याने अनेक मुलींचे फोटो काढत असतो आणि त्या सगळ्यांना प्रेमाची वचने देत असतो. पण एकदा जयराम त्याला चांगला धडा शिकवतो आणि तो व चमेली रमेश आणि कलाची भेट घडवून आणतात. अर्थात हे सगळं करताना जयराम आणि चमेली एकमेकांच्या प्रेमात पडतात हे ओघानं आलंच या दोन्ही लग्नांना थोडासा विरोध वगैरे होऊन शेवट अर्थातच गोड.

कथा स्वतः सचिनची आहे. पटकथा आणि संवाद वसंत सबनीसांचे आहेत. कथेत फारसं नाविन्य नसलं तरी बंदिस्त पटकथेमुळं, चुरचुरीत संवादांमुळं ती आकर्षक बनली आहे. संपूर्ण चित्रपटभर नर्मविनोदाचा सतत शिडकावा करण्यात सबनीस यशस्वी झाले आहेत.

सचिनने चित्रपट चांगला घेतला आहे. त्याचा वेग कायम ठेवल्यामुळं त्याची रंगत वाढलेली आहे. चित्रपटात पात्रं खूप आहेत पण तरीही बहुतेक सगळ्यांना वाव मिळाला आहे. त्यांच्यातल्या निरनिराळ्या प्रसंगांची बेमालूम सरमिसळ करण्यात आली आहे. शेवटी शेवटी मात्र घर सोडून जाणं वगैरे प्रकारामुळे चित्रपट काहीसा भडक बनतो. पण तिथं सुद्धा जास्त ताणलेलं नाही. त्यामुळं तेवढा भाग सुसह्य होतो.

चित्रपटातल्या तीन नायिकांसाठी सचिनने तीनही नवीन चेहरे निवडले आहेत. पण यात खरी भाव खाऊन गेलोय सुप्रिया सबनीस. खरं तर तीच चित्रपटाची खरी नायिका आहे. चमेलीचा फटकळपणा, तितकाच गोड स्वभाव, बेडरपणा हे तिनं छान दाखवलं. ग्रामीण भाषेतले तिचे संवादही ती सहजतेने बोललीय. ती दिसलीही आहे आकर्षक. मुख्य म्हणजे पहिलाच चित्रपट असूनही ती विलक्षण आत्मविश्वासानं वावरलीय.

सचिननंही जयराम झकास रंगवलाय. त्याची आणि चमेलीची नेहमी चालणारी भांडणं चांगली जमली आहेत. एका दृश्यात देशमुखांची नक्कल करताना त्यानं श्रीकांत मोघेंच्या लकबी सहीसही उचलल्या आहेत.

अशोक सराफ बाळासाहेबांच्या भूमिकेत आहे. या भूमिकेला वयाने तो काहीसा मोठा

वाटला तरी आपली खास संवादशैली वापरून त्यानं बाळासाहेब सफाईने पेश केला आहे. नवतारका निलिमा, सयज जोग ठीक आहेत. मराठी रंगभूमीवरची अभिनेत्री निवेदिता जोशी हिचा हा पहिलाच चित्रपट. तिला मात्र काहीही वाव नाही. दया डोंगरे माँसाहेबांच्या भूमिकेत तरुण दिसत असल्या तरी थरथरत्या आवाजातून त्यांनी वय दाखवण्याचा चांगला प्रयत्न केलाय. इतर भूमिकात [श्रीकांत [मोघे आणि आशालता आहेत.

चित्रपटाचं संगीत अनिल–अरुणचं आहे. इतर गाणी फारशी श्रवणीय नसली तरी 'ही नवरी कसली–' हे गाणं त्याच्या ठेवयामुळं लक्षात रहातं. सारांश, हलकीफुलकी करमणूक हवी असेल तर 'नवरी मिळे––' चुकवून चालायचं नाही.


–सीमा कुलकर्णी

विज्ञान

# पाण्यात गुदमरणारे मासे

**मा**सा पाण्याबाहेर काढला की जगू शकत नाही. तो गुदमरतो आणि तडफडून मरतो हा सर्वसामान्य नियम झाला. कल्ल्यावाटे माशाचे श्वसन चालते. कल्ल्यावरून पाणी जात असता पाण्यातला प्राणवायू शोषून घेणे व कार्बन डाय ऑक्साईड वायू पाण्यात सोडणे ही माशाची श्वसन यंत्रणा असते. पाण्याबाहेर ही यंत्रणा कोलमडून पडते. परंतु माशांचा एक वर्ग या नियमाला अपवाद आहे. हे मासे वारंवार पाण्यावर डोके काढून किंवा पाण्याबाहेर येऊन श्वसन करतात. त्यांना पाण्याबाहेर येऊ दिले नाही तर ते गुदमरून मरतात. या माशांना हवेत श्वसन करणारे मासे असे म्हणतात. त्याच अर्थी इथे पाण्यात गुदमरणारे मासे ही शब्द रचना केली आहे. या वर्गामध्ये दोन प्रकारचे मासे आहेत. त्यातले काही नियमितपणे कल्ल्यांनी श्वसन करतात. पण अधूनमधून पाण्याबाहेर डोके काढून थेट हवेत श्वसन करतात तर काही फक्त हवेतच श्वसन करतात. या प्रकारच्या माशांना थेट हवेमध्ये श्वसन करता यावे यासाठी काही विशिष्ट अवयव विकसित झालेले असतात. त्वचा, घसा, जबड्यातील वरचा भाग, हवेच्या पिशव्या, आतडी व जठर या सारख्या अवयवामध्ये त्यासाठी आवश्यक ती परिवर्तने झालेली असतात. त्यातल्या काही माशांना तर फुप्फुसे सुद्धा असतात.

उष्ण कटिबंधातील तळी, पाणवठ्याच्या जागा, दलदलीचे प्रदेश, खाड्या नद्या इ. मध्ये या प्रकारचे हवेत श्वसन करणारे मासे अधिक प्रमाणात असतात. समुद्रातील माशांमध्ये हा प्रकार सहसा आढळत नाही. समुद्रामध्ये पाण्याच्या टंचाइची परिस्थिती निर्माण होत नाही; परंतु जमिनीवरील इतर छोट्या जलाशयातील पाणी कोरड्या ऋतूमध्ये आटते तेव्हा पाण्याबाहेर श्वसन करण्यावाचून या माशांना पर्याय नसतो.




अॅग्वीला किंवा ईल मासा जमिनीवर यतो आणि त्वचेने श्वसन करतो. ओलसर हिरवळीवरून हा मासा एका पाणवठ्याकडून दुसऱ्या पाणवठ्याकडे असा प्रवास करू शकतो. मडस्कीपर्सच्या काही जाती दलदलीच्या प्रदेशात चिखलावरून सरपटत जातात. जबडा आणि घसा यांचा उपयोग मडस्कीपर्सना श्वसनासाठी होतो. पण त्यासाठी त्याना घसा ओलसर ठेवावा लागतो. त्यामुळे हे मासे पाण्याकडे जावून काही काळ तोंड पाण्यात बुडवतात. त्यांच्या शेपट्या पाण्याबाहेर दिसत असल्यामुळे ते शेपटीने श्वसन घेतात असा समज होता; पण तो खरा नव्हे. हायपोपोमस आणि मोनोप्टेरस तोंडाने हवा घेऊन ती कवटीलगच्या हवेच्या पिशव्यामध्ये साठवतात व पुन्हा बाहेर सोडतात. या पिशव्या फुगणे आणि लहान होणे यावरून ही श्वसनक्रिया ओळखता येते. अमेरिकन कॅटफिशच्या काही जाती अन्ननलिकेने श्वसन करतात. तोंडावाटे घेतलेली हवा हा मासा गिळून पोटात ढकलतो. अन्ननलिकेमध्ये त्यातील प्राणवायू शोषून कार्बन डायऑक्साईड सोडला जातो. व तोंडावाटे हवा पुन्हा बाहेर सोडली जाते. यापेक्षा मजेदार उदाहरण अॅनाबस किंवा क्लायंबिंग पर्च या माशाचे आहे. हा मासा पाणवठ्याजवळच्या नारळीच्या झाडावर नारळाचे पाणी पिण्यासाठी चढतो असा समज होता, म्हणूनच त्याला क्लायंबिंग पर्च हे नाव पडले. प्रत्यक्षात हा समज चुकीचा आहे. अॅनाबस एका पाणवठ्याकडून दुसऱ्या पाणवठ्याकडे जात असताना कावळ्यांनी त्यांना उचलून जवळपासच्या नारळीच्या झाडावर ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. अॅनाबसच्या कवटीच्या दोन्ही बाजूला हवेच्या पिशव्या असतात. मागूर किंवा वॉकिंग कॅटफिश हा लहान तळ्यामध्ये रहाणारा मासा सुद्धा चिखलावरून व जमिनीवरून सरपटत जातो. त्याला श्वसनासाठी कल्ल्यांच्या वरच्या बाजूस हवेच्या पिशव्या असतात. म्यूरेल माशाचे

डोके सापाच्या डोक्यासारखे दिसते. त्याच्या जबड्यात वरच्या बाजूला हवेच्या पिशव्या असतात. म्यूरेलसुद्धा तोंडावाटे श्वसन करतो. बिहार आणि बंगालमधील तळी व डबकी यामध्ये आढळणारा मड–ईल पाणी आटल्यावर सरपटत चिखलात येतो व चिखलात भोक पाडून त्यात लपून बसतो. मड–ईलला डोक्याच्या दोन्ही बाजूस हवेच्या पिशव्या असतात. त्याला फक्त हवेतच श्वसन करता येते. कल्ले असले तरी ते निरुपयोगी असतात अॅमेझॉन खोऱ्यात दलदलीच्या प्रदेशात आढळणारा 'जायंट रेड फिश' हा गोड्या पाण्यातल्या सर्वात मोठ्या माशांपैकी आहे. त्याची सरासरी लांबी ५ मीटर्स व वजन २०० किलो ग्रॅम असते. हा मासा हवेत श्वसन करतो व त्यासाठी त्याला मोठ्या आकाराच्या हवेच्या पिशव्या असतात. या पिशव्या म्हणजे फुफ्फुसे नव्हेत.

श्वसनासाठी फुफ्फुसे असलेल्या माशांना 'लंगफिश' असे म्हणतात. हे मासे थेट हवेतून प्राणवायू घेतात. त्यांची फुफ्फुसे ही इतर माशांमध्ये आढळणाऱ्या हवेच्या पिशव्यांची अधिक उत्क्रांत अवस्था आहे. अनेक लंगफिश कोरड्या ऋतूमध्ये तळ्यातील पाणी आटल्यावर चिखलात झोप काढतात व पुन्हा पाऊस पडू लागल्यावर जागे होतात. वेगवेगळ्या जातीच्या लंगफिशची झोपण्याची पद्धत वेगवेगळी आणि कुतुहलजनक असते. आफ्रिकन लंगफिश पाणी आटू लागताच चिखलात येतो. त्याच्या शरीरातून साबणाच्या फेसासारखा चिक्कट पदार्थ बाहेर येवू लागतो व त्या पदार्थाचा एक कोश लंगफिशभोवती तयार होतो. या कोशामुळे माशाला उन्हाचा व कोरड्या हवेचा त्रास होत नाही. कोश चांगलाच टणक असतो व त्यात लंगफिश झोपून रहातो. पुन्हा पाऊस पडून कोश भिजला की मऊ होतो. कोशात पाणी शिरल्यामुळे लंगफिशला जाग येते व तो कोश फोडून बाहेर येतो आणि पाण्यात शिरतो. म्हणजे 'जळामध्ये मासा झोप घेई कैसा...' हे लंगफिशला लागू पडत नाही. उन्हाळी झोप घेऊन उपासमारीने क्षीण झालेल्या लंगफिशला सुरुवातीला पाण्यात नीटसे पोहतासुद्धा येत नाही. पण अल्पावधीतच त्याच्यात सुधारणा होते. तीन-चार महिने हा मासा फुफ्फुसानेच श्वसन करतो. निसर्गात लंगफिश तीन ते चार महिने झोप काढतो. त्याचे जागे होणे कोशामध्ये पाणी शिरण्याशी संबंधित असते. प्रयोगशाळेत हे कोश तीन ते चार वर्षे ठेवून नंतर त्यात पाणी सोडल्यावर हे कुंभकर्ण जागे झाल्याचे आढळले आहे.

हवेत श्वसन करणाऱ्या माशांना वारंवार पाण्याच्या पृष्ठभागावर किंवा पाण्याबाहेर पडावे लागते व पुन्हा पाण्यात जावे लागते. त्यामुळे केवळ हवा मिळविण्यात, त्यांच्या आयुष्याचा जास्त वेळ व जास्त शक्ती वाया जाते त्यामुळे त्यांना एका वेळी जास्त भक्ष्य पकडता यावे अशी सोय निसर्गाने केली आहे. त्यांचे जबडे मोठे असतात व दातसुद्धा मोठे असतात. मदुराई विद्यापीठातील डॉ. पंडीयन यांनी 'चन्ना' या हवेत श्वसन करणाऱ्या माशावर संशोधन केले आहे. अॅक्वारियममध्ये हा मासा दिवसातून १३०० ते १९०० वेळा हवा घेण्यासाठी पाण्यावर आला. दीड फूट उंचीच्या अॅक्वारियममध्ये त्यासाठी त्याला रोज किमान दीड हजार मीटर्स प्रवास करावा लागला. हवेसाठी केवढी ही यातायात.

उष्ण कटिबंधातील उथळ जलाशयात ८० टक्केपेक्षा जास्त हवेत श्वसन करणारे मासे आढळतात. कोरड्या ऋतूत पाणी आटल्यावरसुद्धा जीवनक्रम चालू ठेवता यावा यासाठी निसर्गाने त्यांना खास सुविधा बहाल केल्या आहेत. हे मासे हवेत श्वसन करतात एवढेच नव्हे तर जमिनीवर काही काळ घालवू शकतात. जलचर आणि उभयचर प्राण्यामधील हे मासे हा महत्वाचा दुवा मानला जातो. त्याचबरोबर उत्क्रांतीचा सबळ पुरावासुद्धा.

—डॉ. सुभाषचंद्र सारंग


डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

**चार्ल्स डार्विन**

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार विवेचनासह प्रकाशित झालेली पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

**MANOOS WEEKLY** ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW

" मूलभूत प्रश्नच विचारतो. विद्यार्थी परिषद नेमके काय करू इच्छिते ?. . . . "–दि. वि. गोखले.
" एका वाक्यात उत्तर द्यायचे तर " . . . . केळकर

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेला एक देशव्यापी, विधायक संघटनेचे स्वरूप देणाऱ्या ज्या काही संघपरिवारातील मोजक्या व्यक्ती आहेत त्यात प्रा. यशवंतराव केळकर यांचे स्थान फार वरचे आहे. त्यांच्या वयाला नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाली. मुंबईत एक सत्कार सोहोळाही गेल्या दि. २८ एप्रिलला मोठ्या प्रमाणावर साजरा झाला.

ही विद्यार्थी परिषद का सुरू झाली ? आज तिचे स्वरूप काय, भावी कालातील उद्दिष्टे कोणती ?

**सुप्रसिद्ध पत्रकार दि. वि. गोखले यांनी षष्टयब्दीपूर्ती निमित्त प्रा. यशवंतराव केळकर यांची घेतलेली परखड मुलाखत :**

**माणूस**

**पुढील अंकात**

